# श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी)

**सभा क्र.१९/ २०१४ दिनांक ०९.१२.२०१४**

**स्थळ- जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर**

**वेळ- दुपारी ०३.०० वाजता**

श्रीसाईबाबा संस्थान व्यवस्थापन समितीची सर्वसाधारण सभा मंगळवार दिनांक ०९.१२.२०१४ रोजी दुपारी ०३.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे आयोजित करण्यात आली असलेबाबत इकडील जा.नं.एसएसएस/ वशी-०४/ ४२६६/ २०१४, दिनांक ०८ डिसेंबर, २०१४ रोजीचे पत्राने सर्व मा.सदस्यांना कळविण्यात आले होते. त्यानुसार सदरहू सभा मंगळवार दिनांक ०९.१२.२०१४ रोजी दुपारी ०३.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय, अहमदनगर येथे मा.अध्यक्ष श्री.शशिकांत कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सुरु करण्यात आली.

या सभेस खालील मा.सदस्य उपस्थित होते.

०१. मा.श्री.शशिकांत कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर, अध्यक्ष

०२. मा.श्री.अनिल कवडे, जिल्हाधिकारी, अहमदनगर, सदस्य

०३. मा.श्री.राजेंद्र जाधव, कार्यकारी अधिकारी, सदस्य

सभेच्या सुरुवातीस श्री साईबाबांची प्रार्थना करणेत येऊन, मा.अध्यक्ष श्री.शशिकांत कुलकर्णी, मुख्य जिल्हा न्यायाधीश, अहमदनगर यांचे अध्यक्षतेखाली सभेचे कामकाज सुरु करण्यात आले.

यानंतर विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा सुरु करणेत आली.

**विषय नं.१ दिनांक २०.११.२०१४ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.१०२०** दिनांक २०.११.२०१४ रोजी शिर्डी येथे झालेल्या व्यवस्थापन समितीचे सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व सदस्यांना सभेत पुरविणेत आल्या होत्या, त्याची नोंद घेण्यात येऊन, सदरहू इतिवृत्त वाचून कायम करणेत आले.

------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.२ दिनांक ०८.१२.२०१४ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेचे इतिवृत्त वाचून कायम करणे.**

**निर्णय क्र.१०२१** दिनांक ०८.१२.२०१४ रोजी शिर्डी येथे झालेल्या उपसमिती सभेच्या इतिवृत्ताच्या प्रती सर्व मा.सदस्यांना पुरविण्यात आल्या होत्या. त्याची नोंद घेण्यात येऊन, या इतिवृत्तातील खालील शिफारशींना पुष्टी देण्यात आली.

**०१ व्दारावती भक्तनिवास इमारतीत देणगीदार साईभक्तांची नांवे देण्यासाठी नामफलक (Name Plates) तयार करुन बसविणेकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून त्यावर निर्णय होणेबाबत. (रु.१,००,०००/-)**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम 2004 मधील तरतुद :** अधिनियम कलम 21 (1) अन्वये समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनांसाठी करणेबाबत तरतुद आहे. त्यातील पोटकलम (क) अन्वये मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन या प्रयोजनांसाठी करण्यात येईल अशी तरतुद आहे.

**मा. त्रीसदस्य् समितीचे सभेतील निर्णय:**

1. मा. व्यवस्थापन समितीचे दिनांक 07/07/2008 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 574.
2. मा. त्रीसदस्य् समितीचे दिनांक 03/08/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 621.

**प्रस्ताविक:** संस्थानचे शिर्डी येथील स. नं. 148 मधील व्दारावती भक्तनिवास इमारत बांधकाम दि.15/08/2009 अखेर पूर्ण करण्यात आलेले असून, सदर इमारतीत तळमजल्यावर पार्किंग व वरील चार मजल्यांवर साईभक्तांसाठी प्रसाधनगृहासह सुसज्ज् अशा 316 खोल्या साईभक्तांचे निवासासाठी उपलब्ध् आहेत. तत्कालीन मा. व्यवस्थापन समितीचे दि.07/07/2008 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 574 अन्वये देणगीदार साईभक्तांच्या नेमप्लेटस् बांधकाम विभागामार्फत तयार करुन वेळोवेळी पूर्ण होणाऱ्या भक्तनिवास इमारतीच्या खोल्यांना लावण्यात याव्यात, यासाठी येणाऱ्या सर्व आवश्यक खर्चास बांधकाम विभागाच्या अंदाजपत्रकातुन मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार वेळोवेळी सदर इमारतीसह इतर भक्तनिवास इमारत बांधकामासाठी एकुण 2295 देणगीदार साईभक्तांचे नांवाच्या 5'x7'-6" आकाराच्या् 20 नग ग्रेनाईट नेमप्लेटस् व्दारावती भक्तनिवास इमारतीचे मध्यवर्ती जिन्याचे दोन्ही बाजूस बसविणेत आलेल्या आहेत.

लेखाशाखा विभाग यांनी त्यांचेकडील दि.10/01/2014 व दि.09/05/2014 रोजीचे पत्रान्वये दि.31/03/2014 अखेर या योजनेअंतर्गत देणगी देणाऱ्या एकुण 407 भक्तांच्या नांवाची यादी नेमप्लेटस् तयार करुन बसविणेकामी पाठविली आहे. सदरहू कामी 5'x7'-6" आकाराच्या 04 नग ग्रेनाईट नेमप्लेटस् तयार करुन बसविणेकामी येणारे रु.1,00,000/- मात्रचे खर्चास व सदरचे काम विहीत पध्दतीने निविदा मागवून करुन घेणेस मा. त्रीसदस्य् समितीचे दिनांक 03/08/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्र. 621 अन्वये मान्यता देण्यात आली आहे.

**प्रस्ताव:** मा.त्रीसदस्य् समितीचे उपरोक्त् मान्यतेनुसार सदरहू कामी वर्तमान पत्रात व संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, दि.13/10/2014 ते दि.28/10/2014 या कालावधीत निविदा विक्रीची मुदत देऊन आली होती. सदरचे विहीत मुदतीत खालील ठेकेदारांनी कोरे निविदा फार्म विकत घेतलेले आहेत.

1. जाधव मार्बल्स्, नाशिक
2. सोमवंशी एम. जी., राहाता
3. श्री. अनिवाश घोगरे, शिर्डी
4. श्री. सतिष नारायण राऊत, अस्तगांव

सदरच्या सिलबंद निविदा सादर करणेसाठी दि.30/10/2014 ही मुदत ठेवणेत आली होती. सदरचे मुदतीत खालील ठेकेदारांनी सिलबंद निविदा सादर केल्या आहेत.

| **अ.नं.** | **निविदा सादरकर्त्यांचे नांव** | **आवक नंबर / दिनांक** |
|---|---|---|
| 01. | श्री. सतिष नारायण राऊत, अस्तगांव | 014142 / 30.10.2014 |
| 02. | सोमवंशी एम. जी., राहाता | 014143 / 30.10.2014 |
| 03. | श्री. अनिवाश घोगरे, शिर्डी | 014144 / 30.10.2014 |
| 04. | जाधव मार्बल्स्, नाशिक | 014147 / 30.10.2014 |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या ०४ सिलबंद निविदा आजचे उपसमितीचे सभेत उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| **अ.नं.** | **निविदा सादरकर्त्यांचे नांव** | **निविदेमधील मुळ दर रु.** |
|---|---|---|
| 01. | श्री. सतिष नारायण राऊत, अस्तगांव | १०,०२,०००/- |
| 02. | सोमवंशी एम. जी., राहाता | **<u>८६,०००/-</u>** |
| 03. | श्री. अनिवाश घोगरे, शिर्डी | ९६,०००/- |
| 04. | जाधव मार्बल्स्, नाशिक | १,५४,०००/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, व्दारावती भक्तनिवास इमारतीत देणगीदार साईभक्तांची नांवे देण्यासाठी प्रस्तावित नामफलक (Name Plates) तयार**

**करुन बसविणेकामी सोमवंशी एम. जी., राहाता यांचे रु.८६,०००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- बांधकाम विभागप्रमुख)

-------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**०२ साईप्रसाद निवासस्थान व जनसंपर्क कार्यालय येथे नविन अंतर्गत दुरध्वनी नंबर देणेसाठीचे केबल कामाबाबत प्राप्त झालेले टेंडर उघडून निर्णय होणेबाबत. (रु.८९,२८०/-)**

मा.त्रीसदस्य समितीचे दिनांक २६-०६-२०१४ चे सभेतील विषय नं.१९ निर्णय क्र.५४५ अन्वये श्री साईप्रसाद निवासस्थान व जनसंपर्क कार्यालय येथे नविन अंतर्गत दुरध्वनी नंबर देणेसाठीचे केबल कामाबाबत विहीत पध्दतीने टेंडर मागवून काम करुन घेणेसाठी व याकामी येणारे रक्कम रुपये ८९,२८०/- मात्रचे खर्चास मान्यता मिळाली होती. त्यानुसार वर्तमानपत्रात व संस्थानचे वेबसाईटवर जाहीरात देण्यात आलेली होती. टेंडर विक्रीची तारीख दि.०१/१०/२०१४ ते दि.११/१०/२०१४ अखेर ठेवण्यात आलेली होती व टेंडर जमा करण्याची शेवटची तारीख दि.१६/१०/२०१४ अशी देण्यात आलेली होती. त्यानुसार तीन टेंडरची विक्री झालेली असुन सिलबंद टेंडर जमा करणेचे मुदतीत खालीलप्रमाणे तीन टेंडर प्राप्त झाली आहे.जमा झालेल्या टेंडरचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.नं. | टेंडरधारकाचे नांव | प्रशासन आवक नं. व दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| ०१). | मे.श्री साईश्रध्दा इलेक्ट्रीकल्स, नाशिक | ०१३४५४/ १६-१०-२०१४ | बंद टेंडर पाकीट-०१ + ईएमडी बंद पाकीट-०१ |
| ०२). | मे.श्री जोगेश्वरी इलेक्ट्रीकल अॅण्ड सर्व्हिसेस, नाशिक | ०१३४५५/ १६-१०-२०१४ | बंद टेंडर पाकीट-०१ + ईएमडी बंद पाकीट-०१ |
| ०३). | मे.गुरु इंजिनिअरींग अॅण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, नाशिक | ०१३४५६/ १६-१०-२०१४ | बंद टेंडर पाकीट-०१ + ईएमडी बंद पाकीट-०१ |

उपरोक्तप्रमाणे साईप्रसाद निवासस्थान व जनसंपर्क कार्यालय येथे नविन अंतर्गत दुरध्वनी नंबर देणेसाठीचे केबल कामाबाबत प्राप्त झालेल्या ०३ सिलबंद

निविदा आजचे उपसमितीचे सभेत उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| **अ.नं.** | **निविदा सादरकर्त्यांचे नांव** | **निविदेमधील मुळ दर रु.** |
|---|---|---|
| 01. | मे.श्री साईश्रध्दा इलेक्ट्रीकल्स, नाशिक | ९८,२०८/- |
| 02. | मे.श्री जोगेश्वरी इलेक्ट्रीकल अॅण्ड सर्व्हिसेस, नाशिक | १,००,४४०/- |
| 03. | मे.गुरु इंजिनिअरींग अॅण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, नाशिक | **९६,४२२.४०** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी मे.गुरु इंजिनिअरींग अॅण्ड कॉन्ट्रॅक्टर्स, नाशिक यांचे रु.९६,४२२.४० मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

---

०३ **पाणी पुरवठा विभागास साईआश्रम व साईधर्मशाळा येथे आवश्यक प्लंबींग साहित्य खरेदीकामी प्राप्त निविदातील तांत्रिक लिफाफे उघडणेबाबत. (रु.७,५१,७७४/-)**

**अधिनियम २००४ मधील तरतुद :-** १७ (२) (झ) मध्ये सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील, असे नमुद आहे.

पाणी पुरवठा विभागास साईआश्रम व साईधर्मशाळा येथील प्लम्बींग मेन्टेनन्स मटेरियल खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु. ७,५१,७७४/- (अक्षरी रुपये सात लाख एक्कावन्न हजार सातशे चौऱ्याहत्तर) मात्रचे खर्चास मा.त्रिसदस्य समिती सभा दि.०७.०८.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ६७१ नुसार मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार सदरचा प्रस्ताव दि.१९.०९.२०१४ रोजी पुढील कार्यवाहीसाठी इकडील कार्यालयास प्राप्त झालेला आहे.

त्यानुसार दि.१९.१०.२०१४ रोजीचे वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन सदरची खरेदी प्रक्रिया निविदा पध्दतीने केलेली आहे. निविदा विक्री कालावधी

दि.२०.१०.२०१४ पासून दि.२९.१०.२०१४ असा होता. निविदा स्विकारणेची अंतीम दि.३१.१०.२०१४ अशी होती. मुदतीअंती तीन निविदा प्राप्त झालेल्या आहेत. त्यांचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.न. | निविदाधारकाचे नाव | आवक नंबर/ दिनांक |
|---|---|---|
| १. | मे. युनियन ट्रेडींग, नाशिक | ३१९१३ / २७.१०.२०१४ |
| २. | मे. यशोदा ट्रेडर्स, साकूरी | १४२२८ / ३१.१०.२०१४ |
| ३. | मे. अनुराधा अॅग्रो सर्व्हिस, लोणी | १४२२९/ ३१.१०.२०१४ |

उपरोक्त निविदाधारकांच्या निविदेतील तांत्रिक लिफाफा क्रं.१ व मुळ निविदांचा लिफाफा क्र.२ मा.व्यवस्थापन उपसमितीचे सभेत समक्ष उघडून लेखाशाखेमार्फत तांत्रिक कागदपत्राची तपासणी करता येईल. मा.व्यवस्थापन उपसमितीचे सभेत योग्य निर्णय घेता येईल.

**पाणी पुरवठा विभागास साईआश्रम भक्तनिवास व साईधर्मशाळा येथे आवश्यक असलेले प्लंबींग साहित्य खरेदी करणेकामी प्राप्त झालेल्या ०३ निविदेतील तांत्रिक लिफाफा क्रं.१ आजचे उपसमितीचे सभेत उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत आले असता मे.यशोदा ट्रेडर्स, साकूरी व मे.अनुराधा अॅग्रो सर्व्हिस, लोणी या निविदाधारकांनी निविदेतील अटी/शर्तीप्रमाणे दुकान नोंदणी दाखला सादर केलेला नाही, त्यामुळे ते अपात्र ठरत आहे, असा मुख्यलेखाधिकारी यांनी अभिप्राय दिला.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित खरेदीकामी एकच निविदाधारक पात्र ठरत असल्यामुळे निविदाधारकांनी दिलेला मुळ दरांचा लिफाफा क्र.२ न उघडता सदरहूकामी दुबार निविदा मागविणेत याव्यात, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

**०४ साईधर्मशाळेकरिता काथ्या बाथमॅट व हिरवे पलॅस्टीक बाथमॅट (पायपुसणे) खरेदीकामी प्राप्त निविदातील तांत्रिक लिफाफे व मुळ निविदांचे लिफाफे उघडणेबाबत. (रु.१,५३,३००/-)**

**अधिनियम २००४ मधील तरतुदः-** १७ (२) (झ) मध्ये सर्वसाधारणपणे विश्वस्तव्यवस्थेची मालमत्ता व तिचे कामकाज यांचे योग्य प्रकारे व्यवस्थापन, देखभाल व प्रशासन करण्याच्या प्रयोजनांसाठी आवश्यक असतील अशा सर्व गोष्टी करील, असे नमुद आहे.

साईधर्मशाळा विभागासाठी आवश्यक ५२ नग काथा बाथमॅट व ०६ नग हिरवे प्लॅस्टिक बाथमॅट खरेदी करणेस व त्याकामी येणाऱ्या रक्कम रु. १,५३,३००/- (अक्षरी रुपये एक लाख त्रेप्पन्न हजार तिनशे) मात्रचे खर्चास

मा.त्रिसदस्य समिती सभा दि.२६.०६.२०१४ रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक ५३५ नुसार मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार सदरचा प्रस्ताव दि.०४.१०.२०१४ रोजी पुढील कार्यवाहीसाठी इकडील कार्यालयास प्राप्त झालेला आहे.

त्यानुसार दि.१९.१०.२०१४ रोजीचे वर्तमान पत्रात जाहिरात प्रसिध्द करुन सदरची खरेदी प्रक्रिया निविदा पध्दतीने केलेली आहे. निविदा विक्री कालावधी दि.२०.१०.२०१४ पासून दि.२९.१०.२०१४ असा होता. निविदा स्विकारणेची अंतीम दि. ३१.१०.२०१४ अशी होती. मुदतीअंती दोन व मुदतीनंतर एक अशा एकूण तीन निविदा प्राप्त झालेल्या आहेत. लेखापरीक्षणाचे दृष्टीने तीनही निविदाचा विचार करता येईल. त्यांचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ.न. | निविदाधारकाचे नाव | आवक नंबर/ दिनांक |
|---|---|---|
| १. | मे. युनियन ट्रेडींग, नाशिक | १३९१२/ २७.१०.२०१४ |
| २. | मे. श्री.स्वामी समर्थ एजन्सीज, कोपरगाव | १४२२३/ ३१.१०.२०१४ |
| ३. | मे. गांधी केमिकल्स, अहमदनगर | १४३११/ ०१.११.२०१४ |

उपरोक्त निविदाधारकांच्या निविदेतील तांत्रिक लिफाफा क्रं.१ व मुळ निविदांचा लिफाफा क्र.२ मा.व्यवस्थापन उपसमितीचे सभेत समक्ष उघडून लेखाशाखेमार्फत तांत्रिक कागदपत्राची तपासणी करता येईल. मा.व्यवस्थापन उपसमितीचे सभेत योग्य निर्णय घेता येईल.

**साईधर्मशाळेकरिता काथ्या बाथमॅट व हिरवे पलॅस्टीक बाथमॅट (पायपुसणे) खरेदीकामी प्राप्त झालेल्या ०३ निविदेतील तांत्रिक लिफाफा क्रं.१ आजचे उपसमितीचे सभेत उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत आले असता निविदेतील अटी/शर्तीप्रमाणे मे. श्री.स्वामी समर्थ एजन्सीज, कोपरगाव यांनी आयकर नोंदणी (पॅनकार्ड) व मे. गांधी केमिकल्स, अहमदनगर यांनी बयाना रकमेचा डी.डी. भरलेला नाही. त्यामुळे ते अपात्र ठरत आहे, असा मुख्यलेखाधिकारी यांनी अभिप्राय दिला.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावित खरेदीकामी एकच निविदाधारक पात्र ठरत असल्यामुळे निविदाधारकांनी दिलेला मुळ दरांचा लिफाफा क्र.२ न उघडता सदरहूकामी दुबार निविदा मागविणेत याव्यात, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- प्र.अधिक्षक, खरेदी विभाग)

---

०५ **लेंडीबागेचे नुतनीकरण करणेकामी प्राप्त झालेले दरपत्रक उघडणेस मंजुरी मिळणेबाबत. (रु.५,६८,०००/-)**

मा. व्यवस्थापन समितीच्या दि. 28/08/2014 रोजीच्या सभेतील निर्णय क्रं. 39 व विषय क्र. 715 अन्वये लेंडीबागेचे नुतनिकरण करणेकामी रु.5,68,000/- (पाच लाख अड्रुसष्ठ हजार) मात्र खर्चास मान्यता घेण्यात आलेली आहे. तसेच सदरचे काम विहीत पध्दतीने निवीदा मागवुन करुन घेता येईल असे ठरले. त्यानुसार लेंडीबागेचे नुतनिकरण करणेबाबतची जाहिरात जनसंपर्क विभागामार्फत नाशीक, अहमदनगर वृत्तपत्रामधुन प्रसिध्द करण्यात आलेली होती. तसेच माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत ऑनलाईन इंटरनेटवर माहिती टाकण्यात आली होती. कोरे निवीदा अर्ज विक्री दि.14/11/2014 रोजी संपलेली असुन अद्याप 3 निवीदांची विक्री झालेली आहे. तसेच सिलबंद निवीदा सादर करावयाची मुदत दि.15/11/2014 अखेर संपलेली असुन अद्याप 3 दरपत्रके प्राप्त झालेली आहे.

प्राप्त झालेल्या दरपत्रकाचा तपशिल खालील प्रमाणे.

| अ.क्र | पार्टीचे नाव | आवक नंबर /दिनांक | शेरा |
|---|---|---|---|
| ०१ | माऊली नर्सरी, अस्तगाव | ०१५४६३/ १४-११-२०१४ | बंद लिफाफा |
| ०२ | साई शक्ती प्लॅन स्टेशन, लोणी | ०१५४६२/ १४-११-२०१४ | बंद लिफाफा |
| ०३ | साई लॅन्डरकेट ॲण्ड गार्डन डेव्हलोपर्स, नांदुर्खी | ०१५४६३/ १५-११-२०१४ | बंद लिफाफा |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेली ०३ दरपत्रके आजचे उपसमितीचे सभेत उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| **अ.नं.** | **दरपत्रकधारकाचे नाव** | **दरपत्रकामधील मुळ दर रु.** |
|---|---|---|
| 01. | माऊली नर्सरी, अस्तगाव | ७,०६,१५०/- |
| 02. | साई शक्ती प्लॅन स्टेशन, लोणी | ७,१२,१५०/- |
| 03. | साई लॅन्डरकेट ॲण्ड गार्डन डेव्हलोपर्स, नांदुर्खी | **५,६६,८५०/-** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, लेंडीबागेचे नुतनीकरण करणेकामी साई लॅन्डरकेट ॲण्ड गार्डन डेव्हलोपर्स, नांदुर्खी यांचे रु.५,६६,८५०/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना सदरहूकामी कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- बगीचा विभागप्रमुख)

---

०६ **दूध तपासणी मशिन खरेदीकामी मागविण्यात आलेल्या फेरनिविदा उघडून निर्णय होणेबाबत. (रु.१,००,०००/-)**

अधिनियम 2004 मधील तरतूद – सन-2004 मधील महाराष्ट्र शासन राजपत्रातील 17 (1) मध्ये भक्तगणाना आवश्यक त्या सोयी व सुविधा उपलब्ध करुन देणेची तरतूद करण्यात आलेली आहे.

कॅन्टीन विभागामार्फत साईभक्तांसाठी चहा,कॉफी ,दुध तयार करुन दैंनदिन विक्री करण्यात येते.याकामी साईभक्तांना चांगल्या प्रकारची सुविधा मिळणेकामी व खरेदी करण्यात येणारे दुधाची गुणप्रत चांगली असावी या करीता पुरवठाधारंकाकडून पुरविण्यात येणारे दुधाची दैंनदिन फॅट ,डीग्री तपासणी कामी दुध तपासणी मशिन ,खरेदी करणेस व याकामी **रु एक लाख** पर्यंतचे खर्चास मा.व्यवस्थापन समितीचे सभेत मान्यता देण्यात आलेली आहे.

दि.17/11/2014 चे टिपणी अन्वये दुध-तपासणी खरेदी कामी मान्यता घेण्यात आली होती व त्याप्रमाणे वर्तमानपत्रातून जाहीरात प्रसिध्द् करुन पुरवठाधांरका कडून निविदा मागविण्यात आल्या होत्या पुरवठाधारकांकडून 03 निविदा प्राप्त् झाल्या असून सदर निविदा मधील लिफाफा क्रं.2 (Techanical Bid ) मा.व्यवस्थापन उपसमितीचे सभेत उघडणेत आले आहे. पुरवठाधारकांनी निविदा सोबत जोडलेल्या तात्रिंक कागदपत्राची मा.मुख्यलेखा व वित्त्अधिकारी यांनी तपासणी केली असून दोन निविदा पात्र ठरत असलेने व पुरेशी स्पर्धा होवू शकत नसलेने पुनश्च निविदा प्रसिध्द करणे योग्य होईल असा अभिप्राय दिलेला आहे.

मा.मुख्यलेखा व वित्त्अधिकारी यांचे अभिप्रायानुसार दि.13/10/14 चे टिपणीनुसार फेरनिविदा तयार करणेस व वर्तमानपत्रातून पुन्हा जाहीरात देणेस मान्यता घेण्यात आली.जाहीराती मध्ये निविदा स्वीकारणेची अंतीम मूदत दि.12/11/2014 अशी देण्यात आली.खालील पुरवठाधारकांकडून मुदतीत निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

| अ.नं | पुरवठाधारकांचे नाव | पत्ता | आवक नं.तारीख् |
|---|---|---|---|
| 01 | Gaurav Computer | Unit No.3 Malvankar Ind.Estate, Ambedkar Road , Pune -411001 | 14977 दि.12/11/14 |

| | | | |
|---|---|---|---|
| 02) | Joy Instruments & Solar Lights Unit No.3 | Malvankkar Ind.Estate, Ambedkar Road, Pune - 411001 ph.No.020-26058466/ 9822871131 | 14978 दि.12/11/14 |
| 03 | Alfa Tech India | 1717 Zenith Complex Opp.krushi Bhavan Shivajinagar pune -411005 ph.No.020-25530399 / 66010999 | 14979 दि.12/11/14 |

कॅन्टीन विभगाकरीता दैनंदिन दुधाची गुणप्रत तपासणेसाठी ०२ दुध तपासणी मशिन खरेदी करणे आहे.

वरील प्रमाणे प्राप्त् झालेल्या निविदा निविदाधारंकासमोर उघडून लिफाफा क्रं.2 मधील तांत्रिक कागदपत्रे (Techanical Bid) मा.मुख्यलेखा व वित्तअधिकारी यांचे कडून तपासून घेणेस व लिफाफा क्रं.1 (Financial Bid) उघडून दरपत्रकाचा तुलनात्मक तक्ता तयार करुन पात्र न्युनतम दरधारकास कार्यादेश देणेबाबतची कार्यवाही करणे विषयी मा.उपसमिती समोर निर्णयार्थ सविनय सादर.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेली ०३ दरपत्रके आजचे उपसमिती सभेत उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| **अ.नं.** | **निविदाधारकाचे नाव** | **निविदेमधील मुळ दर प्रती नग रु.** |
|---|---|---|
| 01. | गौरव कॉम्प्युटर्स, पुणे | ५३,४००/- |
| 02. | जॉय इन्स्ट्रुमेंट अॅण्ड सोलर लाईट, पुणे | ५१,५००/- |
| 03. | अल्फा टेक इंडीया, पुणे | **<u>४८,५००/-</u>** |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, कॅन्टीन विभगाकरीता दैनंदिन दुधाची गुणप्रत तपासणेकामी आवश्यक असलेले ०२ नग दुध तपासणी मशिन खरेदी करणेसाठी अल्फा टेक इंडीया, पुणे यांचे प्रती नग रु.४८,५००/- मात्र निम्नतम दर आलेले आहेत. परंतु प्रस्तावित दरपत्रकधारकांनी अटी/ शर्तीप्रमाणे कागदपत्रे सादर केलेली नाहीत. याकरिता कागदपत्रांची पुर्तता केल्यानंतरच पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, कॅन्टीन विभाग)

---

०७ **श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागाकरीता Lead Neck Collar खरेदीकामी प्राप्त कोटेशन उघडून निर्णय होणेबाबत. (रु.३४,८३९/-)**

श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागात सध्या दैनंदिन शस्त्रक्रिया करणेसाठी सध्या त्यांचेकडे 03 Lead Neck Collar उपलब्ध आहेत. परंतु

शस्त्रक्रिया करतांना ऑपरेशन थिएटरमध्ये 5 ते 6 कर्मचारी काम करत असतात, त्यामुळे सध्या असलेले Collar कमी पडत आहे, त्यामुळे त्यांनी नविन मागणी केलेली आहे.

याकामी अंदाजे खर्चासाठी मे. अनिता मेडीकल सिस्टीम प्रायव्हेट लिमीटेड, मुंबई यांचेकडून दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यांचे दरानुसार सदरचे खरेदीकामी एकुण रु. 34,839/- इतका खर्च अपेक्षित आहे, त्याचा तपशील खालीलप्रमाणे:-

| Sr. no. | Description | Qty. | App. Rate per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 1 | Zerolead Thyroid Shield.50 mm pb | 06 | 5806.50 | 34839.00 |
| | | **Total Amt. in Rs.** | | **34839.00** |

सदरचे Lead Neck Coller खरेदीकामी दि. १२/०६/२०१४ रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेत निर्णय क्र. ५२३ अन्वये विहित पद्धतीने कोटेशन मागविण्यास व याकामी येणा-या रक्कम रु. ३४,८३९/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे, त्यानुसार इकडील पत्र क्र. १८५७ दि. ०७/०८/२०१४ अन्वये एकूण ०८ अधिकृत विक्रेते/ पुरवठाधारक यांचेकडून दि. २०/०८/२०१४ अखेर कोटेशन्स मागविण्यात आलेले होते. त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे ०३ कोटेशन प्राप्त झालेले आहेत.

१) M/s. Anita Medical Systems Pvt. Ltd., Mumbai (सिलबंद कोटेशन प्राप्त दि. २२/०८/२०१४)

२) M/s. Tirupati Enterprises, Pune (प्रशासन शाखेकडून टपालातुन उघडून कोटेशन प्राप्त दि. १८/०८/२०१४)

३) M/s. Uma Marketing Agencies, Pune (प्रशासन शाखेकडून टपालातुन उघडून कोटेशन प्राप्त दि. २०/१०/२०१४)

अ. नं. १ व ३ हे मुदतीनंतर प्राप्त झालेले असुन तुलनात्मक तक्ता तयार करण्याच्या दृष्टीने फायदा होऊ शकेल असे नम्र मत आहे.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या ०३ कोटेशन्समधील ०१ बंद कोटेशन्स आजचे उपसमिती सभेत उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, तीनही कोटेशन्समधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| अ.नं. | कोटेशनधारकाचे नाव | कोटेशनमधील मुळ दर प्रती नग रु. |
|---|---|---|
| 01. | मे.अनिता मेडीकल सिस्टीम्स प्रा.लि., मुंबई | <u>**६,१५६/-**</u> |

| | | |
|---|---|---|
| 02. | मे.तिरुपती एन्टरप्रायजेस, पुणे | ७,४१६/- |
| 03. | मे.उमा मार्केटींग एजन्सीज, पुणे | ८,४००/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील कॅथलॅब विभागाकरीता आवश्यक असलेले ०६ नग Lead Neck Collar खरेदीकामी मे.अनिता मेडीकल सिस्टीम्स प्रा.लि., मुंबई यांचे प्रती नग रु.६,१५६/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना पुरवठा आदेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------

०८ **श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही. टी.एस. ओ.टी.नं.०१ या विभागाकरीता Needle Holder (Curved Golden Handle 10") खरेदीकामी M/s. B.L. Lifescience Pvt. Ltd. New Delhi यांची एकमेव प्राप्त निविदा उघडून निर्णय होणेबाबत. (रु.१,६२,१४०/-)**

श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस. ओ.टी. १ या विभागाने दि.०२/०४/२०१४ रोजीचे मागणी पत्रकान्वये Scanlan कंपनीच्या Needle Holder (Curved Golden Handle 10”) ०२ नगांची मागणी केलेली आहे. सदर विभागाकडे Needle Holder नसल्यामुळे त्यांनी नवीन मागणी केलेली आहे. कारण सदरचे Needle Holder घेतल्यामुळे ऑपरेशन नंतर करावयाचे Sutures हे लवकर होतील शिवाय सदर Sutures मुळे Tissue Damage होणार नाही, त्यामुळे रुग्ण लवकरात लवकर बरा होण्यास मदत होईल.

उपरोक्त Needle Holder (Curved Golden Handle 10”) खरेदीकामी अंदाजे खर्चासाठी M/s. B. L. Lifescience Pvt. Ltd., Mumbai यांचेकडून दरपत्रक मागविण्यात आले होते. त्यांनी दि. १४/०४/२०१४ रोजीचे ई-मेल पत्रान्वये खालीलप्रमाणे दर कळविलेले आहे.

| Sr. No. | Description | Qty. | App. Rate per in Rs. | Total Amt. in Rs. |
|---|---|---|---|---|
| 01. | Needle Holder, Curved Golden Handle 10” / 25.4 cm | 02 No. | 81070.00 | 162140.00 |
| | | | **Total Amt. in Rs.** | **162140.00** |

दि. १२/०६/२०१४ रोजीचे मा. त्रिसदस्य समिति सभेतील विषय नं. ७१ निर्णय क्र. ५२१ अन्वये ०२ नग Needle Holder (Curved Golden Handle 10”) विहीत पद्धतीने निविदा मागवून खरेदीस व याकामी येणा-या रक्कम रु. १,६२,१४०/- चे खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार LED Light Source with Lamp खरेदीस जास्तीत जास्त प्रतिसाद मिळणेकामी सदरची जाहिरात चौफेर – मुंबई, सार्वमत – श्रीरामपुर, पुण्यनगरी – नाशिक, पुढारी – पुणे या वर्तमानपत्रात तसेच संस्थानचे संकेत स्थळावर जाहिरात व निविदा देण्यात आली होती. निविदा विक्रीची मुदत दि. ०९/०९/२०१४ ते दि. २०/०९/२०१४ पर्यंत ठेवण्यात आली होती, तर निविदा स्विकारण्याची अंतिम मुदत दि.२३/०९/२०१४ अखेर ठेवण्यात आली होती. तसेच एकूण ३१ उत्पादक कंपन्या / अधिकृत विक्रेते यांना दि.१०/०९/२०१४ अन्वये जाहिरातीबाबत अवगत करणेकामी ई-मेल द्वारे कळविण्यात आले होते.

त्यास अनुसरुन खालीलप्रमाणे ०१ निविदा प्राप्त झालेली आहे.

| Sr. | Name of Tenderer | Received Date |
|---|---|---|
| 01. | M/s. B. L. Lifescience Pvt. Ltd., New Delhi | 22/09/2014 |

श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस. ओ.टी. I या विभागाने मागणी केलेले Needle Holder हे त्यांना Scanlan कंपनीचेच पाहिजे आहे. Scanlan ही कंपनी Imported असुन तिचे भारतातील अधिकृत विक्रेते M/s. B. L. Lifescience Pvt. Ltd., New Delhi हे आहेत, त्यामुळे सदरचे खरेदीकामी त्यांची एकमेव निविदा प्राप्त झालेली आहे. तुलनात्मक दर मिळणेकामी कमीत कमी तीन निविदा आवश्यक असतात, परंतु वरील खरेदीकामी फेरनिविदा करुन देखील पुन्हा निविदा प्राप्त होतील असे वाटत नाही. त्यामुळे वरील खरेदीकामी प्राप्त एकमेव निविदा उघडून पुढील निर्णय होणेस विनंती.

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेली ०१ निविदा आजचे उपसमिती सभेत उपस्थित निविदाधारकासमक्ष उघडणेत आली. त्यामधील दर खालीलप्रमाणे-

| अ.नं. | निविदा सादरकर्त्यांचे नांव | निविदेमधील प्रती नग दर रु. |
|---|---|---|
| 01. | M/s. B. L. Lifescience Pvt. Ltd., New Delhi | ९९,५४०/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही. टी.एस. ओ.टी.नं.०१ या विभागाकरीता आवश्यक असणारे ०२ नग Needle Holder (Curved Golden Handle 10") खरेदीकामी M/s. B.L. Lifescience Pvt. Ltd. New Delhi यांचे एकत्रित रु.१,९९,०८०/- मात्र दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---------------------------------------------------------------------------------------------------------
-----------------------

०९ **श्री साईबाबा हॉस्पिटलमधील 10 MBPS Internet Lease Line करिता Hardware खरेदी करणेकामी प्राप्त दरपत्रके उघडणेबाबत. (रु.७,००,०००/-)**

श्रीसाईबाबा हॉस्पिटलमध्ये राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना कार्यान्वीत करणेत आलेली आहे. सदरचे काम हे ऑनलाईन करण्यात येत असुन संगणकीय प्रणालीचे सुरक्षेकरिता हार्डवेअर खरेदीकामी दि. २३.०५.२०१४ रोजीच्या मा. व्य. स. सभेतील विषय क्र. ३७ निर्णय क्र. ३२६ अन्वये हार्डवेअर विहीत पध्दतीने खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु.७,००,०००/- (अक्षरी रुपये सात लाख मात्रचे) खर्चास मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार श्री साईबाबा संस्थानचे वेब साईटवर माहिती तंत्रज्ञान विभागामार्फत निविदा प्रसिध्द करणेत आली होती. सदर निविदा सादर करणेची अंतीम मुदत दि.०५.०९.२०१४ ठेवण्यात आली होती, त्यानुसार सदर कालावधीमध्ये खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

परिशिष्ट “अ”

| अ.नं. | निविदाधारकांचे नांव | आवक नं. | दिनांक |
|---|---|---|---|
| १. | युनिक्युव्ह सोल्युशन्स, पुणे | २७७१ | ०४.०९.२०१४ |
| २. | राका इन्फोटेक प्रा.लि., नाशिक | २८१६ | ०६.०९.२०१४ |
| ३. | गिगाबाईट को-ऑपरेशन, नाशिक | २७७२ | ०५.०९.२०१४ |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या ०३ सिलबंद निविदा आजचे उपसमितीचे सभेत उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| **अ.नं.** | **निविदा सादरकर्त्यांचे नांव** | **निविदेमधील मुळ दर रु.** |
|---|---|---|
| १. | युनिक्युव्ह सोल्युशन्स, पुणे | ३,१९,९७१.४१ |
| २. | राका इन्फोटेक प्रा.लि., नाशिक | **२,८६,८९५/-** |
| ३. | गिगाबाईट को-ऑपरेशन, नाशिक | २,८९,३१९/- |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील 10 MBPS Internet Lease Line करिता Hardware खरेदी करणेकामी राका इन्फोटेक प्रा.लि., नाशिक यांचे रु.२,८६,८९५/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

----------------------------------------------------------------------------------------------------------------------

१० **श्री साईबाबा हॉस्पिटलमधील विविध यु.पी.एस. च्या बॅटरीज बदलणेकामी प्राप्त झालेल्या निविदा उघडून निर्णय होणेबाबत. (रु.५,०७,८५२/-)**

श्री साईबाबा हॉस्पिटलमधील विविध यु.पी.एस.च्या बॅटरीज बदलणेकामी मा. व्य. समिती सभेच्या दि.08/01/2014 चे सभेतील विषय क्र. 18, निर्णय क्र. 17 अन्वये सविस्तर चर्चा होउन विविध यु.पी.एस. करीता Rocket/ Exide या कंपनीच्या बॅटरीज विहीत पध्दतीने निविदा मागवुन खरेदी करणेसाठी व त्यासाठी येणाऱ्या अंदाजे एकुण रू.5,07,852/- चे खर्चास मान्यता मिळाली होती. त्यानुसार वर्तमान पत्रात जाहिरात देउन दि. 24/06/2014 अखेर निविदा मागविण्यात आल्या होत्या. सदरहू निविदाधारकांकडुन 1% अनामत रक्कम मागविण्यात आली होती.

त्यास अनुसरून 04 निविदा प्राप्त झालेल्या होत्या परंतु दोनच निविदा पात्र ठरल्याने दि.23/08/2014 रोजीचे टिपणीवरील आदेशानुसार फेरनिविदा काढणेबाबत सुचना दिलेली आहे.

त्यानुसार विविध वर्तमान पत्रामध्ये सदर निविदा बाबत जाहिरात देण्यात आली होती. सदर निविदा श्री साईबाबा हॉस्पीटलचे बायोमेडीकल इंजिनीअरींग विभागात व श्री साईबाबा संस्थानचे मुंबई कार्यालयात दि. 25/09/2014 ते 07/10/2014 या कालावधीत विक्री साठी ठेवण्यात आल्या होत्या. सदर निविदा स्वीकरण्याची अंतिम तारीख दि. 09/10/2014 ही होती.

तसेच विविध पुरवठाधारक कंपन्यांना इकडील पत्र क्र. 2357/2014, दि. 25/09/2014 अन्वये निविदा बाबत सुचित करणेत आले होते.

1. M/s. Choice Solutions Limited, Pune
2. M/s.Shri Sai Battery Services, Shirdi.
3. M/s. Sai Agro Agencies, Loni
4. M/s.Tejas Electronics, Ahemadnagar.
5. M/s. Exide Point, Ahemadnagar.
6. M/s. Socomac Innovation Power Solutions Pvt.
7. M/s. Silvex Exports Pvt.Ltd.
8. M/s. Southern Bateries Pvt.Ltd. Mumbai.
9. M/s.Simi Electronics, Nagpur.
10. M/s Consul Consolited Pvt.Ltd, Mumbai.
11. M/s Megatech Power Equipments Pvt.Ltd, Pune.

12. M/s. Switching AVO Electro power Ltd, Mumbai

दि. 09/10/2014 अखेरीस खालीलप्रमाणे निविदा प्राप्त झालेल्या आहेत.

1. M/s. Vedant Industrial Services, Aurangabad
2. M/s. Exide Point, Ahemadnagar
3. M/s.Tejas Electronics, Ahemadnagar.

उपरोक्त प्रमाणे प्राप्त झालेल्या ०३ सिलबंद निविदा आजचे उपसमितीचे सभेत उपस्थित निविदाधारकांसमक्ष उघडणेत येऊन, त्यामधील मुळ दरांचा खालीलप्रमाणे तुलनात्मक तक्ता तयार करणेत आला.

| **अ.नं.** | **निविदा सादरकर्त्यांचे नांव** | **मे.एक्साईड पॉईंट, अहमदनगर** | **मे.तेजस इलेक्ट्रॉनिक्स, अहमदनगर** | **मे.वेदान्त इंडस्ट्रीयल सर्व्हिसेस, औरंगाबाद** |
|---|---|---|---|---|
| | | निविदेमधील मुळ दर प्रती नग रु. | निविदेमधील मुळ दर प्रती नग रु. | निविदेमधील मुळ दर प्रती नग रु. |
| 01. | 12V, 18Ah, SMF Batteris 16 Nos. | २२००/- | २०००/- | २०१८.२५ |
| 02. | 12V, 26Ah, SMF Batteris 19 Nos. | ३२००/- | ३०००/- | २७६८.६२ |
| 03. | 12V, 120Ah, SMF Batteris 32 Nos. | १०५००- | १०२००/- | ११३८५.०० |
| | एकूण- | ४,३२,०००/- | <u>४,१५,४००/-</u> | ४,४९,२१५.७८ |

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त तुलनात्मक तक्त्याचे अवलोकन करता, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील विविध यु.पी.एस. च्या प्रस्तावात नमुद केल्याप्रमाणे बॅटरीज बदलणेकामी मे.तेजस इलेक्ट्रॉनिक्स, अहमदनगर यांचे एकूण रु.४,१५,४००/- मात्र निम्नतम दर स्विकारणेत येऊन, त्यांना कार्यादेश देण्यात यावा, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------

११ **श्री साईनाथ रुग्णालयाकरिता Harmonic Scalpel Set च्या Accessories चे दर निश्चित करणेबाबत.**

श्री साईनाथ रुग्णालयामध्ये जनरल ऑपरेशन थिएटर मध्ये दैनंदिन शस्त्रक्रिया करणेकामी उपरोक्त Scalpel Set ची आवश्यकता असते. सदरच्या मशिनमुळे शस्त्रक्रिया करताना त्या Electricity न वापरता Ultra Sonic Energy वापरुन करता येतात. त्यामुळे सर्जरी करते वेळी हे उपकरण रक्तांच्या पेशीचे कमीत कमी नुकसान करते. त्यासाठी खालीलप्रमाणे Harmonic

Scalpel Set चा उपयोग होतो. सदर Harmonic Scalpel श्री साईनाथ रुग्णालयाने दि.26/11/2013 च्या मागणीपत्रान्वये मागणी केलेली आहे.(औषध भांडार प्राप्त दि. 13/02/2014). सदर Harmonic Scalpel Set श्री साईबाबा रुग्णालयात साईभक्त श्री अशोक मिरपुरी यांनी सन 2011 मध्ये देणगी दिलेले आहे.

आता सदरचा Harmonic Scalpel Set साईभक्त श्री सारा साखरानी, न्युयॉर्क यांनी Nissco Surgical, Aurangabad यांचेकडून खरेदी करुन पाठविलेला आहे. सदर Set ची किंमत रु. 13,70,250/- इतकी आहे. सदर Set वापर करत असताना त्यासाठी खालील प्रकारच्या Accessories घ्याव्या लागत असतात.

Accessory Cost

| Sr. No. | Code | Description | Rate Per Pc Taxes Extra |
|---|---|---|---|
| 01. | ACE 36 E | Harmonic ACE Lap probe 36 cm | 39878.00 |
| 02. | NSEAL535RH | Enseal ® Lap Sealer- 35 cm | 36309.00 |
| 03. | NSEALSupJaw | EnSeal ® Device Super Jaw- 22 cm | 38124.00 |

यापुर्वी साईबाबा रुग्णालयात देणगी म्हणून घेतलेल्या Harmonic Scalpel Set साठी लागणाऱ्या Accessories चे दर मा. त्रिसदस्यीय समितीपुढे चर्चा / वाटाघाटी करुन 5 वर्षाकरिता निश्चित करण्यात आलेले आहेत. सदरचे Harmonic Scalpel Set पूर्वीच्या Harmonic Scalpel Set पेक्षा वेगळे Model असून त्यांच्या Acessories वरीलप्रमाणे आहेत. तेव्हा उपरोक्त Acessories चे दर पुढील 5 वर्षाकरिता निश्चित करणेकामी मे. निसको सर्जिकल, औरंगाबाद यांना दर निश्चित करणेकामी चर्चा / वाटाघाटीसाठी बोलविण्यात आलेले आहे.

**श्री साईनाथ रुग्णालयाकरिता Harmonic Scalpel Set च्या Accessories चे दर निश्चितीबाबत चर्चा करणेसाठी मे. निसको सर्जिकल, औरंगाबाद हे आजचे उपसमिती सभेत उपस्थित होते. त्यांनी कोटेशनमध्ये दिलेल्या दरात सवलत देणेस असमर्थतता दर्शविली. त्यांचे दर मुळ किंमत + १२.५% व्हॅटसहीत असे असून पुढील दोन वर्षाकरिता दिलेले आहेत.**

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयाकरिता Harmonic Scalpel Set च्या Accessories चे मे.निसको सर्जिकल, औरंगाबाद यांचे मुळ किंमत + १२.५% व्हॅटसहीत मात्र हे कोटेशनमधील दर पुढील दोन वर्षासाठी स्विकारणेत यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत**

**आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

१२ **शववाहीका वाहन क्र.एमएच- १७/ एजी- २४२० चे बोश फ्युएल पंप दुरुस्ती खर्चाबाबत.**

वाहन विभागाकडील वाहन क्रं.**MH-17-AG-2420** या वाहनाचा वापर हॉस्पिटलकडे शववाहीका म्हणून होत आहे**.** आजअखेर वाहनाचा एकुण **3,3**1,904 कि**.**मी**.** प्रवास झालेला आहे**.** सदर वाहन दि**.19/11/2014** रोजी हॉस्पिटलचे सुचनेनुसार, कै. दादासाहेब अभीराम पाटील ही डेडबॉडी तमनवार ता. चाळीसगांव येथे घेवुन जातेवेळी शिर्डी पेट्रोल पंपाजवळ बंद पडली होती. त्यामुळे डेडबॉडी घेवुन जाण्याची पर्यायी व्यवस्था करुन सदर गाडी वाहन विभागात आणुन □टो इलेक्ट्रीशिअन यांचेमार्फत तपासणी केली असता, वाहनाचे सेन्सर स्विच मध्ये बिघाड असल्याचे प्रथमदर्शी निदर्शनास आले.

सदर वाहन युरो-**III** असलेने उपरोक्त दुरुस्तीचे काम टाटा कंपनीचे □□□□□ डिलर यांचेकडेच करावे लागणार असलेने टाटा कंपनीचे अधिकृत डिलर, शुभयान मोटर्स प्रा.लि., अहमदनगर यांना दुरध्वनीवरुन तातडीने सर्व्हीस टेक्निशियन पाठविणेची विनंती केली. त्यानुसार दि.20/11/2014 रोजी शुभयान मोटर्स प्रा.लि., अहमदनगर यांचे टेक्निशियन मार्फत संगणकीय तपासणी केली असता. वाहनाचे बोश फ्युएल पंपाची दुरुस्ती व सर्व्हीसींग करावी लागेल असे सांगितले. शुभयान मोटर्स प्रा.लि., अहमदनगर चे टेक्निशियन यांचे मार्गदर्शनानुसार, वाहनाचा बोश फ्युएल पंप खोलुन बोशपंप मायको कंपनीचे अधिकृत डिलर, गल्फ फ्युल इंजेक्शन सर्व्हीसेस, अहमदनगर यांचेकडे तातडीची व अत्यावश्यक बाब म्हणून संस्थान वाहनाने मेकॅनीक सोबत दि.21/11/2014 रोजी फ्युएल पंप दुरुस्ती करीता पाठविण्यात आला. सदर फ्युएल बोश पंप दुरुस्तीचे कामाकरीता आलेल्या खर्चाचा तपशील खालील प्रमाणे.

| **अ.नं.** | **पार्टीचे नांव** | **बिल नं./दिनांक** | **रक्कम (रु.)** |
|---|---|---|---|
| 01 | गल्फ फ्युल इंजेक्शन सर्व्हीसेस, अहमदनगर | B000000535-21/11/2014 | 32,937.00 |
| | **एकुण रक्कम (रु.)** | | **32,937.00** |

उपरोक्त प्रमाणे शववाहीका वाहनाचे फ्युएल पंप दुरुस्ती कामी रु.32,937/- (अक्षरी रक्कम रु. बत्तीस हजार नऊशे सदोतीस) मात्र खर्च आलेला आहे

**मागणी:-** शववाहीका वाहनाचे बोश पंप दुरुस्ती कामाकरीता तातडीची व अत्यावश्यक बाब झालेल्या रु.32,937/- (अक्षरी रक्कम रु. बत्तीस हजार नऊशे सदोतीस) मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, वाहन विभागाकडील शववाहीका वाहन क्र.एमएच- १७/ एजी- २४२० चे बोश फ्युएल पंप दुरुस्ती करणेतातडीचे व अत्यावश्यक असल्यामुळे केलेल्या कार्यवाहीस व त्याकामी आलेल्या रु.३२,९३७/- मात्रचे खर्चास कार्योत्तर मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- वाहन विभागप्रमुख)

---------------------------------------------------------------------------------------------------------------------------

१३ **श्री साईप्रसादालयाचे मुख्य प्रसाद भोजन हॉल, व्ही.आय.पी. हॉल तसेच आय.टी. विभाग व त्या शेजारील हॉलमध्ये सिलींग फॅन बसवून वायरींगचे काम करणेबाबत.**

अधिनियम २००४ मधील तरतूद क्र.२१-१ (क) नुसार समितीकडून विश्वस्तव्यवस्था निधीचा विनियोग पुढील सर्व किंवा त्यापैकी कोणत्याही प्रयोजनासाठी करण्यात येईल :-

(क) मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन

वरील अधिनियमास अनुसरुन खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर करीत आहोत.

मा.प्रशासकीय अधिकारी, श्री.बी.डी.साबळे यांनी दि.३१-०८-२०१४ रोजी श्री साई प्रसादालयामध्ये पर्यवेक्षक, श्री.बापूसाहेब शिंदे यांचे समवेत राऊंड घेतला होता. प्रसादालयाचे मुख्य प्रसाद भोजन हॉल, व्हीआयपी हॉल तसेच आय.टी.विभाग व त्या शेजारील हॉल याठिकाणी डोम असल्या कारणाने सिलींग फॅन बसविण्यात आलेले नाही. याठिकाणी सिलींग फॅन नसल्याने भक्तांना प्रसाद घेतेवेळी गरम होते. त्याठिकाणी सिलींग फॅन बसविल्यास भक्तांना गरम होणार नाही, असे प्रशासन शाखा,□□□□□ जा.नं.२६५२ दि.१५-०९-२०१४ चे पत्रान्वये कळविले आहे.

श्री साई प्रसादालयाचे मुख्य प्रसाद भोजन हॉलमध्ये मध्यभागी ०६ नग डोम तसेच व्हीआयपी हॉल, आय.टी.विभाग व त्या शेजारील हॉलमध्ये ०६ नग डोम असे एकुण १२ नग डोम आहेत. डोमची उंची जास्त असल्याने डोम मध्ये सिलींग फॅन हे हॅगींग पाईपवर डोमच्या गल्डरवर हूक वेल्डींग करुन टांगावे लागणार आहे. तसेच वायरींगचे पाईपसाठी डोमच्या गल्डरवर स्पेअर वेल्डींग करावे लागणार आहे. एका डोममध्ये अंदाजे १२ नग सिलींग फॅन याप्रमाणे १२ डोमध्ये एकुण १४४ नग सिलींग फॅन बसवून वायरींगचे काम करावे लागणार आहे. सिलींग फॅन बसवून कराव्या लागणा-या वायरींग कामाचा तपशील खालीलप्रमाणे.

| Sr.No. | C.S.R.No. | Description | Qty. | Rate | Amount |
|---|---|---|---|---|---|
| 01) | 1-2-7 | Supplying and erecting rigid PVC conduit 20 mm dia.with PVC accessories on wall/ ceiling (Welding of Spacer if required) as per | 864 Mtr. | Rs. 60.90 | Rs. 0,52,617.60 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | specification No:WG-MA/CON, para no. 1.1.1. | | | |
| 02) | 1-3-3 | Supplying & erecting mains with 2x1.5 sq.mm F.R copper PVC insulated wire laid in provided conduit/trunking/inside pole/Bus bars or any other places as per specification No: WG-MA/BW | 900 Mtr | Rs. 56.70 | Rs.0,51,030.00 |
| 03) | 1-3-29 | Supplying PVC insulated PVC round sheathed 1.5 sq.mm (30 no. x 0.25 mm dia.) 3 core flexible multi stranded copper Industrial cable | 720 Mtr | Rs. 48.30 | Rs. 0,34,776.00 |
| 04) | 1-7-7 | Supplying and erecting ISI mark Ceiling rose erected on Filled polypropylene ISI marked (IS:14772-2000) board or polished double wooden block/ ISI mark PVC junction box. | 144 Nos. | Rs.32.55 | Rs. 0,04,687.20 |
| 05) | 2-12-3 | Supplying and erecting fan clamp of 30 x 5 mm. M.S. flat of required length and 10 mm. M.S. bolt and nuts erected with necessary hook of 10 mm. M.S. round bar and painted. | 144 Nos. | Rs.186.90 | Rs. 0,26,913.60 |
| 06) | 2-12-6 | Supplying and erecting 'B' grade G.I.pipe/ M.S. pipe down rod duly painted for fan complete erected with PVC two core flexible cable 24/0.2 mm copper PVC wire. | 300 Mtr. | Rs.202.65 | Rs. 0,60,795.00 |
| 07) | 2-13-4 | Supplying and erecting regular/ standard model Ceiling fan of 1400 mm. sweep complete erected in position as per specifcation no. FG | 144 Nos. | Rs.1993.95 | Rs. 2,87,128.80 |
| 08) | 5-3-3 | Supplying, erecting & marking SPMCB 6A to 32A, C-series (for lighting) in provided distribution board as per specification No. SW-SWR/MCB | 144 Nos | Rs.170.10 | Rs. 0,24,494.40 |
| 09) | 5-4-7 | Supplying and erecting triple pole and neutral distribution board (TPNDB) with door surface/flush mountedSPMCB of 12 ways, on iron frame/wooden board as per specification No. SWSWR/ MCBDB | 12 Nos | Rs.2682.75 | Rs. 0,32,193.00 |
| 10) | 5-6-6 | Providing, erecting & commissioning RCCB only of electro magnetic type with 30/100/300 mA sensitivity and having capacity of 63 A. 4 pole complete as per specification No. SW-RCCB/RCCB | 12 Nos | Rs.3222.45 | Rs. 0,38,669.40 |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 11) | 16-5-4 | Supplying and erecting ISI mark G.I.pipe 32 mm dia.'B' class duly painted for fan complete erected with PVC two core flexible cable 24/0.2 mm copper PVC wire. | 500 Mtr. | Rs. 326.55 | Rs1,63,275.00 |
| | | | | Total | Rs.7,76,580.00 |

उपरोक्तप्रमाणे श्री साई प्रसादालयाचे मुख्य प्रसाद भोजन हॉल, व्हीआयपी हॉल तसेच आय.टी.विभाग व त्या शेजारील हॉलमध्ये सिलींग फॅन बसविणेकामी तसेच त्यास लागणारे वायरींगचे काम करणेकामी अंदाजे रक्कम रुपये ७,७६,५८०/- इतका खर्च अपेक्षित आहे. सिलींग फॅन बसवून वायरींगचे काम करणेकामी येणा-या खर्चास, वर्तमानपत्रात जाहिरात देऊन व संस्थानचे वेबसाईटवर ही जाहिरात अपलोड करुन टेंडर मागविणेस मान्यता मिळावी, ही विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई प्रसादालयाचे मुख्य प्रसाद भोजन हॉल, व्हीआयपी हॉल तसेच आय.टी.विभाग आणि त्या शेजारील हॉलमध्ये सिलींग फॅन बसविणे व त्यास लागणारे वायरींगचे काम करुन घेणेकामी वर्तमानपत्रामध्ये व संस्थानचे संकेतस्थळावर जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.७,७६,५८०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- विद्युत विभागप्रमुख)

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------

------------------------

**१४ श्री साईप्रसादालयातील पूर्व बाजुस इमारतीचे भिंतीला लागून तसेच उत्तर बाजूस गेट तयार करणेबाबत.**

दिनांक 12/10/2014 व दिनांक 08/11/2014 रोजी मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांनी श्री साई प्रसादालयामध्ये राऊंड घेऊन कामाची पहाणी केली, त्यानुसार एसएसएस/वशी-प्रसादा/83/2014 दिनांक 08/11/2014 चे पत्रान्वये अधिक्षक, प्रसादालय यांनी सदरचे राऊंडमध्ये मा. कार्यकारी अधिकारी साहेब यांनी पुढील सूचना दिले असलेबाबत कळविले आहे.

1) प्रसादालयाचे आतमध्ये फक्त संस्थान कामाशी निगडीत असलेली वाहने व कर्मचाऱ्यांच्या दुचाकी चारचाकी गाड्याचे आतमध्ये जाणेकरीता, श्री साई प्रसादालयाचे पूर्व बाजुस मुख्य् इमारतीचे भिंतीला लागून उप-भांडारकडे जाणाऱ्या रस्त्यामध्ये प्रत्यक्ष पाहणी करुन स्लायडींग गेट टाकणे.
2) प्रसाद भोजन घेतल्यानंतर बाहेर जाणारे भक्त् पश्चिम बाजूनेच बाहेर पडण्यासाठी, श्री साई प्रसादालयाचे उत्तर बाजूस बाहेर जाण्याचे गेटला लागून उत्तर– दक्षिण स्लायडींग गेट टाकणे.

उपरोक्त् दोन्ही ठिकाणी प्रत्यक्ष पहाणी केली असता, सध्या प्रसादालयात असलेल्या गेट प्रमाणेच आणखी दोन गेट तयार करणेसाठी खालीलप्रमाणे मटेरिअल अपेक्षीत आहे.

| अ.नं. | तपशील / साईज | मागणी | अंदाजे दर | रक्क्म |
|---|---|---|---|---|
| 1. | आयताकृती पाईप Size - 75 x 40 x 3 mm | 475 | 60/- | 28,500/- |
| 2. | स्क्वेअर पाईप Size – 15 x 20 x 3 mm | 900 | 55/- | 49,500/- |
| 3. | ½” एम.एम. पट्टी Size – 25 mm x 3 mm | 80 किलो | 55/- | 4,400/- |
| 4. | 2” एम.एम. राऊंड मेल-फिमेल बिजागरी | 8 नग | 150/- | 1,200/- |
| 5. | हॅन्ड्रफ | 4 नग | 400/- | 1,600/- |
| 6. | एशियन मेक काळा कलर | 10 | (2 लि.) | 1,350/- |
| | | | एकूण रुपये: | 86,550/- |

उपरोक्तप्रमाणे श्री साई प्रसादालयात स्लायडींग गेट तयार करणेकामी अंदाजे रुपये 86,550.00 खर्च अपेक्षित आहे. सदरचे गेट संस्थानचे वर्कशॉपमध्ये तयार करण्यात येणार आहे. तथापि गेट बनविणेसाठी इकडील विभागाकडे मटेरिअल शिल्ल्क नाही. वार्षिक मटेरिअलची खरेदीही करण्यात आलेली नसल्याने भांडार विभागातही मटेरिअल शिल्ल्क नाही. मटेरिअल खरेदी बाहेरील पुरवठाधारक यांचेकडून कोटेशन बोलावून खरेदी करावे लागणार आहे. तरी याकामी कोटेशन बोलाविणेस तसेच मटेरिअल खरेदीकामी येणाऱ्या रुपये 86,550/- मात्रचे खर्चास मान्यता मिळणेस मा. त्रिसदस्यीय समितीची सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईप्रसादालयातील पूर्व बाजुस इमारतीचे भिंतीला लागून तसेच उत्तर बाजूस गेट तयार करुन बसविणेसाठी प्रस्तावात नमुद केलेले साहित्य खरेदी विहीत पध्दतीने निविदा मागवून खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.८६,५५०/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- मेकॅनिकल विभागप्रमुख)

१५ **चेंबरवरील झाकणे खरेदी करणेबाबत.**

**श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद:-** २१ (१) चा (क)- मंदिराची व विश्वस्तव्यवस्थेच्या मालमत्तांची देखभाल, व्यवस्थापन व प्रशासन.

**प्रस्तावना**:- उपरोक्त विषयांकित संदर्भान्वये आरोग्य विभाग, साईधर्मशाळा विभाग व साईआश्रम भक्तनिवास विभागाकडील टिपण्या इकडील विभागास प्राप्त झालेल्या आहेत. सदर टिपणीन्वये त्यांनी संस्थान परिसरातील ब-याच ठिकाणीची चेंबर झाकणे तुटलेली असल्याने, त्यामुळे संस्थान परिसरात दुर्गंधी पसरुन साईभक्तांना त्रास सहन करावा लागत आहे. याकरीता पाणी पुरवठा विभागाकडुन तुटलेली चेंबर झाकणे बदलून मिळणेबाबत कळविलेले आहे.

**प्रस्ताव**:- याबाबत पाणीपुरवठा विभागाकडुन प्रत्यक्ष पाहणी केली असता, ब-याच ठिकाणची चेंबर झाकणे तुटलेली असल्याने ती बदलविणे गरजेचे आहे. सद्यस्थितीत काही ठिकाणी पाणी पुरवठा विभागाकडे उपलब्ध असलेली चेंबर झाकणे बसविण्यात आलेली आहेत. परंतू ब-याच ठिकाणी झाकणे बदलविणे गरजेचे असल्याने ती खरेदी करावी लागतील. त्यानंतर पाणी पुरवठा विभागांतर्गत चेंबर झाकणे बसविणेचे काम करता येईल.

**खरेदी करावयाच्या चेंबर झाकणांचा (फ्रेमसह) तपशिल खालीलप्रमाणे.**

| अं.नं. | तपशिल | परिमाण | नग | अंदाजे दर | एकुण रुपये |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | २४"x ३६"x ३" | HD | ४३ | २१००/- | ९०,३००/- |
| ०२ | २४"x २४"x ३" | HD | २६ | १६००/- | ४१,६००/- |
| ०३ | ३६"x ३६"x ३" | HD | १९ | २९००/- | ५५,१००/- |
| ०४ | १८"x २४"x ३" | HD | ०७ | १४००/- | ९,८००/- |
| ०५ | १८"x १८"x ३" | HD | १५ | १०००/- | १५,०००/- |
| ०६ | १८" x ३६"x ३" | HD | ११ | १८००/- | १९,८००/- |
| ०७ | १४"x २०"x १.५" | LD | ०२ | ६००/- | १,२००/- |
| ०८ | १६"x २२"x १.५" | LD | ०१ | ४००/- | ४००/- |
| ०९ | १२"x १२"x २" | MD | ०१ | ३००/- | ३००/- |
| १० | ३०"x ४२"x ३" | HD | ५० | ३५००/- | १,७५,०००/- |
| ११ | २७"x २७"x ३" | HD | ४० | २७००/- | १,०८,०००/- |
| १२ | राऊंड (गोल) झाकणे. २१" व्यास x ३" जाड | HD | २० | ३२००/- | ६४,०००/- |
| | | | | एकुण- | ५,८०,५००/- |

| | |
|---|---|
| व्हॅट-१२.५ %- | ७२,५६२.५० |
| **एकुण पुर्णांकित रक्कम-** | **६,५३,०६३/-** |

**विभागाचे स्पष्ट मत/ अभिप्राय:-** याकामी श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था (शिर्डी) अधिनियम २००४ कलम २१ (१) चा (क) मध्ये नमुद केलेल्या तरतुदीनुसार, मा.त्रिसदस्यीय समितीची मान्यता घेतल्यानंतर सदरचे काम करता येईल असे मत आहे.

तरी वरील नमुद चेंबर झाकणे (फ्रेमसह) खरेदी करणेसाठी अंदाजे रु. ६,५३,०६३/- मात्र खर्च अपेक्षित आहे. तरी सदरची चेंबर झाकणे (फ्रेमसह) विहीत पध्दतीने निविदा मागवून खरेदी विभागामार्फत खरेदी करणेस व त्यासाठी येणारे अंदाजे **रु. ६,५३,०६३/-** मात्रचे खर्चास मान्यता मिळावी ही विनंती.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे चेंबर झाकणे (फ्रेमसह) खरेदी करणेसाठी विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व त्यासाठी येणा-या अंदाजे रु. ६,५३,०६३/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- पाणीपुरवठा विभागप्रमुख)

---

१६ **गरोदर मातांसाठी आवश्यक असणा-या Non Stress Test चे दर ठरविणेबाबत.**

श्री साईबाबा संस्थान चे श्री साईनाथ रुग्णालयामध्ये गोरगरीब रुग्णावर माफक (नाममात्र) दरामध्ये उपचार तसेच शस्त्रक्रिया केलेल्या जातात. तसेच इतर आवश्यकत्या तपासण्या/चाचण्या केल्या जातात.

आता संस्थानचे श्री साईनाथ रुग्णालयामध्ये "गरोदर माता तपासणीसाठी ( Non Stress Test ) मशिन खरेदी केलेले आहे. सध्य स्थिती मध्ये सदर मशिनचा वापर चालू केला आहे. सदर तपासणीचे दर ठरविण्यात आलेले नसल्याने सध्या त्याचे दर आकारले जात नाहीत. दिवसेंदिवस सदर मशिनचा वापर चांगल्या प्रमाणात होत असून त्याचा उपयोग श्री साईनाथ रुग्णालयातील गायनिक विभागाचे वैद्यकिय अधिकारी तसेच संबंधीत रुग्णाना त्याचा फायदा होत आहे.

सदर मशिन मध्ये बाळाचे हृदयाचे ठोके, बाळाची हालचाल पहाता येते, तसेच बाळाच्या हृदयाच्या ठोक्यांचा आलेख काढता येतो.

संस्थान रुग्णालयामध्ये करण्यात येणारे उपचार, शस्त्रक्रिया, तपासण्या/चाचण्या केल्या जातात त्यांचे दरपत्रक तयार करण्यात आलेले आहे. तथापी दरपत्रकामध्ये उपरोक्त Non Stress Test दर ठरविण्यात आलेले नाहीत. सदर बाबतचे दर ठरविणे आवश्यक असल्याने Non Stress Test चे

दराबाबत खाजगी हॉस्पीटल तसेच प्रवरा मेडीकल ट्रस्ट, लोणी या ठिकाणी दूरध्वनीवरुन चौकशी केली असता त्याचेकडे खालीलप्रमाणे त्यांनी तोंडी दर खालील प्रमाणे सांगितले आहेत.

01) प्रवरा रुरल हॉस्पीटल लोणी रु. 125/- प्रति तपासणी

02) डॉ. गोंदकर हॉस्पीटल,शिरडी रु. 300/- प्रति तपासणी

सदर बाबत साईनाथ रुग्णालयामध्ये गोरगरीब रुग्ण तपासणी तसेच उपचारासाठी येत असल्याने व श्री साईनाथ रुग्णालय हे धर्मादाय असल्यासने सदर Non Stress Test चे दर कमीतकमी प्रति तपासणी रु.100/- प्रमाणे आकारणेबाबत निर्णय होणेस विनंती.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, गरोदर मातांसाठी आवश्यक असणा-या Non Stress Test चे दर प्रति तपासणी रु.१२५/- मात्र आकारणेत यावे, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय अधिक्षक)

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------

१७ **श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता वैद्यकिय संचालक यांना असलेल्या दरमहा तातडीचे औषधे/ सर्जिकल साहित्य खरेदीची रक्कम रु.१,५०,०००/- वरुन रु.३,००,०००/- मात्र करणेबाबत.**

<u>**अधिनियम २००४ मधील तरतुद –**</u> १७ (२) ण

<u>**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. –**</u> नवीन प्रस्ताव

<u>**प्रास्ताविक –**</u> श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात दरवर्षी लागणारे विविध प्रकारचे औषधे / सर्जिकल साहित्य इ. विहित पद्धतीने संबंधित विभागाकडून मागणी घेऊन निविदा मागवून एक वर्षाकरिता दर निश्चित करुन घेण्यात येत असतात व त्या दरानुसार जशीजशी लागेल तशी तसेच अतिरिक्त साहित्य संबंधित पुरवठाधारकांकडून खरेदी करण्यात येत असतात.

परंतु ब-याच वेळा कधी काही औषधे वेळेत उपलब्ध होत नाहीत, वाहतुकीमध्ये असतात, काही वेळेस कंपनीमध्ये त्यांचे उत्पादन बंद पडते किंवा कधी कधी काही विशिष्ट प्रकारच्या रुग्णांना विशिष्ट प्रकारची औषधे / सर्जिकल साहित्य तेवढ्यापुरतीच लागतात जी वार्षिक मागणी मध्ये नसतात, तसचे कधी कधी विशिष्ट प्रकारचे साथीचे आजार येणे उदा. चिकनगुण्या, डेंग्युचा ताप, प्रथमोपचार केंद्रात लागणारी औषधे इ. कारणास्तव काही नवीन औषधे किंवा पुरवठा आदेश दिलेला आहे परंतु उपलब्ध होण्यास वेळ लागणार आहे इ. कारणास्तव रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून तातडीचे औषधे / सर्जिकल साहित्य खरेदी करावे लागते त्यासाठी मा. व्यवस्थापन मंडळाने वैद्यकीय संचालक यांना आतापर्यंत वेळोवेळी काही विशिष्ट रकमेच्या मर्यादेपर्यंत

तातडीने औषधे खरेदी करण्याचे अधिकार दिलेले आहेत. त्यासंबंधी खालीलप्रमाणे निर्णय पारित झालेले आहेत –

१) श्री साईनाथ रुग्णालयाचे ऑपरेशन थिएटर विभाग, विविध वॉर्ड, बाह्यरुग्ण विभाग इ. विभागाकरिता सर्जिकल मटेरियल, औषधे इत्यांदीची तातडीने आवश्यकता भासल्यास ती औषधे वैद्यकीय अधिक्षक यांना असलेल्या दरमहा रु. १०,०००/- चे तरतुदीतुन करण्यात येत होती.

२) तसेच श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाचे प्रयोगशाळा, ऑपरेशन थिएटर विभाग व बाह्यरुग्ण विभाग इ. विभागाकरिता सर्जिकल मटेरियल, औषधे इत्यादींची तातडीने आवश्यकता आहे, अशी औषधे / सर्जिकल साहित्य प्रशासन शाखा जा.क्र.एसएसएस/वशी-०१/१९४४/२००६ दि. १७/०७/२००६ अन्वये वैद्यकीय संचालक यांना दरमहा रु. २५,०००/- पर्यंतच्या दिलेल्या औषध खरेदीचे अधिकारात करण्यात येत होती.

३) मा. व्यवस्थापन समिती सभा दि.०३/०६/२००६ निर्णय क्र.३४८ नुसार वैद्यकीय संचालक यांना दरमहा रु. १,००,०००/- पर्यंत तातडीचे औषधे खरेदी करण्याचे अधिकार देण्यात आलेले होते.

४) तसेच मा. व्यवस्थापन समिती सभा दि. १८/१०/२००८ निर्णय क्र. ७५९(२८-८) अन्वये वैद्यकीय संचालक यांनी त्यांचे अधिकारात तातडीची खरेदी करण्यात यावी, असे ठरले आहे. त्यानुसार दरमहा तातडीची औषधे / सर्जिकल साहित्य खरेदी करण्यात येते.

प्रत्येक खरेदीच्या वेगवेगळया मंजुरी घेणे, त्यांचे रेकॉर्ड ठेवणे, तसेच तपासणी करणे इत्यादीकामी अवघड होते, त्यामुळे अशा प्रकारच्या तातडीच्या खरेदीकामी कुठल्याही एकाच अधिकाराचा वापर करणे योग्य राहील असे अंतर्गत लेखापरिक्षक यांनी दि. ०८/०२/२०११ रोजी औषध भांडारात तपासणीच्या वेळी सुचना केलेल्या आहेत.

संस्थानचे दोन्ही रुग्णालयात वेगवेगळ्या प्रकारची औषधे लागत असतात, त्यामध्ये श्री साईबाबा रुग्णालयाचे कार्डियाक/ कॅथलॅब/ न्युरो/ आय.सी.सी.यु. इत्यादी विभागासाठी महागडी साहित्य लागत असतात.

आतापर्यंतच्या अनुभवानुसार महिन्यात पुर्णतः तिन्ही प्रकारचे मंजुरी मिळून होणारी एकूण रक्कम रु. १,३५,०००/- पेक्षा कमी होते, तर कधी रु. १,३५,०००/- पेक्षा जास्त होते. त्यामुळे वैद्यकीय संचालक यांना एकाच प्रकारचे सध्याचे रु. १,००,०००/- एैवजी रु. १,५०,०००/- (रु. एक लाख पन्नास हजार मात्र) पर्यंतचे अधिकार दिल्यास नियमीत खरेदी करुन बीले अदा करता येईल व हिशोब ठेवणे

देखील सोईचे होईल तर रु. १,५०,०००/- पेक्षा जास्त रक्कम झाल्यास त्याची खरेदी करुन व बीले अदा करुन नोंद घेण्यासाठी मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे ठेवता येईल.

त्यानुसार सदर प्रस्तावास दि. २६/०३/२०११ रोजीचे मा. त्रिसदस्य समितीचे निर्णय क्र. २५४ अन्वये मान्यता मिळून त्याप्रमाणे सध्या रु. १,५०,०००/- चे तरतुदीतुन तातडीचे औषधे खरेदी करणेची कार्यवाही करण्यात येत आहे.

परंतु सध्या दोन्ही रुग्णालयात राजीव गांधी जीवनदायी योजना कार्यान्वित झालेली आहे. सदर योजनेअंतर्गत होणा-या शस्त्रक्रिया व उपचार चालु असताना रुग्ण पुर्ण बरा होऊन डिस्चार्ज दिल्यानंतर एक वर्षाची औषधे मोफत द्यावी लागतात. त्यामुळे औषधांचा खप हा वाढलेला आहे, तसेच कधी कधी काही साथीचे आजार आल्यास किंवा एैनवेळेस ठरलेली शिबीरे, प्रथोमोपचार केंद्र या ठिकाणी लागणारी औषधे, अपघात कक्षात येणा-या जास्त प्रमाणातील रुग्णांची संख्या, विशिष्ट प्रकारची नविन शस्त्रक्रिया इ. कारणास्तव सध्या असलेली रक्कम रु. १,५०,०००/- ची तरतुद कमी पडत आहे. त्यामुळे वैद्यकीय संचालक यांना असलेली रु. १,५०,०००/- ची तरतुद वाढवून ती रु. ३,००,०००/- पर्यंत केल्यास रुग्णांच्या उपचारांची गैरसोय कमी प्रमाणात होईल तेंव्हा सदरचा प्रस्ताव मान्यतेसाठी मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे ठेवण्यास मान्यता असावी.

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान–** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण)अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत–** सध्या दोन्ही रुग्णालयात राजीव गांधी जीवनदायी योजना कार्यान्वित झालेली आहे. सदर योजनेअंतर्गत होणा-या शस्त्रक्रिया व उपचार चालु असताना रुग्ण पुर्ण बरा होऊन डिस्चार्ज दिल्यानंतर एक वर्षाची औषधे मोफत द्यावी लागतात. त्यामुळे औषधांचा खप हा वाढलेला आहे, तसेच कधी कधी काही साथीचे आजार आल्यास किंवा एैनवेळेस ठरलेली शिबीरे, प्रथोमोपचार केंद्र या ठिकाणी लागणारी औषधे, अपघात कक्षात येणा-या जास्त प्रमाणातील रुग्णांची संख्या, विशिष्ट प्रकारची नविन शस्त्रक्रिया इ. कारणास्तव सध्या असलेली रक्कम रु. १,५०,०००/- ची तरतुद कमी पडत आहे. त्यामुळे वैद्यकीय संचालक यांना असलेली रु. १,५०,०००/- ची तरतुद वाढवून ती रु. ३,००,०००/- पर्यंत केल्यास रुग्णांच्या उपचारांची गैरसोय कमी प्रमाणात होईल तेंव्हा सदरचे प्रस्तावास मान्यता असावी.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता वैद्यकिय संचालक यांना असलेल्या दरमहा तातडीचे औषधे/ सर्जिकल साहित्य खरेदीची रक्कम रु.१,५०,०००/- मात्र ऐवजी रु.३,००,०००/-**

**मात्र करणेस मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

१८ **श्री साईबाबा हॉस्पिटलमधील दंत विभागाकरिता योग्य ते साहित्य बनविणेकामी दर निश्चित करणेबाबत.**

श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये दंत विभाग स्वतंत्र भाग असून त्यात रुग्णांची तपासणी केल्यानंतर त्यांना आवश्यक असलेले दाताची कवळी व इतर दंत विषयक अथवा दंत सौंदर्य वर्धक साहित्याची योग्य ती मोजमापे घेवून त्यानुसार प्रचलित दराने योग्य ती फी रुग्णामार्फत हॉस्पिटलमध्ये भरणा केल्यानंतर सदर साधने लॅब मधून बनवून घेवून, ती संबंधित रुग्णास देण्यात येतात.

श्री साईबाबा रुग्णालयामधील दंत विभागातील रुग्णांचे कृत्रीम साचा तयार करणे व सामुग्री पुरविणेकामी दि. ०१.१२.२०१२ चे मंजूर टिपणी अन्वये विहीत पद्ध्तीन कोटेशन मागवून खरेदी करणेस मान्यता मिळालेली होती.

त्यानुसार विहीत पध्दतीने कोटेशन मागवून निम्नतम दराने मे. सह्याद्री डेन्टल सिरॅमीक, लोणी खुर्द यांना इकडील पत्र क्रमांक २८३५ दि. ०३.०९.२०१३ रोजीचे पत्रान्वये पुरवठा आदेश देण्यात आला होता.

सन २०१३-१४ साली (दि. ०३.०९.२०१३ ते ०२.०९.२०१४ पर्यंत) दंत व दंत साहित्य बनवण्याचे काम मे. सह्याद्री डेन्टल सिरॅमीक, लोणी खुर्द यांना देण्यात आले होते. पुर्ण वर्षभर मे. सह्याद्री डेन्टल सिरॅमीक, लोणी खुर्द यांनी चांगल्या प्रकारची सेवा व दर्जाचे साहित्य मागणी प्रमाणे दिलेले आहे. त्याचा विचार करुन पुढील एक वर्षासाठी देखील त्याच मंजूर दराने मे.सह्याद्री डेन्टल सिरॅमीक, लोणी खुर्द हे काम करण्यास तयार आहे किंवा कसे? या बाबद विचारणा करण्यात आली होती. त्यांनी दि. ०१.०८.२०१४ चे पत्रा अन्वये मागील मंजूर दरांप्रमाणे दंत व दंत साहित्य पुरविणेचे काम करुन देणेस मान्य केले होते.

त्यानुसार दि.२७.०८.२०१४ रोजीचे मंजूर टिपणी अन्वये पुढील तीन महिण्यांकरिता मुदत वाढ मिळणेबाबतचा प्रस्ताव मान्यतेसाठी ठेवण्यात आला होता. त्यानुसार पुढील तीन महिने मुदतवाढ देणेस व याकामी येणाऱ्या रक्कम रु. २५०००/- चे खर्चास मान्यता मिळाली होती.

परंतु दंत विभागाने दि.०९.०९.२०१४ चे पत्रा अन्वये दंत विभागात अजून काही नवीन उपचार पध्दती कार्यान्वीत करावयाची आहे व त्याकरिता देखील दर करार करण्यात यावा असे कळविलेले आहे. तेव्हा सध्या करत असलेल्या व त्यांनी नविन मागणी केलेल्या साहित्याची पुन्हा निविदा मागविण्यात येईल.

तरी सोबतच्या तक्त्याप्रमाणे साहित्य बनविणेकामी अंदाजे रुपये ३,०२,८००/- (अक्षरी रु. तीन लाख दोन हजार आठशे) पर्यंत खर्च अपेक्षीत आहे.

तरी सोबतच्या तक्त्याप्रमाणे दंत साहित्य बनविणेकामी वर्तमान पत्रात जाहिरात देऊन निविदा मागवण्यास, तसेच याकामी येणाऱ्या अंदाजे रुपये ३,०२,८००/- (अक्षरी रु. तीन लाख दोन हजार आठशे) चे खर्चास व साहित्य बनवून घेण्यास मान्यता असावी.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमधील दंत विभागाकरिता आवश्यक असलेले साहित्य बाहेरील लॅबमधून बनवून घेणेकामी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात प्रसिध्द करणेत येऊन, विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.३,०२,८००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

-----------------------------------------------------------------------------------------------------------

--------------------------

१९ **श्री साईबाबा रुग्णालयातील कॅज्युअल्टी विभागाकरिता ई.सी.जी. मशिन खरेदीबाबत.**

**<u>अधिनियम २००४ मधील तरतुद –</u>** १७ (२) ण

**<u>प्रास्ताविक –</u>** श्री साईबाबा रुग्णालयाचे कॅज्युअल्टी विभागाने एक नग १२ Channel ई.सी.जी मशिनची मागणी केलेली आहे. तेथे सध्या वापरत असलेले मशिन सध्या व्यवस्थित काम देत आहे, परंतु रुग्णांच्या वाढत्या संख्येमुळे मशिनवर येणारा कामाचा ताण इ. चा विचार करता ते कोणत्याही क्षणी बंद पडू शकते, त्यामुळे त्यांनी अजुन एक नवीन मशिनची मागणी केलेली आहे. सध्याचे मशीन जर ऐनवेळेस बंद पडले तर कामाची गैरसोय होईल याकरिता एक पर्यायी मशिन उपलब्ध असणे योग्य राहील. दरवर्षी सरासरी सदर विभागात १२ - १५,००० रुग्णांचे ई.सी.जी. होतात. त्यामुळे पर्यायी मशिन खरेदी करणे गरजेचे आहे. श्री साईनाथ रुग्णालयाचे ई.सी.जी. विभागाकरिता एक नग ई.सी.जी. मशिन विहित पद्धतीनेनिविदा मागवून खरेदीचा प्रस्ताव मा. त्रिसदस्य समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर केलेला आहे. सदर खरेदीचे वेळेस अजुन एक नग संख्या वाढवून घेऊन ई.सी.जी. मशिन खरेदी करता येईल.

सदर मशिन खरेदीकामी अंदाजे रक्कम रु. १,००,०००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

**<u>मागणी–</u>** श्री साईबाबा रुग्णालयातील कॅज्युअल्टी विभागाचे दि. १२/११/२०१४ रोजीचे मागणीपत्र (औषध भांडार विभाग प्राप्त दि. १४/११/२०१४).

**<u>संस्थान अधिनियम /ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान –</u>** अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणा-या

किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहाय्य करणा-या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे दोन धर्मदाय रुग्णालय चालविण्यात येतात.

**<u>विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत –</u>** रुग्णांच्या वाढत्या संख्येमुळे मशिनवर येणारा कामाचा ताण इ. चा विचार करता ते कोणत्याही क्षणी बंद पडू शकते, त्यामुळे त्यांनी अजुन एक नवीन मशिनची मागणी केलेली आहे. सध्याचे मशीन जर ऐनवेळेस बंद पडले तर कामाची गैरसोय होईल याकरिता एक पर्यायी मशिन उपलब्ध असणे योग्य राहील. त्यामुळे नवीन मशिन खरेदी करणेस हरकत नाही.

तरी सदरचे ०१ नग ई.सी.जी. मशिन श्री साईनाथ रुग्णालयाचे ई.सी.जी. विभागाकरिता एक नग ई.सी.जी. मशिन खरेदीचे वेळेस एक नग संख्या वाढवून घेण्यास व याकामी येणा-या अंदाजे रक्कम रु. १,००,०००/- चे खर्चास मान्यता असावी.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयाकडील ई.सी.जी. विभागाकरिता ०१ नग ई.सी.जी. मशिन खरेदी करते वेळी श्री साईबाबा रुग्णालयातील कॅज्युअल्टी विभागाकरिता आवश्यक असलेले ०१ नग ई.सी.जी. मशिन खरेदी करणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.१,००,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**२० अ) सन २०१३-१४ मधील वार्षीक खरेदीमधील मंजूर दराने औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी साहित्य अतिरिक्त खरेदीबाबत.**

**<u>अधिनियम 2004 मधील तरतुद :-</u>** 17-2 (ण)

**<u>व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :-</u>** मा. व्यवस्थापन समिती सभा दि. २६/०७/२०१३ निर्णय क्रमांक ५६४ Clause No. ९ अन्वये **मागणी केलेल्या औषधांच्या साठ्यापैकी काही औषधांची अतिरिक्त मागणी करावयाची असल्यास ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने खरेदी करुन रु. २५,०००/- पेक्षा अधिक रक्कमेच्या औषधांची मागणी करावयाची झाल्यास दैनंदिन कामाची गैरसोय होऊ नये, म्हणून ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मंजुरीने खरेदी करुन केवळ नोंद घेण्यासाठी / माहितीस्तव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावे, असे ठरले आहे.**

**<u>प्रस्ताविक:-</u>** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात दैनंदिन वापरासाठी लागणाऱ्या औषधे, सर्जिकल व कन्झूमेबल साहित्याकरीता सन २०१३-२०१४ या वर्षाकरीता वार्षिक निविदेतील मंजूर दराने एकुण ६६ पुरवठाधारकांना एकुण

रक्कम रु. ३०,५२,८८,३५८/- चे दि. १९/०३/२०१४ रोजी पुरवठा आदेश देण्यात आलेले आहे.

त्यानुसार पुरवठा आदेशाप्रमाणे मालाचा पुरवठा चालू आहे. तर त्यातील काही मालाचा पुरवठा पुर्ण झालेला आहे. त्यापैकी सध्या सोबतच्या यादीतील औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्यांचा औषध भांडारात साठा शिल्लक नाही. वार्षीक मागणी पुर्ण झालेली आहे. व ती औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्य दैनंदिन वापरासाठी आवश्यक आहे.

तसेच श्री साईबाबा रुग्णालयात राजीव गांधी जीवनदायी योजना दि.१६/११/२०१३ रोजी कार्यान्वित झालेली आहे. तर वार्षीक मागणी प्राप्त होऊन त्यावर मा. त्रिसदस्य समिती सभा दि. २६/०७/२०१३ चे निर्णय क्र. ५६४ अन्वये मान्यता मिळाली आहे. त्यामुळे वार्षीक मागणी मधील संख्या कमी पडेल म्हणून जी औषधे/सर्जिकल साहित्य हे सदर योजने अंतर्गत रुग्णालयासाठी लागतील त्याची अतिरिक्त मागणी वाढवण्यात आलेली आहे अशा एकुण ५८ औषधांसाठी एकुण रक्कम रु. १,३८,४७,४१२ चे खर्चास मा. त्रिसदस्य समिती ची दि. १२/०४/२०१४ रोजी मान्यता मिळालेली असून प्रस्ताव मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात मान्यतेसाठी सादर केलेला आहे. त्यास मान्यता मिळणे आहे.

त्यास मान्यता मिळाले नंतर अंतिरिक्त मागणी वार्षीक मंजुर दराने खरेदी करता येईल. परंतु तो पर्यंत रुग्णांना उपचार चालू ठेवणेसाठी सोबतच्या यादीतील औषधांची गरज आहे.

सदर योजनेअंतर्गत होणाऱ्या शस्त्रक्रिया व उपचार चालु असताना रुग्णास पुर्ण बरा होऊन डिसचार्ज दिल्यापासून १ वर्षासाठी औषधे मोफत दयावी लागतात त्यामुळे औषधांचा खप हा अचानक वाढलेला आहे, राजीव गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत रुग्णांना दिलेल्या औषधांचा परतावा शासनाकडून संस्थानला मिळतो. त्यामुळे जशी जशी लागेल तशी तशी औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व  कन्झूमेबल साहित्य वार्षीक मंजुर दराने खरेदी करण्यात येत आहे. ती एकाच वेळी खरेदी करुन ठेवता येत नाही जर असे केले तर ती मुदत बाह्य होण्याची शक्यता जास्त असते. व त्यामुळे संस्थानचे मोठे आर्थिक नुकसान होईल.

सदर औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी साहित्य वार्षिक मंजुर दरानुसार वेगवेगळ्या मंजूर पुरवठा धारकांकडून सदरचे खरेदीकामी पुर्णांकित रक्कम रु. १,१०,७८२/- इतका खर्च येणार आहे.

**<u>मागणी:-</u>** सोबतच्या तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे

**<u>संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच अर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :-</u>**

अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल. त्यासाठी संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालये चालविण्यात येते. सदर रुग्णालयकरिता औषधे / सर्जिकल / लॅबोरॅटरी साहित्य खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे.

**<u>विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-</u>** रुग्णांची वाढती संख्या व राजीव गांधी योजने अंतर्गत एक वर्षासाठी मोफत दयावयाची औषधे उपचार घेणारे रुग्णांकरीता खरेदी करणे आवश्यक आहे. सदरची खरेदी वार्षीक मंजुर दराने आहे. सदरचे दर विहीत पध्दतीचा अवलंब करुन एक वर्षाकरिता निश्चित केलेले आहे. व त्यास मा. व्यवस्थापन सभा दि.१५/०३/२०१४ निर्णय क्र. २५४ अन्वये मान्यता देखील आहे. त्यामुळे त्याच मंजुर दराने खरेदी करण्यास हरकत नाही.

तरी सदरचे औषधे खरेदी करुन याकामी येणाऱ्या पुर्णांकित रक्कम रु. १,१०,७८२/- चे खर्चाची नोंद घेण्यास मान्यता असावी ही विनंती.

------------------------------------------------------------------------------------------------------------

**ब) सन २०१३-१४ मधील वार्षीक खरेदीमधील मंजूर दराने औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी साहित्य अतिरिक्त खरेदीबाबत.**

**अधिनियम 2004 मधील तरतुद :-** 17-2 (ण)

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :-** मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२६/०७/२०१३ निर्णय क्रमांक ५६४ Clause No.९ अन्वये **मागणी केलेल्या औषधांच्या साठ्यापैकी काही औषधांची अतिरिक्त मागणी करावयाची असल्यास ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने खरेदी करुन रु. २५,०००/- पेक्षा अधिक रक्कमेच्या औषधांची मागणी करावयाची झाल्यास दैनंदिन कामाची गैरसोय होऊ नये, म्हणून ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मंजुरीने खरेदी करुन केवळ नोंद घेण्यासाठी / माहितीस्तव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावे**, असे ठरले आहे.

**<u>प्रस्ताविक :-</u>** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात दैनंदिन वापरासाठी लागणाऱ्या औषधे, सर्जिकल व कन्झूमेबल साहित्याकरीता सन २०१३-२०१४ या वर्षाकरीता वार्षिक निविदेतील मंजूर दराने एकुण ६६ पुरवठाधारकांना एकुण रक्कम रु. ३०,५२,८८,३५८/- चे दि.१९/०३/२०१४ रोजी पुरवठा आदेश देण्यात आलेले आहे.

त्यानुसार पुरवठा आदेशाप्रमाणे मालाचा पुरवठा चालू आहे. तर त्यातील काही मालाचा पुरवठा पुर्ण झालेला आहे. त्यापैकी सध्या सोबतच्या यादीतील औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्यांचा औषध भांडारात साठा शिल्लक नाही. वार्षीक मागणी पुर्ण झालेली आहे. व ती औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्य दैनंदिन वापरासाठी आवश्यक आहे.

तसेच श्री साईबाबा रुग्णालयात राजीव गांधी जीवनदायी योजना दि. १६/११/२०१३ रोजी कार्यान्वित झालेली आहे. तर वार्षीक मागणी प्राप्त होऊन त्यावर मा. त्रिसदस्य समिती सभा दि.२६/०७/२०१३ चे निर्णय क्र. ५६४ अन्वये मान्यता मिळाली आहे. त्यामुळे वार्षीक मागणी मधील संख्या कमी पडेल म्हणून जी औषधे/सर्जिकल साहित्य हे सदर योजने अंतर्गत रुग्णालयासाठी लागतील त्याची अतिरिक्त मागणी वाढवण्यात आलेली आहे अशा एकुण ५८ औषधांसाठी एकुण रक्कम रु.१,३८,४७,४१२ चे खर्चास मा. त्रिसदस्य समिती ची दि.१२/०४/२०१४ रोजी मान्यता मिळालेली असून प्रस्ताव मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात मान्यतेसाठी सादर केलेला आहे. त्यास मान्यता मिळणे आहे.

त्यास मान्यता मिळाले नंतर अंतिरिक्त मागणी वार्षीक मंजुर दराने खरेदी करता येईल. परंतु तो पर्यंत रुग्णांना उपचार चालू ठेवणेसाठी सोबतच्या यादीतील औषधांची गरज आहे.

सदर योजनेअंतर्गत होणाऱ्या शस्त्रक्रिया व उपचार चालु असताना रुग्णास पुर्ण बरा होऊन डिसचार्ज दिल्यापासून १ वर्षासाठी औषधे मोफत दयावी लागतात त्यामुळे औषधांचा खप हा अचानक वाढलेला आहे, राजीव गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत रुग्णांना दिलेल्या औषधांचा परतावा शासनाकडून संस्थानला मिळतो.

त्यामुळे जशी जशी लागेल तशी तशी औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्य वार्षीक मंजुर दराने खरेदी करण्यात येत आहे. ती एकाच वेळी खरेदी करुन ठेवता येत नाही जर असे केले तर ती मुदत बाह्य होण्याची शक्यता जास्त असते. व त्यामुळे संस्थानचे मोठे आर्थिक नुकसान होईल.

सदर औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी साहित्य वार्षिक मंजुर दरानुसार वेगवेगळ्या मंजूर पुरवठा धारकांकडून सदरचे खरेदीकामी पुर्णांकित रक्कम रु. ६,२७,१७७/- इतका खर्च येणार आहे.

**मागणी :-** सोबतच्या तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे

**संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच अर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :-**

अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल. त्यासाठी संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालये चालविण्यात येते. सदर रुग्णालयकरिता औषधे/ सर्जिकल / लॅबोरॅटरी साहित्य खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे.

**विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-** रुग्णांची वाढती संख्या व राजीव गांधी योजने अंतर्गत एक वर्षासाठी मोफत दयावयाची औषधे उपचार घेणारे रुग्णांकरीता खरेदी करणे आवश्यक आहे. सदरची खरेदी वार्षीक मंजुर दराने आहे. सदरचे दर

विहीत पध्दतीचा अवलंब करुन एक वर्षाकरिता निश्चित केलेले आहे. व त्यास मा. व्यवस्थापन सभा दि. १५/०३/२०१४ निर्णय क्र. २५४ अन्वये मान्यता देखील आहे. त्यामुळे त्याच मंजुर दराने खरेदी करण्यास हरकत नाही.

तरी सदरचे औषधे खरेदी करुन याकामी येणाऱ्या पुर्णांकित रक्कम रु. ६,२७,१७७/- चे खर्चाची नोंद घेण्यास मान्यता असावी ही विनंती.

-----------------------------------------------------------------------------------------------------------

**क) सन २०१३-१४ मधील वार्षीक खरेदीमधील मंजूर दराने औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी साहित्य अतिरिक्त खरेदीबाबत.**

**अधिनियम 2004 मधील तरतुद :-** 17-2 (ण)

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :-** मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२६/०७/२०१३ निर्णय क्रमांक ५६४ Clause No.९ अन्वये **मागणी केलेल्या औषधांच्या साठ्यापैकी काही औषधांची अतिरिक्त मागणी करावयाची असल्यास ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने खरेदी करुन रु. २५,०००/- पेक्षा अधिक रक्कमेच्या औषधांची मागणी करावयाची झाल्यास दैनंदिन कामाची गैरसोय होऊ नये, म्हणून ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मंजुरीने खरेदी करुन केवळ नोंद घेण्यासाठी / माहितीस्तव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावे**, असे ठरले आहे.

**<u>प्रस्ताविक :-</u>** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात दैनंदिन वापरासाठी लागणाऱ्या औषधे, सर्जिकल व कन्झूमेबल साहित्याकरीता सन २०१३-२०१४ या वर्षाकरीता वार्षिक निविदेतील मंजूर दराने एकुण ६६ पुरवठाधारकांना एकुण रक्कम रु. ३०,५२,८८,३५८/- चे दि.१९/०३/२०१४ रोजी पुरवठा आदेश देण्यात आलेले आहे.

त्यानुसार पुरवठा आदेशाप्रमाणे मालाचा पुरवठा चालू आहे. तर त्यातील काही मालाचा पुरवठा पुर्ण झालेला आहे. त्यापैकी सध्या सोबतच्या यादीतील औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्यांचा औषध भांडारात साठा शिल्लक नाही. वार्षीक मागणी पुर्ण झालेली आहे. व ती औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्य दैनंदिन वापरासाठी आवश्यक आहे.

तसेच श्री साईबाबा रुग्णालयात राजीव गांधी जीवनदायी योजना दि. १६/११/२०१३ रोजी कार्यान्वित झालेली आहे. तर वार्षीक मागणी प्राप्त होऊन त्यावर मा. त्रिसदस्य समिती सभा दि.२६/०७/२०१३ चे निर्णय क्र. ५६४ अन्वये मान्यता मिळाली आहे. त्यामुळे वार्षीक मागणी मधील संख्या कमी पडेल म्हणून जी औषधे/सर्जिकल साहित्य हे सदर योजने अंतर्गत रुग्णालयासाठी लागतील त्याची अतिरिक्त मागणी वाढवण्यात आलेली आहे अशा एकुण ५८ औषधांसाठी एकुण रक्कम रु.१,३८,४७,४१२ चे खर्चास मा. त्रिसदस्य समिती ची दि.१२/०४/२०१४ रोजी मान्यता मिळालेली असून प्रस्ताव मा. उच्च न्यायालयाचे

औरंगाबाद खंडपीठात मान्यतेसाठी सादर केलेला आहे. त्यास मान्यता मिळणे आहे.

त्यास मान्यता मिळाले नंतर अंतिरिक्त मागणी वार्षीक मंजुर दराने खरेदी करता येईल. परंतु तो पर्यंत रुग्णांना उपचार चालू ठेवणेसाठी सोबतच्या यादीतील औषधांची गरज आहे.

सदर योजनेअंतर्गत होणाऱ्या शस्त्रक्रिया व उपचार चालु असताना रुग्णास पुर्ण बरा होऊन डिसचार्ज दिल्यापासून १ वर्षासाठी औषधे मोफत दयावी लागतात त्यामुळे औषधांचा खप हा अचानक वाढलेला आहे, राजीव गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत रुग्णांना दिलेल्या औषधांचा परतावा शासनाकडून संस्थानला मिळतो.

त्यामुळे जशी जशी लागेल तशी तशी औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्य वार्षीक मंजुर दराने खरेदी करण्यात येत आहे. ती एकाच वेळी खरेदी करुन ठेवता येत नाही जर असे केले तर ती मुदत बाह्य होण्याची शक्यता जास्त असते. व त्यामुळे संस्थानचे मोठे आर्थिक नुकसान होईल.

सदर औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी साहित्य वार्षिक मंजुर दरानुसार वेगवेगळ्या मंजूर पुरवठा धारकांकडून सदरचे खरेदीकामी पुर्णांकित रक्कम रु. ९,०५,१११/- इतका खर्च येणार आहे.

**<u>मागणी :-</u>** सोबतच्या तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे

**<u>संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच अर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :-</u>**

अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल. त्यासाठी संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालये चालविण्यात येते. सदर रुग्णालयकरिता औषधे / सर्जिकल / लॅबोरॅटरी साहित्य खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे.

**<u>विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:-</u>** रुग्णांची वाढती संख्या व राजीव गांधी योजने अंतर्गत एक वर्षासाठी मोफत दयावयाची औषधे उपचार घेणारे रुग्णांकरीता खरेदी करणे आवश्यक आहे. सदरची खरेदी वार्षीक मंजुर दराने आहे. सदरचे दर विहीत पध्दतीचा अवलंब करुन एक वर्षाकरिता निश्चित केलेले आहे. व त्यास मा. व्यवस्थापन सभा दि. १५/०३/२०१४ निर्णय क्र. २५४ अन्वये मान्यता देखील आहे. त्यामुळे त्याच मंजुर दराने खरेदी करण्यास हरकत नाही.

तरी सदरचे औषधे खरेदी करुन याकामी येणाऱ्या पुर्णांकित रक्कम रु. ९,०५,१११/- चे खर्चाची नोंद घेण्यास मान्यता असावी ही विनंती.

---

**ड) सन २०१३-१४ मधील वार्षीक खरेदीमधील मंजूर दराने औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी साहित्य अतिरिक्त खरेदीबाबत.**

**अधिनियम 2004 मधील तरतुद :-** 17-2 (ण)

**व्यवस्थापन समितीचा ठराव क्र. :-** मा. व्यवस्थापन समिती सभा दि.२६/०७/२०१३ निर्णय क्रमांक ५६४ Clause No.९ अन्वये **मागणी केलेल्या औषधांच्या साठ्यापैकी काही औषधांची अतिरिक्त मागणी करावयाची असल्यास ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मान्यतेने खरेदी करुन रु. २५,०००/- पेक्षा अधिक रक्कमेच्या औषधांची मागणी करावयाची झाल्यास दैनंदिन कामाची गैरसोय होऊ नये, म्हणून ती मा. कार्यकारी अधिकारी यांचे मंजुरीने खरेदी करुन केवळ नोंद घेण्यासाठी / माहितीस्तव मा. व्यवस्थापन समिती सभेपुढे नोंद घेण्यासाठी सादर करण्यात यावे**, असे ठरले आहे.

**<u>प्रस्ताविक :-</u>** श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयात दैनंदिन वापरासाठी लागणाऱ्या औषधे, सर्जिकल व कन्झूमेबल साहित्याकरीता सन २०१३-२०१४ या वर्षाकरीता वार्षिक निविदेतील मंजूर दराने एकुण ६६ पुरवठाधारकांना एकुण रक्कम रु. ३०,५२,८८,३५८/- चे दि.१९/०३/२०१४ रोजी पुरवठा आदेश देण्यात आलेले आहे.

त्यानुसार पुरवठा आदेशाप्रमाणे मालाचा पुरवठा चालू आहे. तर त्यातील काही मालाचा पुरवठा पुर्ण झालेला आहे. त्यापैकी सध्या सोबतच्या यादीतील औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्यांचा औषध भांडारात साठा शिल्लक नाही. वार्षीक मागणी पुर्ण झालेली आहे. व ती औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्य दैनंदिन वापरासाठी आवश्यक आहे.

तसेच श्री साईबाबा रुग्णालयात राजीव गांधी जीवनदायी योजना दि. १६/११/२०१३ रोजी कार्यान्वित झालेली आहे. तर वार्षीक मागणी प्राप्त होऊन त्यावर मा. त्रिसदस्य समिती सभा दि.२६/०७/२०१३ चे निर्णय क्र. ५६४ अन्वये मान्यता मिळाली आहे. त्यामुळे वार्षीक मागणी मधील संख्या कमी पडेल म्हणून जी औषधे/सर्जिकल साहित्य हे सदर योजने अंतर्गत रुग्णालयासाठी लागतील त्याची अतिरिक्त मागणी वाढवण्यात आलेली आहे अशा एकुण ५८ औषधांसाठी एकुण रक्कम रु.१,३८,४७,४१२ चे खर्चास मा. त्रिसदस्य समिती ची दि.१२/०४/२०१४ रोजी मान्यता मिळालेली असून प्रस्ताव मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठात मान्यतेसाठी सादर केलेला आहे. त्यास मान्यता मिळणे आहे.

त्यास मान्यता मिळाले नंतर अंतिरिक्त मागणी वार्षीक मंजुर दराने खरेदी करता येईल. परंतु तो पर्यंत रुग्णांना उपचार चालू ठेवणेसाठी सोबतच्या यादीतील औषधांची गरज आहे.

सदर योजनेअंतर्गत होणाऱ्या शस्त्रक्रिया व उपचार चालु असताना रुग्णास पुर्ण बरा होऊन डिसचार्ज दिल्यापासून १ वर्षासाठी औषधे मोफत दयावी

लागतात त्यामुळे औषधांचा खप हा अचानक वाढलेला आहे, राजीव गांधी जीवनदायी योजनेअंतर्गत रुग्णांना दिलेल्या औषधांचा परतावा शासनाकडून संस्थानला मिळतो.

त्यामुळे जशी जशी लागेल तशी तशी औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी व कन्झूमेबल साहित्य वार्षीक मंजुर दराने खरेदी करण्यात येत आहे. ती एकाच वेळी खरेदी करुन ठेवता येत नाही जर असे केले तर ती मुदत बाह्य होण्याची शक्यता जास्त असते. व त्यामुळे संस्थानचे मोठे आर्थिक नुकसान होईल.

सदर औषधे, सर्जिकल, लॅबोरॅटरी साहित्य वार्षिक मंजुर दरानुसार वेगवेगळ्या मंजूर पुरवठा धारकांकडून सदरचे खरेदीकामी पुर्णांकित रक्कम रु. २,४४,५०९/- इतका खर्च येणार आहे.

**<u>मागणी :-</u>** सोबतच्या तक्त्यात नमुद केल्याप्रमाणे

**<u>संस्थान अधिनियम / ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच अर्थिक विषय इ. छाननी करुन अनुमान :-</u>**

अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. १७-२ (ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल. त्यासाठी संस्थानतर्फे ०२ धर्मादाय रुग्णालये चालविण्यात येते. सदर रुग्णालयकरिता औषधे / सर्जिकल / लॅबोरॅटरी साहित्य खरेदी करण्याचा प्रस्ताव आहे.

**<u>विभागाचा अभिप्राय / स्पष्ट मत :-</u>** रुग्णांची वाढती संख्या व राजीव गांधी योजने अंतर्गत एक वर्षासाठी मोफत दयावयाची औषधे उपचार घेणारे रुग्णांकरीता खरेदी करणे आवश्यक आहे. सदरची खरेदी वार्षीक मंजुर दराने आहे. सदरचे दर विहीत पध्दतीचा अवलंब करुन एक वर्षाकरिता निश्चित केलेले आहे. व त्यास मा. व्यवस्थापन सभा दि. १५/०३/२०१४ निर्णय क्र. २५४ अन्वये मान्यता देखील आहे. त्यामुळे त्याच मंजुर दराने खरेदी करण्यास हरकत नाही.

तरी सदरचे औषधे खरेदी करुन याकामी येणाऱ्या पुर्णांकित रक्कम रु.२,४४,५०९/- चे खर्चाची नोंद घेण्यास मान्यता असावी ही विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, उपरोक्त अ,ब,क, व ड या प्रस्तावांची व त्यामधील खर्चाची नोंद घेण्यात येऊन, त्यास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**२१ संस्थान वाहनांकरीता नवीन टायर्स खरेदी करणेबाबत..**

वाहन विभागाकडील वापरात असलेल्या खालील प्रमाणे कार्यालयीन-03, रुग्णवाहीका-03, स्कुलबसेस-05, पॅसेंजर बसेस-03 व मालवाहतुक-01 अशा

एकुण-15 वाहनांचे सध्याचे टायर्स खराब झालेने त्यांना नवीन टायर्स (टयुब, फ्लॅपसह) खरेदी करणे आवश्यक आहे.□□□□□□ तपशिल खालील प्रमाणे आहे.

| अ. नं. | वाहन क्र. | वाहन प्रकार / वापर | सध्याचे टायर एकुण वापर | आवश्यक टायर्स साईज | टायरची कंपनी | टायर्स नग |
|---|---|---|---|---|---|---|
| 01 | MH-17-AJ-9899 | टोयोटा ईनोव्हा | 48,072 कि.मी. | 205:65R: 15 | ब्रिजस्टोन (ट्युबलेस-B-390) | 05 |
| 02 | MH-17-AJ-8889 | टोयोटा ईनोव्हा | 68,245 कि.मी. | 205:65R: 15 | | 05 |
| 03 | MH-17-AJ-2651 | महिंद्रा बोलेरो | 65,732 कि.मी. | 215:75R: 15 | ब्रिजस्टोन (ट्युबलेस-डॉलर-693II) | 05 |
| 04 | MH-17-AG-2420 | रुग्णवाहीका | 59,279 कि.मी. | 7:00:16 | अपोलो (अमर डिल्क्स) | 07 |
| 05 | MH-17-AG-2419 | रुग्णवाहीका | 1,08,578 कि.मी. | 185:R14 | अपोलो (क्रॉम्पटो) | 05 |
| 06 | MH-17-T-7101 | रुग्णवाहीका | 96,440 कि.मी. | 7:50:16 | (अपोलो (अमर गोल्ड) | 02 |
| 07 | MH-17-K-9501 | अशोक लेलॅण्ड | 20,682 कि.मी. | 7:50:16 | | 02 |
| 08 | MH-17-K-9502 | अशोक लेलॅण्ड | 17,210 कि.मी. | 7:50:16 | | 02 |
| 09 | MH-17-T-8501 | टाटा स्कुलबस | 61,052 कि.मी. | 9:00:20 | अपोलो (अमर गोल्ड) | 02 |
| 10 | MH-17-T-3101 | टाटा स्कुलबस | 57,447 कि.मी. | 9:00:20 | | 02 |
| 11 | MH-17-T-3102 | टाटा स्कुलबस | 33,774 कि.मी. | 9:00:20 | | 02 |
| 12 | MH-17-T-3103 | टाटा स्कुलबस | 52,270 कि.मी. | 9:00:20 | | 02 |
| 13 | MH-17-K-9371 | टाटा स्कुलबस | 91,849 कि.मी. | 9:00:20 | | 02 |
| 14 | MH-17-T-8505 | टाटा पॅसेंजरबस | 64,996 कि.मी. | 10:00:20 | अपोलो (अमर गोल्ड) | 06 |
| 15 | MH-17-T-3751 | टाटा-407 मालवाहतु | 59,253 कि.मी. | 8:25:16 (आडवीन | अपोलो (ST-7 | 02 |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | क | | क्षी) | गोल्ड) | |
| | | | | | एकुण टायर्स | 51 |

उपरोक्त प्रमाणे 15 वाहनांकरीता विविध प्रकारचे 51 टायर्स (टयुब, फ्लॅपसह) खरेदी करणे आवश्यक आहे. या कामी सध्याचे मार्केटमधील दरानुसार रु.4,60,000/- (अक्षरी रक्कम रु. चार लाख साठ हजार) मात्र खर्च अपेक्षीत आहे. सदर टायर्स ब्रिजस्टोन व अपोलो कंपनीचे अधिकृत डिलर यांचेकडून निविदा बोलावुन खरेदी करण्यात येतील.

वाहन विभागाकडील 15 वाहनांकरीता नवीन 51 टायर्स (टयुब, फ्लॅपसह) ब्रिजस्टोन व अपोलो कंपनीचे अधिकृत डिलर यांचेकडून निविदा बोलावुन खरेदी करणेस व या कामी येणारे अंदाजे रु.4,60,000/- (अक्षरी रक्कम रु.चार लाख साठ हजार) पर्यंतचे खर्चास प्रशासकीय मान्यता मिळणेस विनंती.

**उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, वाहन विभागाकडील 15 वाहनांकरीता नवीन 51 टायर्स (टयुब, फ्लॅपसह) खरेदी करणेसाठी ब्रिजस्टोन व अपोलो कंपनीचे अधिकृत डिलर यांचेकडून विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.4,60,000/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- वाहन विभागप्रमुख)

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------

**२२ शिर्डी महोत्सव २०१४ या निमित्ताने कार्यक्रमासाठी कलाकार निश्चिती बाबत.**

चालू वर्षाचा शेवट व नवीन वर्षाची सुरुवात साईभजनाने व्हावी व सदरचा विषय श्रींच्या सानिध्यात जावा या उद्देशाने दरवर्षी प्रमाणे या वर्षी ही दि.३१/१२/२०१४ रोजी समाधी मंदिर रात्रभर दर्शनासाठी खुले राहणार आहे. तसेच बुधवार दि.३१/१२/२०१४ रोजी साईनगर येथील मैदानावर होणा-या कार्यक्रमामध्ये कार्यक्रम सादर करणेसाठी पुणे मुंबई, औरंगाबाद, नाशिक, नगर या ठिकाणाहून वर्तमान पत्रात कलाकारांना विनम्र आवाहान करण्यात आलेले आहे. संसथान मार्फत वर्षभरात साजरे होणारे उत्सव, पारायण सोहळा व नववर्ष या निमिताने विनामूल्य सेवा देणा-या इच्छूक कलाकारांकडून खालील कलाकारांनी संस्थानकडे अर्ज केलेले आहेत. आज अखेर ७ अर्ज प्राप्त झालेले आहेत. प्राप्त झालेल्या अर्जाचा तपशील खालीलप्रमाणे-

| अ. नं. | दाखल तारीख | कलाकारांचे नाव व पत्ता | कार्यक्रम | कलाकार संख्या | मानधन अपेक्षा |
|---|---|---|---|---|---|
| १ | २९/१०/२०१४ | पारस जैन व हमसर हयात निजामी<br>मु.पो.शिर्डी, व्दारकामाई समोर, | साई भजनसंध्या | ५ | विनामूल्य |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | ता.राहाता जि.अहमदनगर मो.नं. ९८२२५४६८१७ | | | |
| २ | १/११/२०१४ | साईदुर्गा मंडळ, दिल्ली ( सौ.वनिता बजाज ) मो.नं- ९२८९२७६९००, ९२१०४०४४९० | साई भजनसंध्या | ७ | विनामूल्य |
| ३ | २६/११/२०१४ | श्री.जगदिश मारुती पाटील गीतकार, संगीतकार, निर्माता, सिंगर ठाणे. मो.नं. ९२२१५५११११, ८०९७२१८१११ | साई भजनसंध्या | ३० | विनामूल्य |
| ४ | २९/११/२०१४ | श्री.सच्चिदानंद आप्पा, मुंबई मो.नं. ९८२०१४८६७८ | एक शाम साई के नाम भक्तीसंगीताचा कार्यक्रम | २५ | विनामूल्य |
| ५ | २९/११/२०१४ | श्री.प्रसाद दुसाने, नाशिक | गायन कार्यक्रम | ८ | विनामूल्य |
| ६ | २/१२/२०१४ | श्री.रविंद्र पिंगळे ब्रह्मनाद स्वरमंच, शिर्डी ता.राहाता, जि.अहमदनगर | साईभजन संध्या | ७ | विनामूल्य |
| ७ | २/१२/२०१४ | कथाकथनकार श्री.रामकृष्ण भगवंत अघोर ज्योतिष पंडीत, ४३०, दक्षिण कसबा, सदगुरु अपार्टमेंट, जुने विठ्ठल मंदिराजवळ, सोलापूर | कथाकथनाचा कार्यक्रम | १ | विनामूल्य |

उपरोक्त कलाकारांमधून ३१ डिसेंबर २०१४ रोजी साजरा होणा-या शिर्डी महोत्सवासाठी कलाकरांची निवड करुन उपलब्ध वेळेत (सायं. ७.०० ते रात्रौ १२.००) कलाकारांना कार्यक्रम देता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावास निर्णय होणेस विनंती.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावामध्ये नमुद केलेले अ.नं.०१ चे कलाकार स्थानिक व सुप्रसिध्द आहेत तसेच अ.नं. ०३ व ०४ चे कलाकारही सुप्रसिध्द असून त्यांचेकडे कलाकारांची संख्या जास्त आहे. त्यामुळे शिर्डी महोत्सव २०१४ निमित्ताने उपरोक्त अ.नं.०१, ०३ व ०४ या कलाकारांना विनामुल्य कार्यक्रम उपलब्ध वेळेत (सायंकाळी ०७ ते रात्री १२.००) सादर**

**करणेस परवानगी देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०५)

---

२३ **<u>श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस. ओ.टी. नं २ करीता Heater Cooler मशिनसाठी Warmer Blanket मंजूर दराने खरेदीबाबत.</u>**

श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस. ओ.टी. नं २ विभागात Heater Cooler हे मशिन सन २०११ मध्ये खरेदी करण्यात आलेले असून त्यावर रुग्णाचे ऑपरेशन चालू असतांना रुग्णाच्या शरीरातील तापमान कमी झाल्यावर त्यांचे तापमान वाढवणेसाठी उपरोक्त Blanket वापरण्यात येते. सध्या त्यांच्याकडे असलेले Heater Cooler मशिनसाठी लागणारे Blanket हे वापरुन लीक (Puncture) झालेले असल्यामुळे त्यांनी दि. ०३/०९/२०१४ (औषध भांडार प्राप्त दि. ०१/११/२०१४) चे मागणीपत्रान्वये एक नग Warmer Blanket ची मागणी केलेली आहे.

सदर Heater Cooler मशिन हे Maquet कंपनीचे असल्यामुळे सदर मशिनकरिता Maquet कंपनीचेच Blanket खरेदी करावे लागणार आहे. यापुर्वी सी.व्ही.टी.एस ओ.टी. १ करिता मा. त्रिसदस्य समिती सभा दि. १२/०६/२०१४ निर्णय क्र. ४५२ (४) अन्वये इकडील पत्र क्र. १८६८ दि. ११/०८/२०१४ अन्वये M/s. Maquet Medical India Pvt. Ltd., Mumbai. यांचेकडून रु. ४३,५७४/- इतक्या रकमेत एक नग Blanket खरेदी केलेले आहे व त्याचा वापर सी.व्ही.टी.एस. ओ.टी. नं. I मध्ये नियमित चालु आहे. वरील मागणी ही सी.व्ही.टी.एस. ओ.टी. नं. II करिता आहे.

सदर 1 नग Blanket हे M/s. Maquet Medical India Pvt.Ltd., Mumbai यांचेकडुनच मागील मंजूर दर रु. ४३,५७४/- या दराने खरेदी करता येईल. याबाबत M/s. Maquet Medical India Pvt. Ltd., Mumbai यांना दुरध्वनीवर विचारणा केली असता, त्यांनी सदर मंजुर दराने Warmer Blanket देण्यास तयार असल्याचे दि. १७/११/२०१४ रोजीचे ई-मेल पत्रान्वये कळविले आहे.

तरी M/s. Maquet Medical India Pvt. Ltd., Mumbai यांचेकडून एक नग Warmer Blanket मागील मंजूर दराने खरेदीस व याकामी येणा-या रक्कम रु. ४३,५७४/- चे खर्चास मान्यता असावी.

**यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा रुग्णालयातील सी.व्ही.टी.एस. ओ.टी. नं.२ मधील Heater Cooler मशिनसाठी आवश्यक असलेले ०१ नग Warmer Blanket, M/s. Maquet Medical India Pvt.Ltd., Mumbai यांचेकडून मागील मंजूर रु.४३,५००/- मात्र या दराने खरेदी करणेस व या येणा-या रु.४३,५७४/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात यावी, अशी या उपसमितीची शिफारस मान्य करणेत आली.**

(कार्यवाही- वैद्यकीय संचालक)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.३** **श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयातील लिनन खरेदीकरणेकामी प्राप्त ई कमर्शियल निविदा उघडून निर्णय घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** अधिनियम **2004** मधील तरतुद :- **17-2 (**ण)

प्रस्ताविक :- मा. त्रिसदस्य समिती सभा दि.**08/10/2013** रोजीचे सभेत श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता लिनन खरेदीकामी येणाऱ्या अंदाजे रु.**48,87,916/-** चे खर्चास, व सदरची खरेदी विहीत पध्दतीने वर्तमान पत्रात जाहिरात देऊन सिलबंद निविदा मागवुन खरेदीस मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयाकरीता लिनन खरेदीकामी आपला वार्ताहार-मुंबई, पुढारी-पुणे, पुण्यनगरी-औरंगाबाद, सार्वमत-अहमदनगर या वर्तमान पत्रात जाहिरात देऊन त्यानुसार दि.**17/03/2014** ते **29/03/2014** **www.mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध होते तर दि.**01/04/2014** अखेर तांत्रिक सिलबंद निविदा स्विकारणेची मुदत होती. त्यास अनुसरुन श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता लिनन खरेदीकामी एकूण **08** सिलबंद निविदा संकेत स्थळावर प्राप्त झालेल्या होत्या.

सदरच्या तांत्रिक बंद निविदा दि.**04/04/2014** वैद्यकीय संचालक यांचे समक्ष उघडण्यात येऊन त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची तपासणी करण्यात आली त्यानुसार त्यांनी निविदेसोबत मागणी केलेली सर्व कागदपत्रे सादर केलेली असुन त्या सर्व पात्र आहे.

त्यामुळे सर्व **8** हि ई कमर्शियल निविदा दि.**07/08/2014**चे सभेपुढे समक्ष उघडण्यात आलेल्या असुन मा.उपकार्यकारी व मा.वैद्यकीय संचालक यांना समक्ष नमुने दाखवुन निर्णय घ्यावा असे ठरले.

* संस्थान अधिनियम/ ठराव यानुसार छाननी, शासन निर्देश, तांत्रिक, कायदेशीर तसेच आर्थिक विषय छाननी करुन अनुमान:- अधिनियमातील समितीचे कर्तव्ये व अधिकार क्र. **17-2 (**ण) अन्वये मानवजातीच्या कल्याण करणाऱ्या किंवा मानवाला आपत्तीमध्ये साहय्य करणाऱ्या अन्य कोणत्याही उदात्त कार्यास चालना देईल असा आहे. त्यानुसार संस्थानतर्फे **02** धर्मादाय रुग्णालय चालविण्यात येतात.

विभागाचा अभिप्राय/ स्पष्ट मत:- मा.उपकार्यकारी साहेब व वैद्यकीय संचालक साहेब यांनी दि.**27/06/2014** रोजी लिननचे नमुने रुग्णालयात समक्ष पाहिलेले आहे. तसेच दि.**14/07/2014** रोजी मुख्यलेखाधिकारी साहेब यांचेशी चर्चा करुन त्यांना देखील वैद्यकीय संचालक यांचेसमवेत लिननचे नमुने दाखविण्यात आले आहे.

ऑपरेशन थिएटरमध्ये वापरले जाणारे लिनन हे दररोज **130** डिग्री पर्यंत **Autoclave** केले जाते त्यामुळे धागे हे लवकर खराब होण्याची शक्यता असते त्यामुळे जेव्हा जेव्हा लिनन खरेदी करण्यात येते तेव्हा तेव्हा कापडाचा नमुना,मागील अनुभव व दर इत्यादीचा विचार करुन खरेदी करण्याची आता पर्यंतची कार्यपध्दती आहे.

मा.त्रिसदस्य समितीचे सभेतील दि.**12/06/2014**चे सभेतील निर्णय क्रमांक **526** अन्वये खालीलप्रमाणे निर्णय झालेला आहे. "संस्थानमध्ये विविध विभागांमधील विविध खरेदी/ कामांसाठी दरपत्रके/कोटेश्न्स/निविदा/ई-निविदा मागविणेत आल्यानंतर संबंधीतांना सभेसमोर बोलावून चर्चा/वाटाघाटी करणेत येऊन, निम्नत्तम दरधारकास सदरचा कार्यादेश दिला जातो.

परंतु या कार्यपध्दतीमध्ये निर्णय घेण्यास बराचसा कालावधी लागतो. तसेच त्या वस्तुचा/कामाचा दर्जा मिळत नाही. याकरीता यापुढे जाहिरातीमध्ये दरपत्रके/ कोटेशन्स/ निविदा/ ई-निविदा मागणी करताना "दरांबाबत चर्चा/वाटाघाटी केल्या जाणार नाहीत, आपण अंतीम दर द्यावेत व निविदा स्विकारणे अथवा नाकारणेचा अधिकारी समितीला राहील.असा स्पष्ट उल्लेख करणेत यावा. "

त्यामुळे निविदाधारकांकडुन प्राप्त झालेला कापडाचा नमुना समक्ष पाहिल्यानंतर त्याठिकाणी कापडाचा नमुना मागणीप्रमाणे व कापडाचा पोत (**Texture)** मागील अनुभव इत्यादीचा विचार करता तुलनात्मक दरातील एकुण **35** प्रकारच्या लिननपैकी निन्मत्तम दर (**Lowest-1)**असलेल्या लिननपैकी **23** नगांकरीता मा.त्रिसदस्य समिती सभा दि.**07/08/2014** नि.क्र.**674** अन्वये रु. **19,15,392.25/-** चे खर्चास मान्यता मिळालेली आहे त्यानुसार इकडील पत्र क्र. **2178** ते **2184** अन्वये एकुण सात पुरवठाधारकांना पुरवठा आदेश देण्यात आले आहे.

तर उर्वरीत लिनन खरेदीकामी पुढारी-पुणे,पुण्यनगरी-औरंगाबाद, सार्वमत-अहमदनगर या वर्तमान पत्रात जाहिरात देऊन त्यानुसार दि.**13/09/2014** ते **25/09/2014** **www.mahatenders.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध होते तर दि.**27/09/2014** अखेर तांत्रिक सिलबंद निविदा स्विकारणेची मुदत होती.

त्यास अनुसरुन श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता लिनन खरेदीकामी एकूण **5** सिलबंद निविदा संकेत स्थळावर प्राप्त झालेल्या आहेत त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| अ.नं. | पुरवठाधारकाचे नाव | प्राप्त दिनांक |
|---|---|---|
| **1** | मे.खादी ग्रामोद्योग विकास समिती,दिल्ली | **2** बंद निविदा प्राप्त **27/09/2014** |
| **2** | मे.बांठीया एन्टरप्रायजेस,पुणे | **2** बंद निविदा प्राप्त |

| | | |
|---|---|---|
| | | **27/09/2014** |
| **3** | मे.केसीएम इंटरनॅशनल,जयपुर | **2** बंद निविदा प्राप्त **27/09/2014** |
| **4** | मे.एम.बी.ट्रेडींग कंपनी,नाशिक | **2** बंद निविदा प्राप्त **27/09/2014** |
| **5** | मे.आशा,नाशिक | **2** बंद निविदा प्राप्त **27/09/2014** |

सदरच्या तांत्रिक बंद निविदा दि.**04/10/2014** रोजी वैद्यकीय संचालक यांचे समक्ष उघडण्यात आल्या असुन त्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची तपासणी करण्यात आली असुन त्यांनी निविदेसोबत मागणी केलेली सर्व कागदपत्रे सादर केलेली असुन त्या सर्व पात्र आहे. तसेच

दि.**08/10/2014** रोजी निविदाधारकांनी निविदे सोबत दिलेल्या कापडाचे नमुने वैद्यकीय संचालक, वैद्यकीय प्रशासक, सहा.अधिसेविका यांनी समक्ष पहाणी केली असता त्यामध्ये **11** आयटमपैकी **9** आयटमकरीता मे.केसीएम इंटरनॅशनल, जयपुर यांचे कापड चांगल्या प्रतीचे वाटले आहेत व उर्वरीत **2** आयटमकरीता मे.खादी ग्रामोद्योग विकास समिती, दिल्ली यांचे कापड चांगले आहे. त्यामुळे प्राप्त झालेल्या एकुण **5** निविदापैकी दोनच निविदाधारकांचे नमुने समाधानकारक आहे असा प्रस्ताव वैद्यकीय संचालक यांनी सादर केला होता, त्यावर मुख्यलेखाधिकारी साहेब यांनी पुढील प्रमाणे अभिप्राय दिलेला आहे. वैद्यकीय संचालक यांनी दोनच निविदाधारकांचे नमूने समाधानकारक असल्याचे नमुद केले आहे. परंतु नमूना कोणत्या प्रकारचा निश्चित केला होता, नमुन्यांमध्ये कोणकोणत्या उणीवा आहेत हे स्पष्ट होत नाही. कापडाची गुणवत्ता ही कापड प्रयोगशाळेत तपासल्यानंतरच कळु शकेल तेव्हा सर्व निविदाधारकांचे तांत्रिक लिफाफे उघडुन निन्मत्तम दरांच्या पुरवठाधारकाचे कापड प्रयोगशाळेत तपासूनच माल स्विकृत करता येईल. शासन निर्णय (उद्योग विभाग) **02/1192** मधील तरतुदी नुसार कार्यवाही करणे योग्य होईल. त्यामुळे प्राप्त सर्व ई-कमर्शियल निविदा उघडुन निन्मत्तम दर असणाऱ्यास पुरवठा आदेश देता येईल व कापडाचा नमुना प्रयोगशाळेत पाठवुन त्यानुसार खरेदी करता येईल.

श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयातील लिनन खरेदीकरणेकामी उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या ०५ ई-निविदा आजचे समिती सभेत उपस्थित निविदाधारकांसमोर उघडणेत आल्या. या उघडलेल्या ई-निविदांमध्ये मे.के.सी.एम. इंटरनॅशनल, जयपूर यांची ई-निविदा कोरी (Blank) होती, त्यांनी समक्ष पाहून ती मान्य केली. निविदाधारकांनी ई-निविदेमध्ये दिलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता खालीलप्रमाणे.

| Purchase of Linen For Shri Saibaba Hospital & Sainath Hospital, Shirdi | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | M/s Asha, Nashik | | M/s KCM International, Jaipur | | M/s M.B.Trading Company, Nashik | | M/s.Khadi Gramudyog vikas samiti, Dilhi | | M/s.Bhantia Enterprises, Pune | |
| Sr. no | Description | Qty | Rate | Amount | Rate | Amount | Rate | Amount | Rate | Amount | Rate | Amount |

| | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Drawsheet- Type of Cloth 100 % Cotton, Colour Green size-75"x45"Inch | 3810 Nos. | 191.00 | 727710.00 | N.Q. | N.Q. | 189.00 | 720090.00 | 165.00 | 628650.00 | 158/- | 601980.00 |
| 2 | Holesheet- Type of Cloth 100 % Cotton, Colour Green size-75"x45"Inch | 2385 Nos. | 197.00 | 469845.00 | N.Q. | N.Q. | 189.00 | 450765.00 | 175.00 | 417375.00 | 179/- | 426915.00 |
| 3 | Holesheet- Type of Cloth 100 % Cotton, Colour Green size-60"x100"Inch | 200 Nos. | 300.00 | 60000.00 | N.Q. | N.Q. | 279.00 | 55800.00 | 270.00 | 54000.00 | 261/- | 52200.00 |
| 4 | Patient Dress-Checks Type of Cloth Cotton+Tericot , Colour Red/Pink Lineing size-S/M/L/XL | 1575 Nos. | 355.00 | 559125.00 | N.Q. | N.Q. | 351.00 | 552825.00 | 299.00 | 470925.00 | 278/- | 437850.00 |
| 5 | Surgeon Dress-Type of Cloth Cotton+Tericot, Colour Sky Blue size-S/M/L/XL | 1112 Nos. | 355.00 | 394760.00 | N.Q. | N.Q. | 351.00 | 390312.00 | 299.00 | 332488.00 | 278/- | 309136.00 |
| 6 | Surgeon Gown-Type of Cloth 100 % Cotton,Colour Green, Size-Large | 1900 Nos. | 355.00 | 674500.00 | N.Q. | N.Q. | 315.00 | 598500.00 | 224.00 | 425600.00 | 243/- | 461700.00 |
| 7 | Surgeon Gown-Type of Cloth 100 % Cotton,Colour Green, Size-Large (Imperious material+Flap(Hand Elastic) | 1395 Nos. | 491.00 | 684945.00 | N.Q. | N.Q. | 594.00 | 828630.00 | 248.00 | 345960.00 | 349.10 | 486994.50 |
| 8 | Rap Arround Gown(Ortho)-Type of Cloth 100 % Cotton,Colour Green, Size- Large | 700 Nos. | 409.00 | 286300.00 | N.Q. | N.Q. | 342.00 | 239400.00 | 264.00 | 184800.00 | 281/- | 196700.00 |
| 9 | Colour Pillowcover-Type of Cloth Cotton+Terricot, Blue/Pink Lineing,Size-28"x20"Inch | 736 Nos. | 49.00 | 36064.00 | N.Q. | N.Q. | 86.00 | 63296.00 | 76.00 | 55936.00 | 72.50 | 53360.00 |
| 10 | Colour Bedsheet-Cotton+Terricot Blue/Pink Lineing,Size-60"x100"Inch | 1315 Nos. | 218.00 | 286670.00 | N.Q. | N.Q. | 333.00 | 437895.00 | 305.00 | 401075.00 | 295/- | 387925.00 |
| 11 | Curtain Cloth-Type of Cloth Cotton+Tericot,Velvet Cloth, Colour-Blue | 1000 Mtr. | 82.00 | 82000.00 | N.Q. | N.Q. | 75.60 | 75600.00 | 118.00 | 118000.00 | 62.50 | 62500.00 |
| | Total | | | 4261919.00 | | | | 4413113.00 | | 3434809.00 | | 3477260.50 |

निर्णय क्र.१०२२ उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा व साईनाथ रुग्णालयातील लिनन खरेदी करणेकामी उपरोक्त तुलनात्मक तक्त्यातील गडद व अधारेखीत केलेले निम्नतम दर स्विकारणेत यावेत. मात्र पुरवठा आदेश देणेपूर्वी निविदाधारकांनी सादर केलेल्या कापडाचा नमुना प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविणेत यावा व सदरहू निविदेतील अटी/ शर्तीनुसार पात्र असल्यासच संबंधीतांना पुरवठा आदेश देण्यात यावा, असे ठरले.

तसेच याकामी येणा-या रु.१,८७,६११/- मात्र वाढीव खर्चास मान्यता देण्यात आली.

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

---

**विषय नं.४ श्री.नरेश विठ्ठल रत्नाकर व श्रीमती शितल नरेश रत्नाकर, रा.ईदगाव, ता.अंबरनाथ, जिल्हा ठाणे यांचे मालकीची जागा संस्थानला देणगी देणेबाबत.**

**प्रस्ताव- श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था ,शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद–**

**अधिनियमाचे कलम १७** (समितीची कर्तव्य व अधिकार) मधील पोट कलम (२) चा खंड (ट) अन्वये "विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी, तसेच विश्वस्तव्यवस्थोची उद्दीष्ठे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादीत करील किंवा खरेदी करील."

मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी सिव्हील अॅप्लीकेशन नं.१२०५६/२०१२, पी.आय.एल. नं.१८/२०११ मध्ये दिनांक १६ आक्टोंबर, २०१२ रोजी समितीला खालीलप्रमाणे आदेश दिलेला आहे.

**(6) We direct that, without prior permission of this Court, the Committee,-**

(a) shall not take any steps in creating third party interest in the movable or immovable properties of the respondent No.2- trust;

(b) shall not enter into an agreement, contract for purchase of any immovable property on behalf of the Respondent No.2- trust;

(c) shall not take any major financial decision of whatsoever nature;

**प्रस्ताव -**श्री. नरेश विठ्ठल रत्नाकर व श्रीमती शितल नरेश रत्नाकर रा.ईदगाव, ता.अंबरनाथ, जिल्हा ठाणे यांनी दि. ०३ आक्टोबर, २०१४ रोजीचे अर्जान्वये तसेच दि.१५/११/२०१४ रोजी मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांना प्रत्यक्ष भेटून खालील प्रमाणे जागा संस्थानने देणगी स्विकारणे बाबत विनंती केली आहे.

| अ.नं. | जमीन मालकाचे नाव | गाव | गट नंबर | दान द्यावयाचे क्षेत्र हे.आर. |
|---|---|---|---|---|
| ०१ | श्री. नरेश विठ्ठल रत्नाकर<br>श्रीमती शैला नरेश रत्नाकर | ईदगाव (साधना भवन) ता.अंबरनाथ जि. ठाणे | १३/६ | १.९४<br>पोटखराबा<br>०.२८ |

**इकडील विभागाचे मत-** श्री.रत्नाकर यांचे प्रस्तुत जागेची पाहणी करुन तसेच कागदपत्रांची सविस्तर माहिती घेऊन याबाबत निर्णय घेता येईल असे मत आहे.

सदरहू प्रस्ताव मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे विचारार्थ सादर.

**निर्णय क्र.१०२३ उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री.नरेश विठ्ठल रत्नाकर व श्रीमती शितल नरेश रत्नाकर, रा.ईदगाव, ता.अंबरनाथ, जिल्हा ठाणे हे संस्थानला देणगीदाखल देत असलेल्या जागेची कार्यकारी अधिकारी यांनी पहाणी करावी व त्या जागेसंदर्भातील संपुर्ण कागदपत्रांची माहिती घेऊन, सविस्तर प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

--------------------------------------------------------------------------------------------------------
------------------------------

**विषय नं.५ श्रीमती गऊबाई कचरु गुंजाळ, रा.पाथरे खु., ता.सिन्नर यांचे मालकीची ११ गुंठे जमीन संस्थानला देणगी देणेबाबत.**

**प्रस्ताव-** **श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था ,शिर्डी अधिनियम २००४ मधील तरतुद– अधिनियमाचे कलम १७** (समितीची कर्तव्य व अधिकार) मधील पोट कलम (२) चा खंड (ट) अन्वये "विकास करण्याच्या व विश्वस्तव्यवस्थेच्या योजना राबविण्याच्या प्रयोजनासाठी, तसेच विश्वस्तव्यवस्थेची उद्दीष्ठे व प्रयोजने पार पाडण्यासाठी आवश्यक त्या जमीनी व इमारती संपादीत करील किंवा खरेदी करील."

मा.उच्च न्यायालय,मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी सिव्हील अॅप्लीकेशन नं.१२०५६/२०१२, पी.आय.एल. नं.१८/२०११ मध्ये दिनांक १६ आक्टोंबर, २०१२ रोजी समितीला खालीलप्रमाणे आदेश दिलेला आहे.

**(6) We direct that, without prior permission of this Court, the Committee,-**

(a) shall not take any steps in creating third party interest in the movable or immovable properties of the respondent No.2- trust;

(b) shall not enter into an agreement, contract for purchase of any immovable property on behalf of the Respondent No.2- trust;

(c) shall not take any major financial decision of whatsoever nature;

**प्रस्ताव -**श्रीमती गऊबाई कचरु गुंजाळ, रा.पाथरे खु. ता.सिन्नर, जि.नाशिक यांनी दि.२९/९/२०१४ रोजी अर्ज केलेला असुन अर्जात नमुद केले आहे की, मौजे पाथरे खुर्द, ता.सिन्नर येथील त्यांचे स्वमालकीची व उपभोगातील गट नं.१६६/३ मधील क्षेत्र १ हे.२५ आर पैकी सिन्नर हायवे लगतचे क्षेत्र ०.११ आर श्री साईबाबा संस्थान, शिर्डी यांना दान द्यावयाचे आहे. तसेच याकामी आवश्यक असणा-या कागदपत्रांची पुर्तता करणेसाठी संस्थानने सहकार्य करावे.

सोबत प्रस्तुत जामीनीचा ७/१२ उतारा जोडलेला असून त्यानुसार स्थिती खालील प्रमाणे-

| **अ.नं.** | **गाव** | **गट नंबर** | **क्षेत्र हे.आर.** | **जमीन मालकांच नाव** | **इतर हक्क** |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | पाथरे खु. ता.सिन्नर | १६६/३ | १.२५ | गहुबाई कचरु गुंजाळ सत्यभामा शंकर डांगे | १. पाथरे वि.का.सेवा सोसा. रु.१२५०००/- /३/७/२००९ गहुबाई साठी.<br>२. पाथरे विविध का.स.सो. चा बोजा रु. ३,००,०००/- दि. १२/७/२०१०<br>३. फार्म हाऊस रु.४,२०,०००/- |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | दि.१२/७/२०१० |

**इकडील विभागाचे मत-** प्रस्तुत जागेची पाहणी करुन तसेच कागदपत्रांची माहिती घेऊन याबाबतचा सविस्तर प्रस्ताव मा. त्रिसदस्य समितीचे सभेपुढे सादर करता येईल असे मत आहे.

मा.त्रिसदस्य समितीचे विचारार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.१०२४ उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्रीमती गऊबाई कचरु गुंजाळ, रा.पाथरे खु., ता.सिन्नर या संस्थानला देणगीदाखल देत असलेल्या जागेची कार्यकारी अधिकारी यांनी पहाणी करावी व त्या जागेसंदर्भातील संपुर्ण कागदपत्रांची माहिती घेऊन, सविस्तर प्रस्ताव सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, मालमत्ता विभाग)

-------------------------------------------------------------------------------------------------------------
-----------------------------

**विषय नं.६ देणगीदार साईभक्त श्री.मुकेश मोहन गुप्ता, दिल्ली यांची दर्शन/ आरतीची व्यवस्था होणेबाबतची विनंती.**

**प्रस्ताव-** श्री.मुकेश मोहन गुप्ता, दिल्ली यांचे संस्थानला आवक नं.014330/दिनांक 03.11.2014 रोजी प्राप्त पत्रात, "मी आपणास विनंती करतो की, मी माझी पत्नी व दोन मुलीं (एकूण 04 व्यक्ती) आमची श्री साईबाबांच्या दर्शन/आरतीस बिना पास घेता पुढील 20 वर्षा करीता व्यवस्था व्हावी ही विनंती." असे कळविलेले आहे.

श्री.मुकेश मोहन गुप्ता, दिल्ली हे साईभक्त संस्थानला वातानुकुलित यंत्रणा देणगीदाखल देणार असल्याने याबाबत मॅकेनिकल विभागाकडून श्री.मुकेश गुप्ता यांचे देणगीबाबतची माहिती मागविलेली असून मॅकेनिकल विभागाने "साईभक्त श्री.मुकेश मोहन गुप्ता, नवी दिल्ली यांनी दिनांक 29.06.2014 रोजी पत्र पाठवून तसेच मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांची भेट घेऊन मुख्य मंदिरात देणगी दाखल वातानुकुलीत यंत्रणा बसविण्याची इच्छा व्यक्त केली होती. यावर मा.व्यवस्थापन समितीचे 17.07.2014 चे सभेतील निर्णय क्रमांक 588 अन्वये साईभक्त श्री.गुप्ता यांचेकडून भुयारी मार्ग, श्रींचे समाधी मंदिर, सभा मंडप व म्युझियम हॉल इत्यादी ठिकाणी देणगीदाखल वातानुकूलीत यंत्रणा बसवून घेणेबाबत मान्यता देण्यात आली आहे. साईभक्त श्री.गुप्ता हे ब्लु स्टार कंपनीचे डीलर, श्री वेंकटेश्वरा टंकी प्रोजेक्ट सोलुशन प्रा.लि., पुणे यांचेकडून 175 टीआर क्षमतेची संपूर्ण डक्टेबल सेंट्रल एसी यंत्रणेची उभारणी करुन देणार असून, याकामी अंदाजे 90,00,000/- खर्च अपेक्षित आहे. सदर यंत्रणा उभारणी कामी श्री.गुप्ता यांनी कार्यादेश दिलेला असून डव्हान्स स्वरुपात रुपये 10,00,000/- श्री वेंकटेश्वर टंकी प्रोजेक्ट सोलुशन प्रा.लि.,पुणे यांचेकडे वर्ग केलेले आहे. सदर यंत्रणा उभारणीपुर्वी ड्राईंग मान्य करण्यात आले असून प्रत्यक्ष कामास पुढील

आठवडयात सुरुवात होणार आहे. श्री.मुकेश गुप्ता यांनी यापुर्वीही बगीचा विभाग, वाहन विभाग यांना वस्तु स्वरुपात देणगी दिलेल्या आहेत. तथापि श्री.गुप्ता व त्यांचे कुटुबिंयाना "विना पास श्री साईंचे दर्शनासाठी सोडण्यात यावे" ही त्यांची मागणी इकडील विभागाचे अधिकार कक्षेतील नाही. त्यामुळे संबंधीतांचे दर्शन, आरतीबाबत संस्थानचे धोरणानुसार जनसंपर्क विभागाकडून उचित निर्णय घेणे योग्य होईल," असे कळविले आहे.

तसेच देणगीदार साईभक्तांच्या सुविधांबाबत श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्थेमार्फत खालीलप्रमाणे निर्णय संमत झालेले आहे ते पुढीलप्रमाणे -

1) मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक 10.01.2008 रोजीचे सभेतील निर्णय क्रमांक 10 (16) अन्वये श्री.महेश रेड्डी यांनी सुमारे 11 कोटी रुपये खर्च करुन 96 किलो सोन्याचे श्रींचे सिहासन श्री साईबाबा संस्थानला देणगी स्वरुपात दिले. त्यानुषंगाने श्री महेश रेड्डी व त्यांचे कुटुंबियांची तहयात आरती व दर्शन व्यवस्था विनामुल्य करण्यात यावी.

2) मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक 14.11.2013 चे सभेतील निर्णय क्रमांक 907 अन्वये श्री.के.व्ही.रमणी, संस्थापक व कार्यकारी विश्वस्त शिर्डी साई ट्रस्ट, चेन्नई यांचे 110 कोटी मात्रचे देणगीतून साईआश्रम प्रकल्प साकारलेले आहेत. त्यामुळे श्री.के.व्ही.रमणी व त्यांचे कुटूंबियांचे साईप्रती योगदान लक्षात घेऊन श्री.के.व्ही.रमणी व त्यांच्या कुटूंबियांना तहयात मोफत निवास व दर्शन/आरती व्यवस्था करण्यात यावी.

यासंदर्भात आंध्रप्रदेशातील तिरुपती देवस्थान देणगीदार भक्तांना काय सुविधा देते याकरिता या देवस्थानच्या वेबसाईटवर पुढीलप्रमाणे माहिती उपलब्ध झाली आहे.

तिरुपती देवस्थानमध्ये 1 कोटी देणगी देणारे देणगीदार भक्त व त्यांचे कुटूबींय (पाच पेक्षा जास्त नाही) यांना खालीलप्रमाणे तह्यात (आयुष्यभरासाठी) वेगवेगळया स्वरुपाच्या सुविधा पुरविलेल्या आहेत.

01) वर्षातील 3 दिवस रू. 2,500/- दराचे व्हीआयपी सुट राहण्यासाठी विनामुल्य देण्यात येतात.

02) देणगीदार व त्यांचे कुटूंबिय यांची वर्षातील 3 दिवस विनामुल्य दर्शनव्यवस्था करण्यात येते.

03) विनामुल्य दर्शना व्यतिरिक्त देणगीदार व त्यांचे कुटूबींय यांना सुप्रभात दर्शन वर्षातून 3 वेळेस देण्यात येईल.

04) वेद आर्शीवचनम पुजा वर्षातून एक वेळेस मंदीरामध्ये किंवा रंगनाथकुलम मंडपामध्ये मंदीर पुजाऱ्यामार्फत करण्यात येईल.

05) भक्ताला त्याच्या देणगी पावतीबरोबर 10 मोठे लाडू प्रसाद म्हणून दिले जातात.

06) देणगीदार भक्ताला एक दुप्पट्टा व ब्लाऊज पीस देणगी दिल्यामुळे बहूमान म्हणून दिला जातो.

07) पाच ग्रॅम्स वजनाचे सोन्याचे नाणे तसेच सोन्याचा मुलामा दिलेले चांदीचे श्रीवरू व पदमावती देवीची प्रतिकृती असलेले नाणे पहिल्या भेटीच्या वेळी मोफत दिले जाते.

08) वैयक्तीक देणगीदारास सदरील सेवा आयुष्यभरासाठी राहील. तसेच दिलेली देणगी फर्म,कंपनी, एन्टरप्राइजेस किंवा संयुक्त स्वरुपाची असेलतर सदरील सेवा 20 वर्षासाठी राहील.

09) देणगीदार भक्ताला त्याने दिलेल्या देणगीवर नियमानुसार आयकरात सूट दिली जाते.

10) देणगीदारास सदर वर्षातून एकदा दिलेल्या भेटीत 10 महाप्रसाद पाकिटे प्रसाद म्हणून दिले जातात.

यांव्यतिरिक्त वर्षभरातील कोणत्याही एका मुहूर्तावर सर्वकामप्रदालक्ष्मी श्रीनिवास महायज्ञम ही पुजा श्रीनिवासमंगापूरम येथे देणगीदार किंवा त्यांचे नातेवाईक किंवा त्यांनी नाम निर्देशित केलेल्या व्यक्तीसोबत करता येईल.

तसेच रूपये 10 लाख किंवा त्यापेक्षा जादा देणगी देणारे देणगीदार भक्त व त्यांचे कुटूबींय (पाच पेक्षा जास्त नाही) यांना खालीलप्रमाणे तह्यात (आयुष्यभरासाठी) वेगवेगळया स्वरुपाच्या सुविधा पुरविलेल्या आहेत.

01) वर्षातील 3 दिवस रू.500/- दराचे निवासस्थान विनामुल्य देण्यात येतात.

02) देणगीदार व त्यांचे कुटूबिंय यांची वर्षातील 3 दिवस दर्शनव्यवस्था उपलब्धतेनुसार करण्यात येते.

03) भक्ताला वर्षातील कोणत्याही एका भेटीच्या वेळी लहान आकाराचे 20 लाडू प्रसाद म्हणून दिले जातात.

04) देणगीदार भक्ताला वर्षातून एकदा एक दुप्पट्टा व ब्लाऊज पीस देऊन बहूमान केला जातो.

05) पाच ग्रॅम्स वजनाचे सोन्याचे नाणे तसेच सोन्याचा मुलामा दिलेले चांदीचे श्रीवरू व पदमावती देवीची प्रतिकृती असलेले नाणे पहिल्या भेटीच्या वेळी मोफत दिले जाते.

06) वैयक्तीक देणगीदारास सदरील सेवा आयुष्यभरासाठी राहील. तसेच दिलेली देणगी फर्म,कंपनी, एन्टरप्राइजेस यांच्या नावे असेल किंवा संयुक्त स्वरुपाची असेलतर सदरील सेवा 20 वर्षासाठी राहील.

07) देणगीदार भक्ताला त्याने दिलेल्या देणगीवर नियमानुसार आयकरात सूट दिली जाते.

08) देणगी दिलेल्या भक्ताला वर्षातून एकवेळ 10 महाप्रसाद पाकिटे प्रसाद म्हणून दिले जातात.

तथापि, श्री.महेश रेड्डी व श्री.के.व्ही.रमणी यांचेप्रमाणे श्री.गुप्ता यांनी दिलेल्या देणगीचे स्वरुप बघता त्यांनी पत्रात नमुद केलेप्रमाणे त्यांचे कुटुंबातील 04 व्यक्तींची पुढील 20 वर्षासाठी मोफत (विनापास) दर्शन/आरती व्यवस्था करणे उचित होईल, तसेच याप्रमाणे रुपये 50 लाख व त्यापेक्षा जास्त देणगी देणाऱ्या सर्वच देणगीदार भक्त व त्यांचे कुटुंबियांची मोफत दर्शन/आरती व्यवस्था देणगी दिल्यापासुन पुढील 20 वर्षाकरीता करावी असे मत आहे.

तरी सदरचा विषय मा.व्यवस्थापन समितीचे सभेपुढे निर्णयार्थ सविनय सादर.

**निर्णय क्र.१०२५** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, त्यामध्ये नमुद केलेप्रमाणे देणगीदार साईभक्तांची दर्शन/ आरतीची मोफत व्यवस्था करणे हा धोरणात्मक निर्णय होणार आहे. त्याकरिता मागील २५ वर्षापासून संस्थानला कोणत्याही स्वरुपात मोठया देणग्या दिलेल्या साईभक्तांची यादी बनविणेत येऊन, त्यांचा सविस्तर फेरप्रस्ताव सभेसमोर सादर करणेत यावा, असे ठरले.**

(कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी)

----------------------------------------------------------------------------------------------------
------------------------------

**विषय नं.७** **महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानाअंतर्गत मंजूर पाणीपुरवठा योजनेच्या एकूण खर्चाची १०% लोकवर्गणी रक्कम रु.२.२५ कोटी मात्र शिर्डी नगरपंचायतीस भरणे शक्य नसल्याने संस्थानकडून सदरचा निधी मिळणेबाबत.**

**प्रस्ताव-** मुख्याधिकारी शिर्डी नगरपंचायत यांनी जा.क्र.नप/टेक्र-८/३६६१/२/२०१४, दि.२४.११.२०१४ चे पत्रान्वये खालीलप्रमाणे कळविले आहे.

शिर्डी शहरासाठी महाराष्ट्र जीवन प्राधिकरण विभागामार्फत सन २०१० मध्ये पाणी पुरवठा योजनेचे काम पूर्ण करण्यात आलेले आहे. सदर योजनेद्वारे दरडोई ७० [illegible] पाणी दिले जाते. तथापी शासनाचे मार्गदर्शक तत्वाप्रमाणे दरडोई १३५ लिटर पाणी देणे आवश्यक असल्याने शिर्डी नगरपंचायतीमार्फत सदर प्रकल्प तयार करण्यात आलेला आहे. तसेच पाटबंधारे विभागाकडून मिळणारे रोटेशन अनियमित व कमी कालावधीचे होत असल्यामुळे पाणी साठवण तलाव ४-५ दिवसात भरण्यासाठी पाटबंधारे विभागाने तगादा केला आहे. सदर योजना पुर्ण झाल्यानंतर नगरपंचायतीस, नागरीकांना व साईभक्तांना खालीलप्रमाणे लाभ्मिळणार आहे.

१.सदरची योजना सन २०४६ पर्यंत डिझाईन करण्यात आलेली असून या योजनेद्वारे दरडोई १३५ लिटर पाणी दिले जाणार आहे.

२. समांतर गुरुत्ववाहीनी टाकण्यात येणार असल्याने ५८ लिटर कोटी क्षेमतेचातलाव ४-५ दिवसात भरणार आहे.

३. नविन ७.० एम.एल.डी.जलशुध्दीकरण यंत्रणा प्रकल्प तयार होणार आहे.

४. शिर्डी शहराकरीता दोन नविन टाक्या बांधण्यात येणार आहे.

५. शहरात ७० किमी लांबीच्या पाईपलाईन वितरण व्यवस्था केली जाणार आहे.

६. जुना साठवण तलाव नुतनीकरण करण्यात येणार आहे.

प्रस्तावीत खर्चास महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग, निर्णय क्र.नगरो-२०१४प्र.क्र.१९४(१) नवि-३३, मंत्रालय मुंबई दि.०६ सप्टेंबर २०१४ चे निर्णयान्वये मंजुरी दिलेली आहे. खर्चाची माहिती खालीलप्रमाणे-

१.प्रकल्प खर्चाची एकुण रक्कम रुपये-२२.५८ कोटी

२. राज्य शासनाकडून ९०% देय रक्कम रुपये-२०.३३ कोटी

३. शिर्डी नगरपंचायतीची १०% लोकवगर्णी रुपये-२.२५ कोटी.

शिर्डी नगरपंचायतीची आर्थिक स्थिती बिकट असल्यामुळे नगरपंचायतीला १०% लोकवर्गणी रुपये २.२५ कोटी भरणे श्यक्य होणार नाही. त्यामुळे नगरपंचयतीचे विशेष सभा दि.५.११.२०१४, ठराव क्र.९ अन्वये, १०% लोकवगर्णी रुपये-२.२५ कोटी श्री साईबाबा संस्थानकडून शिर्डी नगरपंचायतीस अर्थ सहायय म्हणून मिळावी, अशी विनंती केली आहे.

**अधिनियमातील तरतुद-**सन २००४ चा अधिनियमातील कलम २१ मधील (२) (दोन) नुसार, छाननी समितीच्या शिफारसीनूसार व राज्य शासनाचे पूर्व मंजूरीने स्थानिक नागरी सेवा व सुविधा यांच्यामध्ये सुधारणा व वाढ होणेसाठी व परिणामी संस्थानच्या सोयीमध्ये वाढ होण्यासाठी शिर्डी नगरपंचायतीला सहाय करणेची तरतुद आहे.

**मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे निर्देश**.

PIL No 18/2011, date 13 March 2012 Sr.No.18 मध्ये खालीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत. The existing Committee and the Committee constituted by this Court is directed not to take any major financial decision in respect of management of of the affairs of the Sansthan without intimating this Court.

**विभागाचा अभिप्राय-** मा.व्यवस्थापन समितीचे निर्णयानूसार पूढील कार्यवाही करता येईल.

तरी प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१०२६** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियानाअंतर्गत मंजूर पाणीपुरवठा योजनेच्या एकूण खर्चाच्या १०% लोकवर्गणीची रक्कम रु.२.२५ कोटी मात्रचा निधी संस्थानमार्फत शिर्डी नगरपंचायतीस देणेकामी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन तसेच संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०३/ विधी अधिकारी)

---

**विषय नं.८ संत दासगणू महाराज जन्मस्थळ अकोळनेर येथे दासगणू महाराज पुण्यतिथी व जन्मोत्सव कार्यक्रमास श्री साईबाबा संस्थान शिर्डी मार्फत दरवर्षी पुजा व आरती करणेबाबत.**

**प्रस्ताव-** दि.१४.११.२०१४ रोजीचे पत्रान्वये श्री.रावसाहेब ए.गारुडकर, सहकार्यवाह, संतकवी दासगणू महाराज जन्मस्थळ विकास समिती, अकोळनेर, जि.अहमदनगर यांनी संतकवी दासगणू महाराज हे श्री.गजानन विजय ग्रंथाचे लेखक व साईबाबा शिर्डी संस्थानचे पहिले अध्यक्ष होते. त्यांनी २५ वर्षे अध्यक्षपद भूषविले. त्यांचा जन्म नगर तालुक्यातील अकोळनेर येथे दि.०६ जानेवारी १८६८ मध्ये झाला. साईबाबांच्या सहवासात ते दिर्घकाळ होते. त्यांचे महानिर्वाण दि.२९ नोव्हेंबर १९६२ साली झाले अशा साईभक्ताच्या जन्मस्थळी साईबाबा संस्थान शिर्डी यांचेमार्फतमहाराजांच्या पुण्यतिथी व जन्मोत्सवास पुजा व आरती दरवर्षी व्हावी व तसा ठराव करावा अशी विनंती केली आहे.

श्रीसाईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डीमार्फत श्रींचे समकालीन भक्त कै.भाऊमहाराज कुंभार व कै.तात्या पाटील कोते यांचे शिर्डी येथील समाधी मंदिराचे परिसरात असलेले समाधीस्थळी त्यांचे-त्यांचे पुण्यतिथीचे दिवशी त्यांचे समाधीस अभिषेक पूजा करण्यात येतात. याव्यतिरीक्त बाहेरगावी कोणत्याही ठिकाणी श्रींचे समकालीन संत अथवा समकालीन भक्त यांचे जन्म दिवस अथवा पुण्यस्मरण दिवस संस्थानमार्फत साजरा करण्यात येत नाही.

संतकवी दासगणू महाराज यांची ५०वी पुण्यतिथी कार्तिक वद्य त्रयोदशीस, दि.११.१२.२०१२ रोजी संस्थानमार्फत साजरा करण्यात आलेली आहे. त्या निमित्त श्रीसाईबाबांचे प्रतिमेचे पूजन करुन ग्रामस्थ व साईभक्तांकडून दासगणू महाराज कृत श्रीसाईनाथ स्तवनमंजरीचे सामुदायिक वाचन करुन “श्रींची शिर्डी माझे पंढरपुर” आरती आली. तसेच दि.०१.१२.२०१३ व दि.२०.१२.२०१४ रोजी संतकवी दासगणू महाराज यांचे पुण्यतिथीनिमित्त अशाच पद्धतीने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

यावर्षी गुरुवार, दि.२०.११.२०१४ रोजी संस्थानचे प्रशासकीय अधिकारी, श्री.बी.डी.साबळे व जनसंपर्क अधिकारी, श्री.मोहन यादव यांनी संतकवी दासगणू महाराजांचे जन्मस्थान अकोळनेर,ता.जि.अहमदनगर येथे जाऊन तेथील श्रीसाईबाबांच्या व दासगणू महाराजांच्या मूर्तीस वस्त्र अर्पण केले आहे. तसेच त्यांचे तेथील पदाधिका-यांचा सत्कारही करण्यात आलेला आहे.

संतकवी दासगणू महाराज यांचे योगदान पाहता त्यांचे जन्मस्थळ असलेल्या अकोळनेर येथे प्रति वर्षी संतकवी दासगणू महाराजांचे जन्मतिथी व पुण्यतिथीचे दिवशी संस्थानचे पदाधिकारी यांचेमार्फत तेथील श्रीसाईबाबांचे व संतकवी दासगणू महाराज यांचे मूर्तीस पुष्प- हार व श्रींचे वस्त्र अर्पण करुन तेथील अध्यक्ष अथवा पदाधिकारी यांचा यथोचित सत्कार करावा, असे नम्र मत आहे. तरी त्याबाबत निर्णय होणेस विनंती आहे.

**निर्णय क्र.१०२७** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, संतकवी दासगणू महाराज यांचे जन्मस्थळ असलेल्या अकोळनेर येथे प्रति वर्षी संतकवी दासगणू महाराजांचे जन्मतिथी व पुण्यतिथीचे दिवशी श्रीसाईबाबांचे व संतकवी दासगणू महाराज यांचे मूर्तीस पुष्प- हार व श्रींचे वस्त्र अर्पण करुन तेथील अध्यक्ष, पदाधिकारी यांचा यथोचित सत्कार करणेसाठी समिती स्थापन करणेत यावी व याकामी होणा-या खर्चासाठी एका विशिष्ट रकमेच्या निधीची तरतूद करणेत यावी, असे ठरले.** (कार्यवाही- अधिक्षक, मंदिर विभाग)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.९** **साईप्रसाद निवाससथान विभाग (इमारत नं.१ व २) निवासथानांत साईभक्तांना गरमपाणी पुरवठा करणेस मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** साईप्रसाद निवासस्थान विभाग (इमारत नं. 1 व 2) निवासस्थानांत श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को.ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांचे मार्फत साईभक्तांना गरम पाणी रुम पर्यन्त पुरविणेत येत आहे. मा.व्यवस्थापन समितीचे दि. 25/09/2014 चे सभेतील विषय नं. 62 निर्णय क्रं 840. प्रमाणे साईप्रसाद निवासस्थान विभाग (इमारत नं. 1 व 2) निवासस्थानांत साईभक्तांना गरम पाणी पुरवठा करणेकामी श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को ऑप सोसायटी लि.शिर्डी यांना मागील अटी-शर्तीस अनुसरुन व प्रस्तावित दराप्रमाणे दि.09/12/2013 ते दि.08/12/2014 अखेर एक वर्ष कालावधी करीता मुदतवाढ देणे आली होती. सदरची मुदत दि. 08/12/2014 रोजी संपुष्टात येत आहे.

श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को.ऑप.सोसायटी लि.शिर्डी यांनी दि. 08/11/2014 रोजीचे पत्राने दि. 09/12/2014 पासून पुढील पाच वर्षा करीता मुदतवाढ मिळणेस विनंती केलेली आहे.

संस्थानचा अधिनियम 2004 मधील कलम नं.17(3)मध्ये खालील प्रमाणे तरतुद आहे.

".. विश्वस्तव्यवस्थेमध्ये निहित झालेली कोणतीही स्थावर मालमत्ता, .राज्य शासनाच्या लेखी पुर्वमंजुरीने असेल त्याखेरीज समितीकडुन, एक वर्षापेक्षा अधिक मुदतीकरीता, भाडेपट्टयाने देण्यात येणार नाही किंवा गहाण टाकण्यात येणार नाही.विकण्यात येणार नाही किंवा अन्यथा अन्यसंक्रामित करण्यात येणार नाही. ..."

मा.उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांनी दि.16/10/2012 रोजी झालेल्या आदेशात पॅरा नं.6 (अ) मध्ये- Without prior permission of this Court the Committee shall not take any steps in creating third party interest in the movable or immovable properties of the Respondent No.2-trust ; असुन त्यात मा.कोर्टाच्या परवानगीशिवाय संस्थानचे चल वा अचल मालमत्तेसंदार्भात कोणत्याही प्रकारे ति-हाईत व्यक्तीचा हक्क निर्माण होईल असे पाऊल उचलु नये. असा आदेश झालेला आहे.

मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद यांचेकडे लिव्ह ॲन्ड लायसेंन्स तत्वावर व्यवसाय चालविणेस परवानगी मिळणेकामी सिव्हिल ॲप्लीकेशन नं. 3686/2014 दाखल करण्यात आले होते. त्यामध्ये मा.कोर्टाने खालील प्रमाणे आदेश दिलेला आहे.

"..By application (No.3686/2014),the Committee has urged for permission to execute agreement of leave and licence in favour of Union Bank of India and State Bank of India for the purpose of installation of ATM machines and providing a space for a Bank on year to year basis and for providing facility of broadcasting of various religious programmes of Shri Saibaba on leave and licence upon execution of leave and licence agreement, agreement and for providing facility of Hot Water, Cold Drinks and General Stores and for that purpose grant of necessary permission.

Considering day today management needs and urgency in the matter, we allow the Committee to take such decisions.

Application (No.3686/2014) allowed accordingly.."

श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को ऑप सोसायटी लि.शिर्डी यांना साईप्रसाद नं. 1 व 2 या इमारती मध्ये दि. 09/12/2014 ते दि. 08/12/2015 या एक वर्षाचे कालावधीसाठी पुर्वीचे अटी शर्तीवर व खालील प्रमाणे गरम पाणी पुरवठा करणकामी आकारावयाचे दरा नुसार मुदतवाढ देता येईल.

| अ.नं. | इमारतीचे नाव | भक्तांकडुन आकारावयाचे प्रती बादली दर | संस्थानला प्राप्त होणारी पाणी पट्टी प्रती बादली रुपये | सोसायटीस प्राप्त होणारी प्रती बादली रुपये |
|---|---|---|---|---|
| 01 | साईप्रसाद नं.1 व 2 | रुपये 3/- | रुपये 1/- | रुपये 2/- |

तरी श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को ऑप सोसायटी लि.शिर्डी यांना साईप्रसाद नं. 1 व 2 या इमारती मध्ये दि. 09/12/2014 ते दि. 08/12/2015 या एक वर्षाचे कालावधीसाठी पुर्वीचे अटी शर्तीवर व उपरोक्त प्रमाणे गरम पाणी पुरवठा करणेकामी आकारावयाचे दरा नुसार मुदतवाढ देणेचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१०२८ यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साई संस्थान एम्प्लॉईज क्रेडिट को ऑप सोसायटी लि.शिर्डी यांना साईप्रसाद नं. 1 व 2 या इमारती मध्ये दि. 09/12/2014 ते दि. 08/12/2015 या एक वर्षाचे कालावधीसाठी पुर्वीचेच अटी शर्तीवर प्रस्तावात नमुद केलेल्या गरम पाणी पुरवठा करणेकामी आकारावयाचे दरानुसार मुदतवाढ देणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- विधी अधिकारी)

----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१० प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडिया, मुंबई यांना देणेत आलेल्या जागेस दि.२१.०८.२०१४ ते दि.२०.०८.२०१५ या कालावधीकरिता मुदतवाढ देणेबाबत.**

**प्रस्ताव-** प्रसार भारती (भारतीय प्रसारण निगम) आकाशवाणी तथा दुरदर्शन मुंबई यांनी CEW/TVP/2619 दि.21/04/2003 अन्वये शिर्डी येथे दुरदर्शन लघु प्रसारण केंद्र उभारणेसाठी संस्थानकडे मासिक भाडे तत्वावर4900स्क्वे.फुट जागा मिळणेस विनंती केली होती.त्याबाबत मा.व्यवस्थापन मंडळाचा दि. 11/05/2003 रोजीचा ठराव क्र.207ने मा.धर्मादाय आयुक्त महाराष्ट्र राज्य मुंबई यांची पुर्व मान्यता घेवून सदर जागा भाड्याने देणेचे ठरले. सदर ठरावास अनुसरुन संस्थानने दि.9/6/2003 रोजी मा.धर्मादाय आयुक्त महाराष्ट्र राज्य मुंबई यांचेकडे प्रसार भारती यांना संस्थानची जागा भाडयाने देणेबाबत प्रस्ताव सादर केला. प्रकरणी परवानगी देणे संस्थानचे हिताचे आहे. असा विचार करुन मा. धर्मादाय आयुक्त यांनी दि. 10/07/2003 रोजीचे आदेशाने प्रसार भारती आकाशवाणी दुरदर्शन मंुबई यांना Low power T.V.Center शिर्डी येथे उभारणेसाठी संस्थानचे अर्जात नमुद केले प्रमाणे जागा भाडयाने देणेबाबत परवानगी दिली आहे. त्याबाबत प्रसार भारती यांनी दि. 06/08/2003 चे पत्राने 01) पी.डब्ल्यु.डी. यांचेकडून निश्चित झालेले भाडे देण्यात येईल, 02) कमीत कमी 15 वर्षासाठी जागा द्यावी लागेल, 03) करारनामा 3 वर्ष किंवा 5 वर्षासाठी करण्यात यावा त्यानंतर नुतनीकरण करण्यात यावा असा राहील, असे इकडेस कळविण्यात आले होते.दि.22/08/2003 पासून प्रसार भारती यांना संस्थानची जागा + रुम वापरांस दिलेली आहे.

प्रसार भारती यांचे उपरोक्त पत्राबाबत मा. व्यवस्थापन मंडळाचा दि.5/10/2003 रोजीचे सभेत विषय सादर करुन निर्णय क्र.473 झालेला आहे. प्रसार भारती यांना 15 वर्षासाठी जागा भाड्याने देणेबाबतचा प्रस्ताव मंजूर झालेला आहे.

संस्थानला आता नविन अधिनियम लागू आहे. त्यामध्ये कलम 24(1) ची तरतूद खालील प्रमाणे आहे.

Where the erstwhile public trust by the Name of Shirdi Sansthan of Shree Sai Baba at Shirdi, District Ahamendanagar or any trustee thereof was immediately before tha appointed day, party to any legal proceedings with respect to any property, rights, liabilitied ot oblihsyiond since vested in the re-constituted Trust under section 3 by the name of the Shri Saibaba Sansthan Trust, (Shirdi), the said re-constituted Trust or its Committee, shall be deemed to have been substituted for the erstwhile public trust or its trustees as a party to those proceeding shall continue accordingly,

तसेच या अधिनियमामध्ये संस्थान मिळकतीबाबत खालील प्रमाणे तरतुद आहे.

17(3) No immovable property vested in the Trust shall be leased for more than a year, or mortgaged, Slod or otherwise alienated by the

Committee, except with the previous sanction in writing of the State Govermment.तरतुद आहे. पुर्वीच्या ठरावा प्रमाणे 15 वर्षासाठी लिव्ह ॲन्ड लायसन्स तत्वावर जागा दिली असली तरी आताच्या श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिर्डी अधिनियमातील कलम 17 (3) च्या तरतुदी प्रमाणे फक्त 1 वर्ष कालावधीसाठी संस्थान मिळकत Lease वर देता येते.मा.त्रिसदस्य समितीचे दि.08/10/2013 रोजीचे विषय नं.62 निर्णय क्र.762व पी.आय.एल.18/2011 मधील सिव्हील ॲप्लीकेशन नं. 3686/2014 नुसार दि.02/05/2014 रोजीचे मा.हायकोर्ट जज्ज श्री चंदीवाल साहेब व मा.हायकोर्ट जज्ज श्री देशपांडे साहेब यांनी पुढील प्रमाणे आदेश दिलेला आहे .

By application (No.3686/2014), the committee has urged for permission to execute agreement of leave and license in favor of Union Bank of India and State Bank of India for the purpose of Installation of ATM machines and providing a space for a Bank on year to year basis and for providing facility of broad casting of various religious programmes of Shri Saibaba on leave and license upon execution of leave and license agreement and for providing facility of Hot water, cold drinks and general Stores and for that purpose grant necessary permission.

Considering day to day management needs and urgency in the matter, we allow the Committee to take such decisions.

Application (3686/2014) allowed accordingly.

मा.उच्चन्यायालयाचे परवानगीने प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया, मुंबई यांना दि.21/08/2013 ते दि.20/08/2014 अखेर 12 महिने कालावधी साठी जा.क्र.एसएसएस वशी विधी/810/2014 दि.15/05/2014अन्वये मुदतवाढीचा आदेश देण्यात आला होता.

मा.उच्च न्यायालयाची परवानगी उशिरा मिळाल्याने व प्रसार ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडीया, मुंबई व संस्थान यांचेत करावयाचा लिव्ह ॲन्ड लायसेन्स करारनामा दि.05/08/2014 रोजी करणेत आलेला आहे. प्रस्तुतचा कालावधी दि.20/08/2014 रोजी संपुष्टात आला आहे.

प्रसारभारती ब्रॉडकास्टींग कार्पो.ऑफ इंडिया, नाशिक यांनी दि.22/09/2014 रोजीचे पत्राने लिजडीड पुढील दि.21/08/2014 ते दि.20/08/2015 अखेर चालू ठेवणेस मुदतवाढ मिळणेस विनंती केलेली आहे.

संस्थानचे मा.व्यवस्थापन मंडळाचे दि.11/05/2003 चे व दि. 05/10/2003 चे ठरावाप्रमाणे व मा. उच्च न्यायालयाचे दि.02/05/2014 रोजीचे आदेशान्वये प्रस्तुत मिळकत प्रसार भारतीस वांपरास दिलेली आहे. जागेचे मासिक भाडे सार्वजनिक बांधकाम विभागाचे प्रमाणपत्रानुसार घेणेचे ठरलेले आहे. व प्रत्येक 3 वर्षाने मासिक परवाना फी मध्ये वाढ करुन खालील प्रमाणे आकारणी केलेली आहे.

1) रुपये 3325/- (अक्षरी रु. तीन हजार तीनशे पंचविस मात्र) मासिक भाडे दि. 21/08/2003 ते 20/08/2006 अखेर प्रसार भारतीने रक्कम संस्थानला दिलेले आहे.

2) दुसऱ्या टप्प्याचे तीन वर्षाचे दि.21/08/2006 ते दि. 20/08/2009 पावेतोचे रु. 3325/- मध्ये 10% वाढ करुन म्हणजे रु. 3657-50 प्रमाणे प्रसार भारतीने रक्कम संस्थानला दिलेले आहे.

3) तिसऱ्या टप्प्यासाठी दि. 21/08/2009 ते दि. 20/08/2012 अखेर रुपये 3657-50 मध्ये 10% वाढ करुन रु. 4,024/- प्रमाणे प्रसार भारतीने रक्कम संस्थानला दिलेले आहे.

4) चौथ्या टप्प्यासाठी दि.21/08/2012 ते दि.20/08/2015 अखेर रुपये 4,024/- मध्ये 10% वाढ करुन रुपये 4,427/- प्रमाणे रक्कम प्रसार भारती व संस्थान मध्ये दि.21/08/2014 ते दि. 20/08/2015 अखेर एक वर्षाचे कालावधी करीता मुदतवाढ देता येईल.

मा.व्यवस्थापन समितीच्या दि.05/10/2003 चे ठरावानुसार व प्रसारभारती यांना प्रस्तुत मिळकत 15 वर्षासाठी लिज डिडवर देणेस मान्यता आहे.मात्र संस्थानच्या सन 2004 च्या अधिनियमाचे तरतुदी नुसार प्रसारभारती यांना 1 वर्षापेक्षा जास्त कालावधीसाठी संस्थान मिळकत लिज डिडवर देता येणार नाही. परंतू प्रसार भारती यांचेकडून साईभक्तांना दुरदर्शनचे कार्यक्रम स्पष्टपणे पहाणेस मदत होते, तसेच श्री साईबाबांचे संबंधीत काही कार्यक्रम देखील त्यांचेकडून प्रसारीत होणेचे काम होते इत्यादी बाबी विचारात घेता प्रसारभारती यांना दि.21/08/2014 ते दि.20/08/2015 पावेतो एक वर्षासाठी मासिक परवाना फी रु. 4,427/- (अक्षरी रु.चार हजार चारशे सत्तावीस मात्र) व मिटर रिडींग प्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन, मा.उच्च न्यायालयाचे दि. 02/05/2014 चे आदेशास अनुसरुन (Considering day to day management needs and urgency in the matter, we allow the Committee to take such decisions.) लिव्ह ॲन्ड लायसन्स तत्वावर मुदतवाढ मा. त्रिसदस्य समितीचे मान्यतेने देणेबाबतचे विचारार्थ सादर.

**निर्णय क्र.१०२९** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, प्रसार भारती ब्रॉडकास्टींग कार्पोरेशन ऑफ इंडिया, मुंबई यांना देणेत आलेल्या जागेस दि.२१.०८.२०१४ ते दि.२०.०८.२०१५ या कालावधीकरिता मासिक परवाना फी रु.4,427/- व मिटर रिडींग प्रमाणे विद्युत आकार वेगळा आकारुन, मा.उच्च न्यायालयाचे दि. 02/05/2014 चे आदेशास अनुसरुन (Considering day to day management needs and urgency in the matter, we allow the Committee to take such decisions. ) लिव्ह ॲन्ड लायसन्स तत्वावर मुदतवाढ देणेत यावी, असे ठरले.**

(कार्यवाही- विधी अधिकारी)

---------------------------------------------------------------------------------------------------
-----------------------------

**विषय नं.११ अॅडव्होकेट श्री.आर.एन.धोर्डे यांची श्री साईबाबा संस्थान करीता पाईप लाईनने थेट निळवंडे धरणातून पाणी पुरवठा प्रस्तावीत योजनेस येणारे खर्चास मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेणेबाबतचे सिव्हील अॅप्लीकेशनची वकील फी अदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. त्रिसदस्य समितीचे दि. 17/07/2014 रोजीचे सभेत विषय नं. 25 अन्वये श्री साईबाबा संस्थान ,शिर्डी करीता पाणी पुरवठा करण्यासाठी निळवंडे धरणातून थेट पाईप लाईन प्रस्तावीत योजनेबाबत विषय पाणी पुरवठा विभागा मार्फत सादर करण्यात आला होता, त्याबाबत खालील प्रमाणे निर्णय झाला आहे.

"..श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था,शिर्डी करीता पाणी पुरवठा करण्यासाठी निळवंडे धरणातून थेट पाईप लाईन आणणेच्या योजनेमुळे शिर्डी शहरासह आजुबाजूच्या गावांना पाण्याची सुविधा उपलब्ध होणार असून त्यामुळे संस्थान आणि शिर्डी शहराच्या पाणी पुरवठा योजनेवर ताण येणार नाही व कायमस्वरुपी टंचाईग्रस्त गावांना पिण्याच्या पाण्याची शाश्वत सुविधा उपलब्ध झाल्याने स्थानिक नागरीकांबरोबरच साई भक्तांनाही याचा लाभ होणार आहे. तसेच श्री साईबाबा समाधी शताब्दी महोत्सवापुर्वी याबाबत कार्यवाही होणे गरजेचे असल्यामुळे सदरच्या योजनेसाठी श्री साईबाबा संस्थानने पुढाकार घेऊन स्वतंत्र प्रकल्प सल्लागाराची नेमणूक व आवश्यक लोकवर्गणी संस्थानमार्फत उपलब्ध करुन देणे समितीला आवश्यक वाटते.

यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितबाब धोरणातम्क व मेजर फायनान्शियल असल्यामुळे समिती त्यावर निर्णय घेऊ शकत नाही. यासाठी, सदरहू योजना का आवश्यक आहे, याबाबतची सर्व कारणे नमूद करुन हा प्रस्ताव शासनाकडे मान्यतेसाठी पाठवावा काय? अशा मार्गदर्शनपर सुचना व आदेश मिळणेसाठी मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठ यांचेकडे संस्थान वकीलामार्फत अर्ज करणेत यावा व मा. उच्च न्यायालयाचे आदेशानुसार पुढील कार्यवाही करावी, असे ठरले." प्रस्तुतचे विषयास अनुसरुन व दि. 07/08/2014 चे मिटींग मध्ये सुचीत केल्या प्रमाणे सिनिअर कौन्सीलने देखील काम पहावे या हेतूने श्री आर.एन.धोर्डे, श्री व्ही.डी.होन, श्री शहा ॲडव्होकेट यांचेशी संपर्क केल (दि.29/08/2014 चे पत्रासह) प्रस्तुत प्रकरणी आकारणेत येणारे वकील फी बाबतही कळविणेस विनंती केली तसेच प्रकरणी बांधकाम विभाग, पाणी पुरवठा विभाग प्रतिनिधीसह (श्री धोर्डे ॲडव्होकेट व श्री होन ॲडव्होकेट) वकीलांना प्रकरणी माहिती दिली. त्यानंतर आता सदरचे सिव्हील ॲप्लीकेशन दि. 02/09/2014 रोजीचे मंजूर टिपणीने अॅड. श्री आर.एन.धोर्डे, सिनिअर कौन्सील औरंगाबाद यांना जा.क्र. एसएसएस वशी- विधी/2873/2014 दि. 13/09/2014 रोजीचे पत्राने सिव्हील अॅप्लीकेशन मसुदा तयार करुन देणेस

विनंती करण्यात आली होती. त्यानुसार दि. 24/09/2014 रोजी अॅड. श्री आर.एन.धोर्डे यांनी सिव्हील अर्जाचा मसुदा तयार करुन ई मेलवर पाठविला आहे. तसेच दि.22/09/2014 रोजी प्रस्तूतचे सिव्हील ॲप्लीकेशनची वकील फी कामी रक्कम रुपये 1,50,000/- मात्राचे बील पाठविले आहे.(सदर पत्र दि.06/10/2014 रोजी संस्थानला व दि.07/10/2014 रोजी विधी विभागास प्राप्त झाले आहे )

सिव्हील अर्जाचे मसुद्यात आवश्यक तो बदल करुन दुरुस्ती करणेकामी दि. 24/09/2014 रोजी पाणी पुरवठा विभागास दिला होता. पाणी पुरवठा विभागाने दि. 25/09/2014 रोजीचे पत्राने मसुदा तपासून दिला आहे. त्याप्रमाणे सिव्हील अर्जात दुरुस्ती केली आहे. मा.हुजूर यांचे स्वाक्षरी साठी सादर केले आहे.

मा. उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद येथील ॲड. यांना आता पावेतो रक्कम रुपये 20000/-मात्र प्रति केस अदा केलेली आहे. वकील फी बाबत मा.उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद येथिल वकीलांना निश्चित किती वकील फी द्यावयाची याबाबत तसेच सिनिअर कौन्सिलची वकील फी बाबत निश्चित धोरण ठरलेले नाही.

प्रस्तूत सिव्हिल अर्जात अॅड. श्री आर.एन.धोर्डे, यांनी दि. 22/09/2014 रोजीचे पत्राने सिव्हील ॲप्लीकेशनचे वकील फीचे बील रक्कम रु. 1,50,000/- मिळणेबाबत विनंती केली आहे. बील ड्राफ्टींग, स्टेनो चार्जेस, क्लरीकल चार्जेस, कॉन्फरन्स चार्जेस, झेरॉक्स, टेलीफोन, फॅक्स, ट्रॅव्हलींग व ई-मेल या कामासाठी मागणी केले आहे. ॲड. श्री आर.एन. धोर्डे हे सिनिअर कौन्सील वकील असल्याने व सिव्हील ॲप्लीकेशनची रक्कम रु.183 कोटी असल्याने ॲड. श्री आर.एन.धोर्डे यांना रक्कम रु.1,50,000/- वकील फी अदा करणेचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१०३०** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, अॅडव्होकेट श्री.आर.एन.धोर्डे यांनी मागणी केलेल्या वकील फी मध्ये सवलत मिळावी, यासाठी साईबाबा संस्थान ही धर्मदाय संस्था असल्यामुळे सवलतीची फी कळवावी, अशा आशयाचे विनंती वजा पत्र त्यांना देण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- विधी अधिकारी)

---

**विषय नं.१२ अॅडव्होकेट श्री.आर.एन.धोर्डे यांची श्री साईबाबा मंदिर दर्शन रांग व मंदिर परिसर पुनर्विकास प्रकल्पाचे खर्चास मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेणेबाबतचे सिव्हील अॅप्लीकेशनची वकील फी अदा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा. त्रिसदस्य समितीचे दि. 26/06/2014 रोजीचे सभेत विषय नं. 4 अन्वये श्री साईबाबा मंदिर दर्शन रांग व मंदिर परिसर पुनर्विकास प्रकल्पाबाबत. (सादरीकरण व चर्चा) विषय बांधकाम विभागा मार्फत सादर करण्यात आला होता. सध्या कमी पडत असलेली दर्शन रांगेची सुविधा व दि. 01 ऑक्टोबर

2017 पासून श्री साईबाबा महासमाधी शताब्दी वर्षास सुरुवात होणार असल्याने तत्पुर्वी भक्तांना दर्शन रांगेची सुविधा निर्माण करणे आवश्यक आहे. यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावितकामी संस्थान वकिलामार्फत अर्ज सादर करणेत येऊन, मा. मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी व मा. खंडपीठाने निर्देशीत केल्याप्रमाणे प्रमाणे पुढील कार्यवाही करणेत यावी, असे ठरले.

प्रस्तुतचे विषयास अनुसरुन दि. 09/08/2014 रोजी श्री आर.एन.धोर्डे साहेब यांना व इतर □डव्होकेट यांना पत्र देऊन प्रकरणी सिनिअर कौन्सील म्हणून काम पहाणे तसेच आकारणेत येणारे वकील फी बाबत कळविणेत यावे अशी विनंती केलेली आहे. त्यानंतर दि. 12/08/2014 रोजी सिव्हील अर्जाचा कच्चा मसुदा स्टेनोला डिक्टेट केला मात्र याकामी श्री होन □डव्होकेट, श्री धोर्डे □डव्होकेट, किंवा श्री शहा □डव्होकेट यांचे पैकी एकाची नेमणूक करणेकामी काही कालावधी गेलेनंतर दि. 02/09/2014 चे टिपणीस अनुसरुन अॅड. श्री आर.एन.धोर्डे, सिनिअर कौन्सील औरंगाबाद यांना जा.क्र. एसएसएस वशी-विधी/2874/2014 दि. 13/09/2014 रोजीचे पत्राने सिव्हील अॅप्लीकेशन मसुदा तयार करुन देणेस विनंती करण्यात आली होती. त्यानुसार दि. 24/09/2014 रोजी अॅड. श्री आर.एन.धोर्डे यांनी सिव्हील अर्जाचा मसुदा तयार करुन ई मेलवर पाठविला आहे. तसेच दि. 22/09/2014 रोजी प्रस्तुतचे सिव्हील □प्लीकेशनची वकील फी कामी रक्कम रु.1,50,000/- मात्रचे बिल पाठविले आहे. ( सदर पत्रा दि. 06/10/2014 रोजी संस्थानला प्राप्त झाले आहे. )

सिव्हील अर्जाचे मसुद्यात आवश्यक तो बदल करुन दुरुस्ती करणेकामी दि. 24/09/2014 रोजी बांधकाम विभागास दिला होता. बांधकाम विभागाने दि. 26/09/2014 रोजीचे पत्राने मसुदा तपासून दिला आहे. त्याप्रमाणे सिव्हील अर्जात दुरुस्ती केली आहे. मा. हुजूर यांचे स्वाक्षरी घेवून मा. उच्च न्यायालयात दाखल करणेकामी दि. 08/11/2014 रोजी □ड श्री आर.एन.धोर्डे यांचेकडे सुपूर्त केले आहे.

मा. उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद येथील □डव्होकेट यांना आता पावेतो रक्कम रुपये 20000/-मात्र प्रति केस अदा केलेली आहे. वकील फी बाबत मा.उच्च न्यायालय मुंबई खंडपीठ औरंगाबाद येथिल वकीलांना निश्चित किती वकील फी द्यावयाची याबाबत तसेच सिनिअर कौन्सिलची वकील फी अदा करणेबाबत निश्चित धोरण ठरलेले नाही.

प्रस्तूत सिव्हिल अर्जात अॅड. श्री आर.एन.धोर्डे, यांनी दि. 22/09/2014 रोजीचे पत्राने सिव्हील □प्लीकेशनचे वकील फीचे बील रक्कम रु. 1,50,000/- मिळणेबाबत विनंती केली आहे.सदरचे बील ड्राफ्टींग, स्टेनो चार्जेस, क्लरीकल चार्जेस, कॉन्फरन्स चार्जेस, झेरॉक्स, टेलीफोन, फॅक्स, ट्रॅव्हलींग व ई-मेल या कामासाठी मागणी केले आहे. □ड. श्री आर.एन. धोर्डे हे सिनिअर कौन्सील वकील

असल्याने व सिव्हील ॲप्लीकेशनची रक्कम रु.340.20 कोटी असल्याने ॲड. श्री आर.एन.धोर्डे यांना रक्कम रु.1,50,000/- वकील फी अदा करणेबाबतचे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१०३१** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, अॅडव्होकेट श्री.आर.एन.धोर्डे यांनी मागणी केलेल्या वकील फी मध्ये सवलत मिळावी, यासाठी साईबाबा संस्थान ही धर्मदाय संस्था असल्यामुळे सवलतीची फी कळवावी, अशा आशयाचे विनंती वजा पत्र त्यांना देण्यात यावे, असे ठरले.** (कार्यवाही- विधी अधिकारी)

---------------------------------------------------------------------------------------------------
-----------------------------

**विषय नं.१३** **दुध पुरवठाधारकांची दि.१६.०७.२०१४ ते दि.३१.०७.२०१४ अखेरची बीले अदा होणेबाबत.**

**प्रस्ताव-** 2004- चा महाराष्ट्र अधिनियम क्रं.21 (1) भक्तांना जेवण पुरविणे व अन्नछत्र चालविणे, अशी तरतूद केली आहे.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.12/04/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं.266

मा.व्यवस्थापन समितीचे उपरोक्त सभेतील निर्णयानुसार गोदावरी दुध संघ कोपरगाव व श्री स्वामी समर्थ डीस्ट्रीब्युटर्स, तिसगाव यांना कॅन्टीन विभागासाठी आवश्यकते प्रमाणे दैनंदिन लागणारे दुधाचा पुरवठा करणेचा आदेश देण्यात आलेला आहे.सदर आदेशात पुरवठाधारकांनी टोन्ड गाय दुध 3.5 फॅट, 8.5 एसएनएफ गुणप्रत असलेले प्रतिलिटर 34.50 दराप्रमाणे दुधाचा पुरवठा करावयाचा आहे. यापेक्षा कमी गुणप्रतीचे दुधाचा पुरवठा केल्यास करारनाम्यातील शर्ती व अटीनुसार 0.1 कमी फॅटसाठी रु.0.35 पैसे कपात करणेचा अधिकार पार्टी.1 ला राहील असे नमूद करण्यात आले आहे.

कॅन्टीन विभागाकडे दुधाची गुणप्रत तपासणेची सुविधा नव्हती शासकिय प्रयोगशाळेतून वेळोवेळी आवश्यकते प्रमाणे दुधाची गुणप्रत तपासून घेणेकामी प्रशासकीय मान्यता घेण्यात आली व त्याप्रमाणे शासकिय प्रयोगशाळा, नाशिक येथे दर 15 दिवसांनी एकदा प्रतिनिधी पाठवून दुधाची गुणप्रत तपासणेची कार्यवाही सुरू करणेत आली.

दि.1/07/2014 ते 15/07/2014 या कालावधीत दि.14/07/2014 रोजी श्री स्वामी समर्थ डीस्ट्रीब्युटर्स यांनी 2297 लिटर दुधाचा पुरवठा केलेला आहे.दि.13/07/2014 रोजी गोदावरी दुधसंघ कोपरगांव यांनी 2193 लिटर दुधाचा पुरवठा केलेला आहे. सदर दिवशी दोन्ही पुरवठाधारकांकडून पुरवठा झालेल्या दुधाचे नमूने दि.14/07/2014 रोजी शासकिय प्रयोगशाळा, नाशिक येथे तपासणीसाठी पाठविले आहेत.शासकिय प्रयोगशाळा नाशिक येथील अहवाल दि.25/07/2014 रोजी प्राप्त झाला असून सदर अहवालात गोदावरी खोरे

दुध संघ कोपरगांव यांचे कडील दुधाची फॅट 2.2 च एसएनएफ 9.74 व श्री स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स यांचे कडील दुधाची फॅट 2.1 व एसएनएफ 9.87 असे दर्शविली आहे.

**सदर बीले आदा होणेबाबत खालीप्रमाणे कार्यवाही करणेत आली .**

| दिनांक | केलेली कार्यवाही | शेरा |
|---|---|---|
| 5/08/2014 | दोनही पुरवठाधारकांकडून पुरविण्यात आलेल्या दुधाची फॅट एसएनएफ कमी असले बाबत व खरेदी विभागामार्फत कार्यवाही होणेबाबत टिपणी सादर करणेत आली. | सदर टिपणीवर पेंमेट करु नये, मिटिंगसाठी संबंधीतांना बोलवावे, फॅटचे प्रमाण कमी आहे फॅटचे प्रमाणात पैसे वाटप केले पाहीजेत जिल्हा दुधसंघाकडून आकडेवारी मागवावी असा दि.5/08/2014 चे टिपणीवर मा.उप का.अ.व का.अ.यांनी शेरा दिलेला आहे |
| 08/08/2014 | दुध संघाकडून जी.आर.मागविण्यात आला परंतू सदर जी.आर.मध्ये फक्त दुधाचे सुधारीत दरांबाबत माहिती मिळाली फॅट/डीग्रीचे कपाती बाबत माहिती मिळाली नाही. | जिल्हा दुधसंघाकडून दि.08/08/2014 रोजी जी आर मागविण्यात आला. |
| 14/08/2014 | प्री ऑडीटर यांनी दुधाचा रेट फॅट प्रमाणे कमी करुन बीले सादर करावीत असा शेरा देवून बीले परत पाठविली | |
| 15/08/2014 | खरेदी विभागाने बीलातून किती रक्कम कपात करावी याचा स्पष्ट अभिप्राय इकडील विभागास द्यावा असे पत्र कॅन्टीन विभागास दिले | दि.15/08/2014 रोजी खरेदी विभागाकडून कॅन्टीन विभागास पत्र देण्यात आले. |
| 19/08/2014 | पुरवठाधारकांनी दि.1/07/2014 ते दि.15/07/2014 अखेर पुरवठा केलेले दुध व दि.13-14/07/2014 रोजी पुरवठा केलेले दुध व प्री ऑडीटर यांचे अभिप्राया नुसार फॅट प्रमाणे देय होणारी व वसूल करावयाची रक्कम या बाबत टिपणी मध्ये रक्कम दर्शविण्यात | दि.23/08/2014 रोजी सदर टिपणीवर कृपया चर्चा करावी असा शेरा देण्यात आला. समक्ष चर्चा केलेनंतर कराराप्रमाणे 1 दिवसाची रक्कम कपात करुन वसूल करता येईल |

| | | |
|---|---|---|
| | आली.करारनाम्यातील शर्ती व अटी नुसार श्री स्वामी समर्थ डीस्ट्रीब्युटर्स, तिसगाव यांनी दि.14/07/2014 रोजी पुरवठा केलेल्या 2297 लिटर दुधाचे रक्कमेतून रु11255 /- व गोदावरी खोरे दुध संघ कोपरगाव यांनी 13/07/2014 रोजी पुरवठा केलेल्या 2196 लिटर दुधाचे रक्कमेतून रु.9992/- कपात करणेबाबत टिपणी करणेत आली. | मान्यता असावी असा मा.उप का.अ.यांनी शेरा दिला. सदर टिपणीवर पुरवठाधारकाचे म्हणणे जाणून घेवून प्रस्ताव ठेवा असा मा.का.अ.यांनी शेरा दिला. |
| 1/09/2014 | पुरवठाधारकांकडून वरील शेऱ्याप्रमाणे पत्र घेण्यात आले.पुरवठाधारकांनी दि.13/07/2014 व 14/07/2014 रोजी पुरवठा केलेल्या दुधाची फॅट व एसएनएफ कमी असलेने करारानाम्यातील शर्ती व अटी प्रमाणे 0.35 पैसे प्रमाणे कपात करुन घेणेस पत्राव्दारे मान्यता दिली. | श्री स्वामी समर्थ डीस्ट्रीब्युटर्स, तिसगाव यांचेकडून दि.31/08/2014 व गोदावरी दुध संघ याचेकडून .1/09/2014 रोजी या दुध पुरवठाधारकांकडून पत्र घेण्यात आले. |
| 02/09/2014 | करारनाम्यातील शर्ती व अटीप्रमाणे सदरदिवशी पुरवठा झालेल्या दुधाची फॅट कमी असलेने 0.35 पैसे प्रमाणे गोदावरी दुध संघ,कोपरगाव यांचे दि.16/07/2014 ते दि.31/07/2014 अखेरचे बीलातून रु.9992/- व श्री स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगाव यांचे दि.16/07/2014 ते 31/07/2014 चे बीलातून रु.11255/- कपात करुन बील अदा करणेबाबत टिपणी सादर करणेत आली | दि.2/09/2014 चे टिपणीस मा.कार्यकारी अधिकारी यांनी मान्यता दिली. |
| 09/09/2014 | प्री ऑडीटर यांनी आवशकते प्रमाणे घेण्यात आलेल्या रिपोर्ट हा 15 दिवसाचे बिलास रिप्रेझेंट करीत आहे,असे दिसते असा शेरा देवून बील खरेदी विभागाकडे परत पाठविले. | 09/09/2014 रोजी खरेदी विभागाकडे बिले परत आली. |
| 16/09/2014 | खरेदी विभागाने प्री ऑडीटर यांचे शेऱ्याप्रमाणे मा.कार्यकारी अधिकारी यांचे | दि.16/09/2014 रोेजी खरेदी विभागाने |

| | | |
|---|---|---|
| | आदेश घेवून इकडील विभागास कळवावे,असे पत्र कॅन्टीन विभागास दिले. | का.अ.यांचे आदेश घेवून इकडील विभागास कळवावे,असे पत्र कॅन्टीन विभागास दिले. |
| 21/09/2014 | कॅन्टीन विभागाकडून पुरवठाधरकांकडून दुधाचे बॅच नंबर मागविण्यात आले.सदरचे बॅच नंबर दररोज बदलत असतात, असे पुरवठाधारकांनी पत्राव्दारे कळविले आहे. त्याप्रमाणे दि.13/07/2014 रोजी गोदावरी दुध संघ, कोपरगाव यांनी बॅच नं.बी एन पी 13 दि.13/07/2014 नुसार 2196 लि. व श्री स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स,तिसगाव यांनी 14/07/2014 रोजी बॅच नं.14 ए दि.14/07/2014 नुसार 2297 लिटर दुधाचा पुरवठा केलेला असलेने करारनाम्यानुसार सदर दिवसी पुरवठा झालेल्या रक्कमेची गोदावरी खोरे दुध संघ यांचे दि.16/07/2014 ते दि31/07/2014 चे प्रलंबीत बीलातून रु.9992/- व श्री स्वामी समर्थ डिस्ट्रीब्युटर्स, तिसगाव यांचे प्रलंबीत बीलातून रु.11255/- वसूल (कपात) करणेबाबत टिपणी सादर करण्यात आली. | दि.21/09/2014 चे टिपणीवर लेखाशाखेकडून सादर करा असा मा.का.अ.यांनी शेरा दिला. |
| 14/10/2014 | उपरोक्त घटनाक्रमाचे अनुषंगाने खरेदी विभागामार्फत सविस्तर टिपणी सादर करण्यात आली. | सदर टिपणीवर दि.16/10/2014 रोजी प्रस्ताव तत्कालीन कार्यकारी अधिकारी यांनी यापुर्वीच मान्य केला आहे. त्याप्रमाणे अंमलबजावणी करावी. भविष्यात अशी अडचण पुन्हा उपस्थित होवू नये यासाठी निश्चीत स्वरुपाची व्यवस्था करावी, असा शेरा देण्यात आला. |

मा.मुख्यलेखाधिकारी यांनी दि.18/10/2014 चे टिपणी अन्वये 3.5 फॅटचे व 8.5 एसएनएफ चे दुध कॅन्टीन विभागाला प्राप्त होते किंवा कसे हे तपासले

शिवाय भाव निश्चित करता येत नव्हता.3.5 फॅट चे दुध आहे हे शासकिय प्रयोग शाळेत मशिनव्दारे तपासल्याशिवाय कळणारच नाही.परंतू कॅन्टीन विभागाने कधीही दुधाचे फॅटची टक्केवारी तपासली नाही.कारण संस्थानने अशा प्रकारची यंत्रणाच ठेवलेली नव्हती जेव्हा लेखाशाखेने वारंवार मुद्दे उपस्थित केले . तेव्हा कॅन्टीन विभागाने दर पंधरा दिवसाला शासकिय प्रयोग शाळेकडील दुध पुरवठा फॅटची टक्केवारी निश्चित करण्याचे ठरविले व त्या रिपोर्ट प्रमाणे 15 दिवसाचा भाव दिला.ज्या ज्या वेळेस दुधाचा 3.5 फॅटचा पुरवठादाराला अनुकूल रिपोर्ट आला त्यावेळेस सदरील रिपोर्ट हा 15 दिवसाच्या दुधासाठी आहे,असे मानून देयक सादर केले.परंतू ज्यावेळेस दुधाचा रिपोर्ट पुरवठादाराला अनुकूल आला नाही म्हणजेच (3.5 पेक्षा कमी आला ) व पुरवठादारचे नुकसान होणेचे दिसू लागले त्यावेळेस रिपोर्ट न जोडता पुर्ण रक्कमेचे देयक सादर करुन काढण्यात आले दि.01/07/2014 ते दि.15/07/2014 या कालावधीची एकूण रक्कम पुरवठादारास अतिरीक्त आदा झाली असे नमुद केले आहे.

**खुलासा**-खरेदी विभागाकडून दुध खरेदी करुन कॅन्टीन विभागास पुरविले जाते दुधाचे दर खरेदी विभागामार्फत निश्चित करण्यात आले आहे.कॅन्टीन विभागाकडे पुर्वी दुधाची गुणप्रत तपासण्याची सुविधा नव्हती.दर पंधरा दिवसांनी/आवशकतेनुसार वेळोवेळी शासकिय प्रयोग शाळेतून दुधाची तपासणी करुन घेणेबाबत **दि.31/05/2014 रोजी प्रशासकिय मंजूरी घेणेत आली.** व त्या मंजूरीप्रमाणे दर 15 दिवसांनी/आवशकतेनुसार शासकिय प्रयोग शाळेतून दुध तपासणी करुन घेण्याची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे.

शासकिय प्रयोगशाळेत दुध तपासणीसाठी पाठविलेनंतर त्याबाबतचा तपासणी अहवाल इकडील कार्यालयास 10 ते 15 दिवसांनी उपब्लध होतो. मिळालेला अहवाल माहितीसाठी सादर करणेत येतो.

पुर्वी कॅन्टीन विभागाकडे दुधाची गुणप्रत तपसणेची सुविधा नव्हती सद्यस्थितीत दुध तपासणी मशिन उपलब्ध करुन घेण्यात आली असून पुरवठाधारकांनी पूरवठा केलेल्या दुधाची फॅट व डीग्री दररोज तपासून घेतली जात आहे.व त्याप्रमाणे नोंदी घेवून दूधाची फॅट व डीग्रीचे दैंनदिन माहीतीचा तक्ता बीला सोबत जाइून बीले आदा करणेसाठी लेखाशाखेकडे पाठविली जात आहेत.तसेच आधुनिक दुधतपासणी मशिन खरेदीच्या खर्चास मा.व्यवस्थापन समितीचे दि.5/06/2014 रोजीचे सभेतील निर्णय क्रं.403 अन्वये मान्यता घुवून खरेदीची कार्यवाही करण्यात आलेली आहे. पुरवठाधारकांकडून तीन निविदा प्राप्प झाल्या होत्या पैकी दोन निविदा पात्र ठरल्याने व पुरेशी स्पर्धा होवू न शकलेने मुख्यलेखाधीकारी यांचे सुचनेनुसार पुन्हा फेरनिविदा मागणीची कार्यवाही सुरु करण्यात आलेली आहे. जनसपर्क कार्यालयाकडे वर्तमान पत्रातून जाहीरात प्रसिध्द करणेसाठी जाहीरातीचा मसूदा दि.18/09/2014 रोजी देण्यात आलेला आहे .अद्यावत दुध तपासणी मशिन खरेदी केल्या नंतर दुध तपासणी

साठी अडचणी येणार नाहीत कॅन्टीन विभागामार्फत कोणतीही दिशाभुल करण्यात आलेली नाही, असे नम्र मत आहे.

**अ)**

**01)** कॅन्टीन विभागाकडील दि.2/09/2014 चे टिपणी नुसार गोदावरी खोरे दुध,संघ कोपरगाव यांचे दि.16/07/2014 ते 31/07/2014 अखेरचे बीलातून करारनाम्यातील शर्ती व अटीनुसार दि.13/07/2014 रोजी दुधपूरवठा झालेल्या दूधाचे रक्कमेतून रु.9992/- व श्री स्वामी समर्थ डीस्ट्रीब्युटर्स तिसगाव यांचे दि.14/07/2014 रोजी पुरवठा केलेल्या दुधाचे रक्कमेतून दि.16/07/2014 ते 31/07/2014 अखेरचे बीलातून रु.11255/- मात्र रक्कम कपात (वसूल) करुन बीले आदा करण्ेस तत्कालीन कार्यकारी अधिकारी सो यांनी मान्यता दिलेली आहे

**02)** खरेदी विभागाकडील दि.14/10/2014 चे टिपणीवर मा.कार्यकारी अधिकारी यांनी प्रस्ताव तत्कालीन कार्यकारी अधिकाऱ्यांनी यापूर्वीच मान्य केला आहे. त्याप्रमाणे (वरील अ प्रमाणे मान्य केलेल्या टिपणीनुसार) शेरा देऊन बीले आदा करणेस मान्यता दिलेली आहे.

**03)** विधी अधिकारी यांनी दि.1/07/2014 ते दि.15/07/2014 चे दरम्यान दोनही पुरवठाधारकांकडून पुरवठा झालेले टोन्ड गाय दुधाचे बील अदायगीबाबत दि.02/09/2014 व दि.14/10/2014 चे टिपणी वरील तत्कालीन मा.कार्यकारी अधिकारी साहेब व सध्याचे मा.कार्यकारी अधिकारी साहेब यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे व करारनाम्यातील अट क्र.3 व 6 प्रमाणे दि.16/07/2014 ते 31/07/2014 अखेरचे बीलातून रक्कम कपात (वसूल) करुन बील अदाई बाबत कार्यवाही करणेस हरकत नाही,असा अभिप्राय दिला आहे.

**ब)** मा.मुख्यलेखाधीकारी /प्री ऑडीटर यांनी तपासणी अहवाल 15 दिवसाचे बीलास रिप्रेझेंट करतो त्या प्रमाणे 15 दिवसाचे पुरवठा झालेल् या दुधाचे रक्कमेतून पुर्ण 15 दिवसाची रक्कम फॅटचे दराप्रमाणे कपात (वसूल) झाली पाहीजे असे मत व्यक्त केले आहे. मात्र करारनाम्यात 15 दिवसाची रक्कम कपात (वसूल) करणे बाबत स्पष्ट उल्लेख नाही.तथापी अ अथवा ब प्रमाणे कार्यवही करणे बाबत मा.त्रिसदस्सीय समितीचे सभेत निर्णयार्थ सविनय सादर

**निर्णय क्र.१०३२** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, संस्थानचे दूध पुरवठाधारकांनी कमी प्रतीचे दूधाचा पुरवठा केल्यास प्रस्तावात नमुद केलेल्या अ प्रमाणे ज्या दिवशी कमी प्रतीचे दूध पुरविले जाईल त्या दिवसाच्या बीलाची रक्कम कपात करणेत यावी.**

**तसेच यापुढे करारनाम्यातील अटी/ शर्तीप्रमाणे दूध प्राप्त न झाल्यास त्या दिवसाच्या बीलाची रक्कम पुरवठाधारकांकडून वसूल करणेत येईल, या आशयाचे लेखी पत्र पुरवठाधारकांना देण्यात यावे, असे ठरले.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, कॅन्टीन विभाग)

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१४ श्री साईनाथ रुग्णालयामधील आय.सी.सी.यू. (अतिदक्षता विभागाचे) बेडच्या संख्येमध्ये वाढ करणेबाबत तसेच अतिदक्षता विभाग शिफ्ट करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.अध्यक्ष श्री ज.द.कुलकर्णी सो. यांनी दिनांक 18/01/2014 रोजीच्या पत्रासोबत सादर केलेल्या प्रस्तावामध्ये अ.क्र.2 मध्ये "श्री साईनाथ हॉस्पिटलजवळ हॉस्पिटल कॅन्टीन असून सदरहू जागा अतिशय मोठी आहे. त्याठिकाणी रुग्णांच्या नातेवाईकांना जमिनीवर बसून जेवण वाढण्यात येते वास्तविक पाहता रुग्णांना संस्थानतर्फे मोफत व जागेवर जेवण देण्यात येते.रुग्णांचे नातेवाईक प्रसादालयात जावून जेवण घेवू शकतात. त्यामुळे ही कॅन्टीनची जागा उपलब्ध झाल्यास तेथे कमीतकमी 7-8 आ.सी.सी.यु.वॉर्डर्स उपलब्ध होवू शकतात व रुग्णांच्या नातेवाईकांची चहा पाण्याची व्यवस्था दुसऱ्या जागेत करता येईल. त्यामुळे हे हॉल्स याक्य त्या सर्व सुधारणा व सोयी सुविधा उपलब्ध करुन त्यांचे वॉर्डमध्ये रुपांतर करावे या विययीची आवश्यक ती सर्व माहिती व कागदोपत्री कार्यवाही 8 दिवसांच्या आत करावी", असे नमुद केले आहे. मा.अध्यक्ष महोदय यांच्या उपरोक्त पत्रात नमूद केल्याप्रमाणे आवश्यक ते कार्यवाही करण्याच्या दृष्टीने मा.व्यवस्थापन समितीचे दिनांक 04/02/2014 रोजीचे सभेमध्ये प्रस्ताव निर्णयासाठी सादर करण्यात आला होता.त्यावर चर्चा होवून निर्णय क्र.85 खालीलप्रमाणे झाला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होवून संस्थान रुग्णालयामध्ये दिवसेंदिवस रुग्णांची संख्या वाढत असल्याने रुग्णालयाची इमारत कमी पडत आहे. याकरिता श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाच्या आवश्यक सुविधांमध्ये व बेडचे संख्येत वाढ करणेस मान्यता देण्यात आली. तसेच मा.अध्यक्ष महोदय हे शिर्डी भेटी दरम्यान श्री साईबाबा व श्री साईनाथ हॉस्पिटलची व बेडचे संख्येत वाढ करणेसाठी जागेची पाहणी करतील, असे ठरले".

दिनांक 04/03/2014 रोजीच्या मा.कार्यकारी अधिकारी सो., यांचे अध्यक्षतेखाली संस्थानच्या दोन्ही रुग्णालयातील वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या कामाकाजाचा आढावा घेणेसाठी प्रशासकीय अधिकारी व अधिक्षक यांचेसमवेत झालेल्या सभेमध्ये खालीलप्रमाणे चर्चा होवून निर्णय झालेला आहे.

(9) श्री साईनाथ रुग्णालयाचे अतिदक्षता विभाग हे तेथील कॅन्टीनचे जागेवर त्वरीत शिफ्ट करण्यात यावे. कॅन्टीनसाठी बाजूला शेड बांधण्यात यावे. सदर कार्यवाही 1 महिन्यात पुर्ण करावी.

सदरबाबत बांधकाम विभाग प्रमुख यांचेमार्फत मा.व्यवस्थापन समितीचे दि.23/05/2014 रोजीच्या सभेमध्ये प्रस्ताव सादर करण्यात आला होता. सदर सभेमध्ये प्रस्तावावर चर्चा होवून निर्णय क्र.298 खालीलप्रमाणे झालेला आहे.

"यावर सविस्तर चर्चा होवून श्री साईनाथ रुग्णालयामध्ये दिवसंदिवस रुग्णांची संख्या वाढत असल्याने कॅन्टीनची इमारत रुग्णांच्या वाढीव सोयीसुविधेसाठी उपलब्ध करुन देणेबाबत व त्यासमोरील जनरेटर असलेल्या जागेत उपहारगृह व कॅन्टीनचे 18.90 लाख मात्र येणाऱ्या खर्चाबाबत संस्थानच्या वकिलामार्फत अर्ज करण्यात येवून मा.उच्चन्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची परवानगी घेण्यात यावी. मा.खंडपीठाच्या आदेशास अधिन राहून उपरोक्त प्रस्तावास मान्यता देण्यात आली.

उपरोक्त प्रमाणे कामासाठी येणाऱ्या खर्चास मा.उच्च न्यायालयाची परवानगी मिळणेकामी सदरचा प्रस्ताव दि. 23/06/2014 रोजी सादर करण्यात आलेला आहे.असे बांधकाम विभाग प्रमुख यांनी त्यांचे दि.18/07/2014 रोजीच्या पत्राने कळविलेले आहे.

श्री साईनाथ रुग्णालयाचे आ.सी.सी.यु. सुविधा बेडच्या संख्येबाबत तसेच त्यामध्ये सुधारणा करणेबाबत साईटची पाहणी करणेकामी मा.प्र.वैद्यकीय संचालक डॉ.राव व वैद्यकीय प्रशासक डॉ.मकवाना यांनी समक्ष येवून पाहणी केली. व त्यानूसार खालीलप्रमाणे बदल करणेबाबत प्रस्ताव सादर करणेबाबत सुचना दिलेल्या आहेत.

1. प्रस्तावामध्ये नमूद केल्याप्रमाणे कॅन्टीनची इमारत ताब्यात मिळाल्यानंतर त्याठिकाणी सध्याचे वैद्यकीय अधिक्षक कार्यालय रुम.नं.31, प्रशासकीय कार्यालय रुम नं.77, अनुदान विभाग रुम नं.32, अनुदान विभाग रेकॉर्ड रुम नं.45, एमआरडी विभाग (केसपेपर विभागातील) हे विभाग सदर इमारतीमध्ये पहिल्या माळयावर शिफ्ट करता येतील.तसेच अधिसेविका कार्यालय रुम नं.7, अधिसेविका जनरल कार्यालय रुम नं.2 हे कार्यालय शिफ्ट करता येतील.

2. तसेच सदर कॅन्टीनच्या वरती (टेरेस) उत्तर बाजूला साईनाथ रुग्णालय व श्री साईबाबा हॉस्पिटलमधील नेमणूकीस असलेले निवासी वैद्यकीय अधिकारी यांचे निवासासाठी बांधकाम विभाग यांचे मार्गदर्शनाने व सल्ल्याने सर्व सोयीसुविधांनी युक्त असे होस्टेल करिता रुम्स तयार करता येतील. तसेच दक्षिण बाजूच्या गच्चीवर श्री साईनाथ रुग्णालय तसेच श्री साईबाबा हॉस्पिटलमधील सर्व वैद्यकीय अधिकारी व कर्मचारी यांचेकरिता सुसज्ज कॉन्फरन्स हॉल तयार करता येईल.

उपरोक्त नमूद केलेली कामे पूर्ण होवून सदरची कॅन्टीन इमारत ताब्यात मिळाल्यानंतर श्री साईनाथ रुग्णालय इमारत क्र.1 मधील पहिल्या मजल्यावर रुम नं.31,77,32 व 45 व 78 या ठिकाणी साधारणपणे 20 ते 25 बेडचे अतिदक्षता विभाग (सर्व अद्ययावत सुविधांनी युक्त) तसेच परिचारिकांसाठी चेंजिंग रुम तसेच वैद्यकीय अधिकाऱ्यांसाठी रेस्ट रुम/चेंजिग रुम करता येतील.

तसेच श्री साईनाथ रुग्णालयातील बिल्डींग नं.01 मधीलतळमजल्यातील रुम नं.14,11, रुम नं.7 व रुम नं.2 या ठिकाणी आवश्यकतेनूसार प्रयोगशाळा, हिस्टोपॅथ विभाग,बायोकेमेस्टी (एलायझा रुम) सिुविधा करता येईल.

तथापी सदर इमारती मधील बदला बाबत संस्थानचे उपकार्यकारी अभियंता बांधकाम यांचे ही मार्गदर्शन घ्यावे लागेल असे मत आहे.

स्पष्ट अभिप्राय:- उपरोक्त प्रमाणे साधारण 20 कॉटचा अतिदक्षता विभाग सुरु केल्यास त्याठिकाणी रुग्णासेवेसाठी 24 तास आर.एम.ओ. आवश्यक असतात. सध्या संस्थानच्या साईनाथ रुग्णालयाकडे एकूण-07 आर.एम.ओ. आहेत. पैकी 01 डिप्लोमा इन अर्थोपेडीक केलेला असल्याने ते (डॉ.गायकवाड) अथोर्पेडीक विभागाकडे काम पहात आहेत. 02 आर.एम.ओ. यांनी डिप्लोमा इन गायनॅक केलेला असल्याने सदरचे दोनही (डॉ.शितल बागडीया/ डॉ. ज्योती गवादे) आर.एम.ओ हे गायनॅक विभागाकडे कामे पहात आहेत. 01 आर.एम.ओ. यानी डिप्लोमा ईन आप्थॉल्मा केलेला असल्याने ते (डॉ. सोनटक्के ) सध्या नेत्ररोग विभागात काम पहात आहेत. तसेच 01 आर.एम.ओ. डॉ. भरत धोका हे डॉ. सितारा काटकर यांचे सेवानिवृत्तीमुळे रिक्त झालेल्या ठिकाणी (ब्लड बँकेकडे ) काम पहात आहेत. पैकी फक्त दोन आर.एम.ओ. सध्या यांचेवर अपघात विभाग,अतिदक्षता विभाग, मोबाईल वैद्यकिय सेवा, प्रथमोपचार केंद्र इ. सेवा अवलबून आहेत. त्यामुळे सध्या अतिदक्षता विभागाकडे सध्या आर.एम.ओ.डॉक्टर उपलब्ध करता येत नाही. त्यामुळे सध्या सदर अतिदक्षता विभागामध्ये आर.एाम.ओ. नसल्याने सध्याच्या बहुतेक वैद्यकिय सेवा विस्कळीत आहेत.

श्री साईनाथ रुग्णालयात अनेक वर्षापासून एकच फिजीशियन आहे. त्यांचेवरच संपूर्ण मेडीसीन विभाग अवलंबून आहे. नवीन आयसीयु विभाग सुरु केल्यास रुग्णाची निश्चित सोय होईल. परंतु फिजीशियन व आर.एम.ओ. डॉक्टराअभावी रुग्णांकडे दुर्लक्ष, होण्याची शक्यता आहे. त्यामुळे फिजिशियन व आर.एम.ओ. डॉक्टर यांच्या उपलब्धतेनंतरच असा विभाग सुरु करावा असे मत आहे.

तरी सदरच्या प्रस्तावावर चर्चा होऊन निर्णयास्तव सविनय सादर.

**निर्णय क्र.१०३३ उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रुग्णालयामधील आय.सी.सी.यू. (अतिदक्षता विभागाचे) बेडच्या संख्येमध्ये वाढ करणेस व अतिदक्षता विभाग इतरत्र हलवणेस प्रशासकीय मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१५ श्री साईनाथ रुग्णालयाचे रक्तपेढीतील रक्त संबंधीत दरात सुधारणा करणेबाबत.**

**प्रस्ताव-** मा.सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अहमदनगर यांचे कार्यालयातून त्यांचे दि.27/08/2014 चे पत्र इकडील कार्यालयाकडे दि.04/09/2014 रोजी दाखल झाले आहे. सदर पत्रासोबत महाराष्ट्र शासनाचे सार्वजनिक आरोग्य विभाग त्यांचे परिपत्रक क्र. 2013/प्र.क्र.224/आ-5 दि.18/06/2014 जोडलेले आहे.

सदरचे परिपत्रकात रक्त संबंधित नवीन कमी दर खालीलप्रमाणे प्रस्तावित केलेले आहे.

अ.नं. तपशिल संस्थान रक्तपेढीतील सध्याचे दर शासन परिपत्रकात प्रस्तावित नवीन दर 01 Fresh Frozen Plasma (FFP) Rs.500/- Rs.400/- 02 Platelet Concentrate Rs.600/- Rs.400/- 03 Cryoprecipitate (Cryo) Rs.300/- Rs.250/- यामध्ये Fresh Frozen Plasma (FFP), Platelet Concentrate व Cryoprecipitate यांचे दर सुधारित दरापेक्षा संस्थान रक्तपेढीतील जास्त आहेत व इतर घटकांचे दर कमी आहेत.

श्री साईनाथ रुग्णालयाचे रक्तपेढी मध्ये शासनाने सुचविलेल्या सुधारित दराने कार्यवाही करणे आवश्यक आहे.

तरी स्तंभ क्र.04 मध्ये दर्शविल्याप्रमाणे श्री साईनाथ रक्तपेढीतील उपरोक्त रक्त संबंधित सुधारित दर आकारणी करणेसाठी कार्योत्तर मान्यता मिळणेस विनंती.

**निर्णय क्र.१०३४ उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईनाथ रक्तपेढीतील रक्त संबंधीत सुधारित दर आकारणी करणेस कार्योत्तर मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

----------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१६ श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये चार कार्डीओलॉजीस्ट ११ महिने कालावधीसाठी घेणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थान विश्वस्तव्यवस्था, शिरडी अधिनियम **2004** मधील समितीचा कार्यकारी अधिकारी व इतर अधिकारी कलम **13 (4)** मध्ये प्रामुख्याने खालीलप्रमाणे तरतूद आहे.

समितीस, संस्थान विश्वस्तव्यवस्थेचा कारभार कार्यक्षतेने चालविणेसाठी आणि या अधिनियमान्वये तिची कर्तव्ये व कामे पार पाडण्यासाठी आवश्यक वाटतील अशा अधिकाऱ्यांची (कार्यकारी अधिकाऱ्याव्यतिरिक्त) व कर्मचाऱ्यांची नेमणूक करता येईल:

परंतु, ज्या अधिकाऱ्याला किंवा कर्मचाऱ्याला दरमहा दोन हजार रुपयाहून अधिक वेतन देण्यात येत असेल किंवा द्यावयाचे असेल, अशा कोणत्याही अधिकाऱ्याची किंवा कर्मचाऱ्याची नेमणूक समितीकडून, असे पद

शासनाने मान्य केलेल्या कर्मचारी आकृतीबंधानुसार मंजूर करण्यात येईपर्यंत, केली जाणार नाही अशी तरतूद आहे.

शासनाचे मंजूर केलेल्या आकृतीबंधातील अटी-शर्ती क्र. **3-** सदर पदांवर नव्याने नियुक्ती करतांना समितीने सदर पदाची आवश्यकता व अर्हता याबाबत विस्तृत प्रसिध्दी देऊन सदर पदांवर स्पर्धात्मक परिक्षा घेऊन नियुक्ती करावी, असे नमूद केले आहे. तसेच अटी-शर्ती क्र. **6** समितीला आकृतीबंधाबाहेर जाऊन पदे भरती करता येणार नाही. अटी-शर्ती क्र. **8-** समितीने शक्यतो आकृतीबंधातील पदे ही एकत्रित मानधनावर किंवा कंत्राटी पध्दतीने भरावी. जेणेकरुन व्यवस्थापन निधीवर भार पडणार नाही.

श्री साईबाबा हॉस्पीटलचे आकृतीबंधामध्ये इंटरव्हेशनल कार्डीओलॉजीस्टची दोन स्थायी पदे मंजूर असून सदरचे पदांवर डॉ. हरिष हुकुमचंद बजाज व डॉ. गौरव सरदारीलाल वर्मा कार्यरत आहे. सध्या श्री साईबाबा हॉस्पीटलमध्ये राजीव गांधी जीवनदायी आरोग्य योजना सुरु असल्याने हृदयविकाराचे जास्त रुग्ण येतात. यामुळे सध्या कार्यरत असलेल्या दोन कार्डिओलॉजीस्ट यांचेवर कामाचा जादा भार पडत आहे.

श्री साईनाथ रुग्णालयाचे आकृतीबंधामध्ये कार्डिओलॉजीस्टचे पद मंजूर नाही. श्री साईबाबा हॉस्पीटलचे आकृतीबंधामध्ये कार्डिओलॉजीस्टची पदे मजूर असून त्याचा गोषवारा थोडक्यात खालील प्रमाणे आहे.

| पदाचे नाव | प्रस्तावित शैक्षणिक पात्रता | मंजुर पदे | भरलेली पदे (कायम) | रिक्त पदे | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| **Interventional Cardiologist** हृदयविकार तज्ञ | **1) Age not more than 45 years; 2) DM or DNB from any Government recognized University; 3) Experience minimum 2 years in similar capacity.** | **02** | **02** | **00** | डॉ. राहुल पाटील यांची व्हिजीटींग कार्डिओलॉजीस्ट म्हणून नेमणूक केली आहे. |

आकृतीबंधानुसार इंटरव्हेशनल कार्डिओलॉजीस्ट या पदाच्या दोन जागा मंजूर असून दोन्ही जागेवर वैद्यकिय अधिकारी कार्यरत आहे.

कार्डीओलॉजीस्ट विभागाचा अतिरीक्त कार्यभार विचारात घेता मा. मुंबई उच्च न्यायालाचे खंडपीठ औरंगाबाद यांचेसमोर सिव्हील ऍप्लीकेशन नंबर **2797/2014** मधील दि. **19/03/2014** रोजीच्या मा. न्यायालयाच्या आदेशानुसार व मा. व्यवस्थापन मंडळाचे दि.**12/04/2014** रोजीचे सभेतील निर्णय क्र **275** अन्वये दोन कार्डीओलॉजिस्ट पूर्णवेळ व **6** व्हिजीटींग तत्वावर

नेमण्यात आलेले आहेत त्यापैकी डॉ विनोद विजन हे सेवेत रुजू झाले नाही व डॉ. शितलकुमार प्रकाश हिरण हे सतत गैरहजर आहेत. तसेच डॉ हरीष हुकुमचंद बजाज व डॉ गौरव सरदारीलाल वर्मा यांचे कामातील अनियमितता व निष्काळजीपणामुळे त्यांना मा. व्यवस्थापन समिती सभेच्या दि. **06/11/2014** रोजीच्या सभेतील निर्णय क्र **983** अन्वये दि. **07/11/2014** पासून संस्थान सेवेतून तात्पुरते सेवा निलंबित करण्यात आलेले आहे. त्यामुळे सध्या चार कार्डीओलॉजीस्ट सेवेत नाहीत परिणामी रुग्णसेवेवर त्याचा विपरीत परिणाम होत आहे. हृदयरोग रूग्णांची संख्या जास्त आहे व वैद्यकीय अधिकाऱ्यांची संख्या अपुरी आहे त्यामुळे सेवेत असलेल्या कार्डीओलॉजीस्टवर अतिरिक्त कामाचा ताण पडतो.

अशा परिस्थितीत रूग्णसेवेवर विपरीत परिणाम होऊ नये म्हणून मा. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ औरंगाबाद यांचे दि. **19/03/2014** रोजीचे आदेशानुसार व मा व्यवस्थापन मंडळाचे दि. **12/04/2014** रोजीचे सभेतील निर्णय क्र **275** नुसार सध्या संस्थानकडे उपलब्ध असलेल्या नोकरी मागणी अर्जातून चार कार्डीओलॉजीस्ट उमेदवारांना कंत्राटी पध्दतीने **11** महिने कालावधीसाठी कार्योत्तर मंजुरीबाबत निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१०३५ उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये चार कार्डीओलॉजीस्ट संस्थानला कुशल/ अकुशल कंत्राटी कर्मचारी पुरविणा-या कंत्राटदारामार्फत ११ महिने कालावधीसाठी घेण्यात आलेले आहेत, त्यास कार्योत्तर मान्यता देण्यात आली.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१७ डॉ.हरिष हूकुमचंद बजाज व डॉ.गौरव सरदारीलाल वर्मा, इंटरव्हेन्शनल कार्डीओलॉजीस्ट यांचे खाते चौकशीकामी चौकशी अधिकारी नेमणेबाबत.**

**प्रस्ताव-** डॉ हरिष हुकुमचंद बजाज व डॉ गौरव सरदारीलाल वर्मा हे संस्थानचे श्री साईबाबा हॉस्पिटलमध्ये हृदयरोगतज्ञ या पदावर कार्यरत आहेत. त्यांनी कॅथलॅबमध्ये पेशंटसाठी वापरण्यात येणारे स्टेंट, बलून व इतर साहीत्याचा वापर करणेकरता बेकायदेशिररित्या विविध कंपन्यांकडून पैसे घेतलेले आहेत. तसेच रूग्णांच्या प्रोसिजर्स व औषधोपचारामध्ये अनियमितता, निष्काळजीपणा केलेला आहे. अशा व इतर अनेक तक्रारी आलेल्या आहेत. सदरचा विषय मा. व्यवस्थापन मंडळाच्या दि. **03/08/2014** रोजीचे सभेत सविस्तर चर्चा झालेली आहे. सदरच्या सभेत निर्णय क्र **606** असा पारित करणेत आला की, डॉ आर व्ही प्रभाकरराव, प्र. वैद्यकीय संचालक यांची याप्रकरणी चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यात आली. चौकशी अधिकारी यांनी प्रथम डॉ हरिष हुकुमचंद बजाज व डॉ गौरव सरदारीलाल वर्मा यांना कारणे दाखवा नोटीस बजवावी

त्यासाठी वेळ देवून संबंधितांचे लेखी म्हणणे मागविणेत यावे संबंधितांचे लेखी खुलासे प्राप्त झालेनंतर ते त्रिसदस्यीय समितीसमोर ठेवावे. त्रिसदस्यीय समितीसमोर खुलासा आल्यानंतर तो खुलासा त्रिसदस्यीय समितीला समाधानकारक वाटला नाही, त्यामुळे श्री.आर.व्ही. प्रभाकर राव यांना चौकशी अधिकारी नेमून डॉ.वर्मा व डॉ.बजाज यांची खातेनिहाय चौकशी करण्याचे आदेश देण्यात आले व चौकशी पूर्ण झालेनंतर चौकशी अधिकारी यांनी चौकशीचा अहवाल एक महिन्याचे आत मा. व्यवस्थापन मंडळासमोर सादर करावा, असे ठरले.

मा. व्यवस्थापनाच्या निर्णयानुसार डॉ हरिष हुकुमचंद बजाज व डॉ गौरव सरदारीलाल वर्मा यांना दि. **20/08/2014** रोजी कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली. डॉ हरिष हुकुमचंद बजाज व डॉ गौरव सरदारीलाल वर्मा यांनी दि. **22/08/2014** रोजी विनंती अर्ज सादर करून खुलासा सादर करणेकामी दोन महिन्याच्या मुदतीची मागणी केली होती. चौकशी अधिकारी या नात्याने त्यांना दि. **09/09/2014** रोजी लेखी खुलासा सादर करणेकामी सात दिवसाची मुदत दिली. याबाबत त्यांना लेखी पत्राद्वारे कळविले आहे. तरी देखील त्यांनी ३ महिने होवूनही त्यांचा लेखी खुलासा सादर केलेला नाही.

प्राथमिक चौकशीत सकृत दर्शनी असे दिसुन येते की, डॉ हरिष हुकुमचंद बजाज व डॉ गौरव सरदारीलाल वर्मा यांचेवरील आरोपात तथ्य आहे. त्यामुळे मा. व्यवस्थापन समितीचे दि. **06/11/2014** रोजीचे सभेतील निर्णय क्र **983** अन्वये डॉ हरिष हुकुमचंद बजाज व डॉ गौरव सरदारीलाल वर्मा यांचेवर दि. **06/11/2014** रोजी रीतसर आरोपपत्र बजावलेले आहे. तथापि खाते चौकशीत साक्षीदारांवर दबाव आणू नये तसेच कागदपत्रांमध्ये फेरफार, बदल, नष्ट करू नये यासाठी आरोपीत डॉ हरिष हुकुमचंद बजाज व डॉ गौरव सरदारीलाल वर्मा यांना दि. **08/11/2014** पासून तात्पुरते संस्थान सेवेतुन सेवा निलंबित करण्यात आले आहे. तसेच या निर्णयात असे म्हटले आहे की, चौकशी अधिकारी यांनी पुढील चौकशी करून लवकरात लवकर चौकशी अहवाल सादर करावा.

आता, डॉ हरिष हुकुमचंद बजाज व डॉ गौरव सरदारीलाल वर्मा यांचेवर आरोपपत्र बजावले असुन खाते निहाय चौकशी सुरू करणे आहे. त्यासाठी स्वतंत्र चौकशी अधिकारी यांची नेमणूक करावी लागेल कारण सदर प्रकरणी डॉ रामायणम व्यंकट प्रभाकरराव यांनी प्राथमिक चौकशीत चौकशी अधिकारी म्हणून काम केलेले आहे. तसेच सदर आरोपीत डॉ हरिष हुकुमचंद बजाज व डॉ गौरव सरदारीलाल वर्मा यांनी डॉ रामायणम व्यंकट प्रभाकरराव यांचेवर आक्षेप व आरोप केलेले आहेत. संस्थान कर्मचाऱ्यांच्या खाते चौकशी कामी संस्थानने **1992** पासून ॲड बी वाय काळवाघे, कोपगाव यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक केलेली आहे. परंतु त्यांचे वयोमान व आरोपांचे स्वरुप विचारात घेता सदर खाते चौकशीकामी स्वतंत्र चौकशी अधिकारी पदी सोबतचे परिशिष्ट अ

मधील संस्थानचे ऍ़डव्होकेट पॅनेलवर असलेल्या ऍ़डव्होकेट्स पैकी एका ऍ़डव्होकेटची नेमणूक करता येईल त्यांचे मदतीसाठी वैद्यकीय क्षेत्रातील तज्ञ डॉ अनिरुध्द वि. धर्माधिकारी, हृदयरोग तज्ञ यांची मदत घेता येईल. खाते चौकशीत डॉ रामायणम व्यंकट प्रभाकरराव, प्र. वैद्यकीय संचालक यांना सादरकर्ते अधिकारी म्हणुन काम करता येईल.

तरी उपरोक्त प्रस्तावावर निर्णय होणेस विनंती.

**निर्णय क्र.१०३६** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, डॉ.हरिष हूकुमचंद बजाज व डॉ.गौरव सरदारीलाल वर्मा, इंटरव्हेन्शनल कार्डीओलॉजीस्ट यांनी मा.उच्च न्यायालयामध्ये याचिका दाखल करुन खातेचौकशी स्थगित होण्यासाठी अर्ज केलेला आहे, त्या अर्जावर निकाल होईपावेतो, सदरचा प्रस्ताव स्थगित ठेवण्यात यावा, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

--------------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**विषय नं.१८** **सन २०१३-२०१४ या वर्षाच्या वार्षिक औषधे व सर्जिकल साहित्य खरेदीमध्ये दर प्राप्त न झालेल्या (Re-Tendered 2nd Time) औषधे व सर्जिकल साहित्य खरेदीकामी पुरवठा आदेश देणेबाबत.**

**प्रस्ताव-** श्री साईबाबा संस्थानचे श्री साईबाबा व श्री साईनाथ रुग्णालयाकरीता सन 2013-2014 या वर्षाकरीता लागणारे औषधे, सर्जिकल साहित्य व On Consignment Basis वरील साहित्य खरेदीस व याकामी येणाऱ्या एकूण अंदाजे रु.48,66,64,252/- चे खर्चास दि.26/07/2013 चे मा. त्रिसदस्य समिती सभेतील निर्णय क्र.564 अन्वये मान्यता मिळालेली आहे.

मा. त्रिसदस्य समिती सभेतील मंजूरीनुसार व मा. उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाचे दि. 25/10/2013 रोजीचे आदेशान्वये विविध वर्तमान पत्रात जाहिरात देऊन ई निविदा मागविण्यास मान्यता मिळालेली आहे. त्यानुसार सदरचे खरेदीकामी मा. उच्च न्यायालयाने नियुक्त केलेल्या जिल्हा शल्य चिकित्सक- अहमदनगर, जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे प्रतिनिधी, सरकारी सहाय्यक वकील- औरंगाबाद खंडपीठ, वैद्यकीय संचालक- श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी, वैद्यकीय अधिक्षक- श्री साईनाथ रुग्णालय, शिर्डी सदस्यांची समिती गठीत करुन खरेदीची प्रक्रिया पूर्ण करणेबाबत आदेश दिलेले आहेत. त्यानूसार सदर प्रतीनिधींची दि.22/11/2013 रोजी शिर्डी येथे सभा आयोजित करण्यात आली होती.

सदरचे खरेदीकामी विहीत पध्दतीने ई-निविदा मागविण्यात येऊन त्याकामी संस्थान तर्फे सकाळ - पुणे, लोकमत - नागपूर, टाईम्स ऑफ इंडीया-अहमदाबाद, मंुबई, दिल्ली व चंदीगढ या वर्तमान पत्रातून ई निविदा संबंधीत

जाहिरात प्रसिध्द करण्यात येऊन दि.04/01/2014 अखेर निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यानूसार एकूण 75 निविदा प्राप्त झाल्या होत्या.

उपरोक्त तांत्रीक निविदा मा. उप समितीची सभा दि.06/01/2014 रोजी समक्ष उघडण्यात आल्या होत्या तद्नंतर सदर तांत्रीक निविदाधारकांनी निविदे सोबत मागणी केलेल्या कागदपत्राची तपासणी करणेकामी तक्ता बनवून तो मा. उच्च न्यायालयाने घटीत केलेल्या समितीचे सभेपुढे दि.25/01/2014 रोजी ठेवण्यात आला होता. सदरचे सभेसाठी समितीचे पुढील सदस्य उपस्थित होते. 1) ऍ़ड. श्री. पी.पी. मोरे- सरकारी सहायक वकील, औरंगाबाद खंडपीठ (अध्यक्ष), 2) डॉ. कौशीक मकवाना - वैद्यकीय संचालक, श्री साईबाबा हॉस्पिटल, शिर्डी. (सचिव), 3) डॉ. कोकरे आशिष - अतिरिक्त जिल्हा शल्य चिकित्सक-अहमदनगर, (सदस्य) 4) डॉ. अविनाश आहेर - अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी अहमदनगर (सदस्य) 5) डॉ. संजय पठारे - वैद्यकीय अधिक्षक, श्री साईनाथ रुग्णालय, शिर्डी. (सदस्य)

सदर समितीने प्राप्त निविदाधारकांनी दिलेल्या कागदपत्रे पाहुन चर्चा त्यावर सांगोपाग चर्चा करुन सर्वानुमते तांत्रीक निविदा पात्र ठरवण्यात आल्या तद्नंतर त्याच दिवशी सर्व पात्र निविदाधारकांच्या ऑनलाईन निविदा ह्या समितीपुढे उघडण्यात आल्या व तद्नंतर सर्व निविदाधारकांना सभेपुढे चर्चा / वाटाघाटीसाठी समक्ष बोलवण्यात आले होते. तांत्रीक निविदा उघडल्यानंतर सर्व उपस्थित (62) निविदाधारकांना समिती सभेपुढे समक्ष बोलवून त्यांना सुचना देऊन त्याच्या कडून छापील पत्रावर सुट घेण्यात आली होती.

तद्नंतर सर्व निविदाधारकांनी त्याचे मुळ दरावर दिलेली सुट व मुळ दर यांचा तुलनात्मक तक्ता तयार करुन त्यावर निर्णय घेणेकामी दि.15/02/2014 व दि.19/02/2014 रोजी समितीची सभा आयोजित करण्यात आली होती. सदरचे सभेसाठी समितीचे पुढील सदस्य उपस्थित होते. 1) ऍ़ड. श्री. पी.पी. मोरे - सरकारी सहायक वकील, औरंगाबाद खंडपीठ (अध्यक्ष), 2) डॉ. गोकुळ घोगरे - वैद्यकीय अधिक्षक, जिल्हा शल्य चिकित्सक यांचे प्रतिनिधी. (सदस्य), 3) डॉ. अविनाश आहेर - जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे प्रतिनिधी- अहमदनगर (सदस्य), 4) डॉ. प्रभाकर राव - वैद्यकीय संचालक, श्री साईबाबा हॉस्पिटल,शिर्डी. (दि.15/02/14), 5) डॉ. कौशिक मकवाना - वैद्यकीय संचालक, श्री साईबाबा हॉस्पिटल,शिर्डी. (दि. 19/02/14), 6) डॉ. संजय पठारे - वैद्यकीय अधिक्षक, श्री साईनाथ रुग्णालय, शिर्डी. (सदस्य)

सदर समितीने खरेदीकामी खालीलप्रमाणे शिफारस केलेली आहे.

1. ज्या औषधांकरिता कोणत्याही निविदाधारकांची निविदा प्राप्त झालेली नाही त्यासाठी फेर ई-निविदा मागविण्यात यावी.
2. जी औषधे/ साहित्य/ केमीकल्स इत्यादीसाठी समाधानकारक दर/ कंपन्या न आल्यास किंवा काही विशिष्ट ठिकाणी विशिष्ट कंपनीचेच साहित्य /

केमीकल्स आवश्यक आहे त्यासाठी देखील दर प्राप्त झालेले नसतील तर अशा ठिकाणी फेर निविदा मागविण्यास शिफारस करण्यात आली.

3. औषधांची निवड करत असतांना दोन्ही रुग्णालयासाठी मोठया प्रमाणात लागणारे काही सलाईनसाठी एकाच कंपनीचे दर प्राप्त झालेले असल्यामुळे याकामी फेर निविदा मागविण्यात यावी. परंतु रुग्णालयातील दैनंदिन गैरसोय होऊ नये म्हणून 3 महिने पुरेल इतका साठा प्राप्त झालेल्या कंपनीचा Denis Chem मे.महेश सर्जिकल ऍ़न्ड फार्मासिटीकल्स, पुणे यांचेकडुन खरेदी करण्याची शिफारस करण्यात आली.

वरील शिफारशीनुसार एकुण 66 पुरवठाधारकांना दि. 15/03/2014 रोजीचे मा. त्रिसदस्य समिती सभेतील निर्णय क्र. 254 अन्वये दि. 19/03/2014 रोजी एकूण रक्कम रु. 305288357.84 इतक्या रकमेचे पुरवठा आदेश देण्यात आलेले आहे.

तसेच शिफारसीनुसार एकूण 463 औषधांकरिता कोणत्याही निविदाधारकांची निविदा प्राप्त झालेली नाही तर 142 औषधे / सर्जिकल साहित्याकरीता फेर निविदा मागवाव्या लागणार आहेत सदर एकूण 605 औषधे / सर्जिकल साहित्याकरीता एकूण रक्कम रु.4,88,68,599/- इतक्या खर्चास दि. 26/07/2013 रोजीचे मा. त्रिसदस्य सभेत मान्यता मिळालेली आहे.

त्यानुसार सदरचे खरेदीकामी दैनिक सकाळ - पुणे, लोकमत - नागपुर, टाईम्स ऑफ इंडिया - दिल्ली, मुंबई, अहमदाबाद या वर्तमानपत्रात जाहिरात देऊन ऑनलाईन कमर्शियल निविदा दि. 15/07/2014 अखेर मागविण्यात आल्या होत्या तर दि. 19/07/2014 अखेर तांत्रिक ई-निविदा मागविण्यात आल्या होत्या. त्यास अनुसरुन शिर्डी व मुंबई कार्यालयात त्यानुसार प्राप्त झालेल्या एकूण 21 निविदांचा तपशील खालीलप्रमाणे:-

| Sr. No. | Name of Party | Tender Recevied Date |
|---|---|---|
| 1 | M/s. Austin Health Care, Pune | 16/07/2014 |
| 2 | M/s. B L Lifesciences Pvt. Ltd., New Delhi | 18/07/2014 |
| 3 | M/s. Deva Distributors, Shrirampur. | 18/07/2014 |
| 4 | M/s. Getwell Distributors, Nashik | 18/07/2014 |
| 5 | M/s. Human Touch Technologies, Pune | 18/07/2014 |
| 6 | M/s. InnCare Specialities, Nashik | 16/07/2014 |
| 7 | M/s. JK Sales & Services, Aurangabad | 17/07/2014 |
| 8 | M/s. Kabra Medicals, Jalgaon | 19/07/2014 |
| 9 | M/s. Kanchan Drugs Pvt. Ltd., Pune | 15/07/2014 |
| 10 | M/s. Kaustubh Enterprises, | 17/07/2014 |

| | | |
|---|---|---|
| 11 | M/s. Krush Enterprises, Mumbai | 16/07/2014 |
| 12 | M/s. Mahesh Surgical & Pharmaceuticals, Pune | 19/07/2014 |
| 13 | M/s. Namoh Agencies, Ahmednagar | 16/07/2014 |
| 14 | M/s. Ophtho Equip Inc., Ahmedabad | 15/07/2014 |
| 15 | M/s. Pharmacea Link, Pune | 19/07/2014 |
| 16 | M/s. Shivam Trading Co., Mumbai | 15/07/2014 |
| 17 | M/s. Shreya Enterprises, Ahmednagar | 18/07/2014 |
| 18 | M/s. Siddhi Medical Distributors, Aurangabad | 17/07/2014 |
| 19 | M/s. Snehal Enterprises, Nagpur. | 18/07/2014 |
| 20 | M/s. Surya Surgi Pharma, Nashik | 18/07/2014 |
| 21 | M/s. Varad Enterprises, Nashik. | 17/07/2014 |

मा. त्रिसदस्य समिती सभा दि. 08/01/2014 निर्णय क्र. 23 अन्वये व दि. 26/06/2014 रोजीचे कार्यालयीन आदेशान्वये वैद्यकीय संचालक यांना ई - निविदा / कोटेशन उघडण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहे, त्यानुसार वरीलप्रमाणे प्राप्त तांत्रिक निविदा दि.25/07/2014 रोजी वैद्यकिय संचालक यांचे समक्ष उघडण्यात आलेल्या होत्या. तद्नंतर दि.23/08/2014 रोजी ई-कर्मशिअल निविदा उघडणेकामी दु.3.00 वाजता शिर्डी येथे सभा आयोजित करण्यात आली होती.

सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

1) ऍ़ड. श्री. पी.पी. मोरे - सरकारी सहायक वकील, औरंगाबाद खंडपीठ (अध्यक्ष)

2) डॉ. आर.व्ही.प्रभाकरराव - वैद्यकीय संचालक, श्री साईबाबा हॉस्पिटल,शिर्डी. (सचिव)

3) डॉ. पी.डी. गांडाळ - जिल्हा आरोग्य अधिकारी, अहमदनगर (सदस्य)

4) डॉ. एस.जी पवार - वैद्यकीय अधिक्षक, ग्रामीण रुग्णालय, राहाता,

जिल्हा शल्यचिकित्सक यांचे प्रतिनिधी - अहमदनगर (सदस्य)

5) डॉ. संजय पठारे - वैद्यकीय अधिक्षक, श्री साईनाथ रुग्णालय, शिर्डी.(सदस्य)

1) सभेच्या सुरुवातीस दि.15-19/02/2014 रोजीचे सभेत वार्षीक औषधे खरेदीची निवड करतांनी इंजेक्शन A.S.V यासाठी कुणाचेच दर प्राप्त झालेले नसल्याने ती थेट सरकारी उत्पादक कंपनी मे. हाफकिन बायोफार्म कॉर्पोरेशन लि, मुंबई यांना पत्र देऊन जर त्यांचेकडे उपलब्ध असतील तर त्यांचेकडून थेट

खरेदी करावे असे ठरले होते. त्यानुसार त्यांना दि.01/04/2014 रोजी ईमेल पत्रान्वये कळविण्यात आले होते. तसेच मे. भारत सिरम इन्स्टयुट्रस मुंबई व सिरम इन्स्ट्रुयट मुंबई यांना देखील पत्र देण्यात आले होते. मे हाफकीन बायोफार्म कॉर्पोरेशन, मुंबई यांनी त्यांचे पत्र क्र.पणन/ एमएस/ 538/दि.03/04/2014 अन्वये आपण नमुद केल्या प्रमाणे Inj. A.S.V चा साठा अत्यल्प प्रमाणात आहे. हाफकिन जीव- औषध हा महाराष्ट्र शासनाचा अंगीकृत व्यवसाय आहे. त्याप्रमाणे महाराष्ट्र शासनांतर्गत येणाऱ्या शासकीय रुग्णालये, प्राथमिक आरोग्य कैंद्रे तसेच जिल्हा रुग्णालयांना प्राधान्याने पुरवठा करण्यास हाफकिन महामंडळ कटिबध् आहे. असे पत्र देण्यात आले होते त्यानुसार सदर पत्रावर चर्चा करणेत आली. त्यावर चर्चा होऊन मे हाफकीन बायोफार्म कॉर्पोरेशन, मुंबई यांनी सदर इंजेक्शन देण्यास वरील कारणास्तवअसमर्थता दर्शविल्यामुळे त्यांना पुनश्च एक वेळ पत्र देऊन त्यांचेकडून जितकी इंजेकशन्स् मिळतील तितकी देणेबाबत विनंती करण्यात यावी. जर त्यांचेकडून किंवा मे. भारत सिरम इन्स्टयुट्रस मुंबई व सिरम इन्स्ट्रुयट मुंबई या उत्पादक कंपनीकडून मिळू शकले नाही तर सध्या बाजारातून खरेदी करण्यात यावे असे ठरले तसेच सभेचे अध्यक्ष ऍ़ड पी.पी मोरे हे स्वत: कंपनीचे डायरेक्टर बरोबर याबाबत दुरध्वनीवरुन विनंती करतील असे ठरले.

2) यानंतर वार्षीक खरेदीमधील On Consignment Basis (Part B) मधील Implants साठी समितीने केलेल्या शिफारशीनुसार वार्षीक खरेदीचे 19 पुरवठाधारकांना दि.04/07/2014 रोजी आदेश देण्यात आलेले आहे. परंतु त्यामध्ये M/s. Vascular Concepts Ltd., Mumbai यांना देण्यात आलेल्या Stent (Pro star) या स्टेन्टचे दर चर्चा वाटाघाटीचे वेळेस रु. 18000/- प्रति नग या दराने दि.22/03/2014 चे सभेत मान्य केले होते. परंतु पुरवठा आदेश दिल्यानंतर त्यांनी सदर स्टेन्ट हा आम्ही दरात वाढ झाल्यामुळे रु.20,000/- प्रति नग या प्रमाणे देऊ असे दि.04/08/2014 चे ईमेल पत्राद्वारे कळविले आहे. तुलनात्मक दराचे तक्त्यात प्राप्त झालेल्या निविदाधारकापेक्षा त्याचे सुधारित दर रु.20000/- हेच निम्नतम येतात, असे वित्त व्यवस्थापक यांनी सभेपुढे सांगितले. यावर चर्चा होऊन M/s. Vascular Concepts Ltd., Mumbai आपण चर्चा वाटाघाटी रु.18000/- प्रति नग दराने देण्याचे मान्य केलेले होते. निविदेतील अटी व शर्तीनुसार दरात कोणतीही वाढ करुन मिळणार नाही तसेच जर आपण मान्य केलेल्या दराने पुरवठा केला नाही तर त्यांची निविदेसोबत संस्थानकडे जमा असलेली अनामत रक्कम रु.50000/- जप्त करण्यात येईल. असे पत्र वित्त व्यवस्थापक यांनी देण्यात यावे. दरम्यान रुग्णांची गैरसोय होऊ नये म्हणून रु.20000/- रक्कमचे स्टेन्ट घेण्यात यावें तसेच वित्त व्यवस्थापनक यांनी तुलनात्मक तक्त्यातील इतर निविदाधारकांना पत्र देऊन त्यांचेकडून दरात अजुन काही सुट मिळत असेल तर त्यांचे सुधारित दर व M/s. Vascular

Concepts Ltd., Mumbai यांचे नवीन दर यामध्ये ज्यांचे निम्नतम दर असतील यांचेकडून स्टेन्ट खरेदी करण्यात यावे असे ठरले आहे.

3) तद्नंतर तांत्रीक निविदेसोबत सादर केलेल्या कागदपत्रांचा तक्ता सभेपुढे ठेवण्यात आला होता. यावर चर्चा होऊन M/s. Kaustubh Enterprises, Mumbai व M/s. InnCare Specialities, Nashik यांनी Drug Licence दिलेले नाही. M/s. Kaustubh Enterprises, Mumbai प्लास्टिक मटेरियलचा Supply करतात. तर M/s. InnCare Specialities, Nashik आयुर्वेदीक औषधांचे उत्पादन करतात त्यामुळे त्यांना Drug Licence ची आवश्यकता नाही. असे त्यांनी पत्राद्वारे कळविलेले आहे. तेव्हा त्याच्या निविदा देखील पात्र ठरवण्यात आल्या त्यानुसार सर्वच 21 निविदाधारकांच्या ई-कर्मर्शिअल निविदा दि.23/08/2014 रोजीचे समिती सभेपुढे उघडण्यात आल्या.

सदर निविदाधारकांनी देऊ केलेल्या दरांचा तुलनात्मक तक्ता नेहमी प्रमाणे पुढील सभेपुढे निर्णयार्थ सादर करावा असे ठरले.

त्यानुसार खरेदी समितीचे दि. 21/09/2014 रोजी शिर्डी येथे झालेल्या चर्चेनुसार Re- E - Tender मधील औषधांची निवड करणेकामी पुन्हा सभा आयोजित करणेचे ठरले होते, त्यानुसार आज दि. 11/10/2014 रोजी सदरहू समितीची सभा श्री साईबाबा रुग्णालयामध्ये आयोजित करण्यात आली होती .

सदर सभेस खालील सदस्य उपस्थित होते.

1) ऍ़ड. श्री. पी.पी. मोरे - सरकारी सहायक वकील, औरंगाबाद खंडपीठ (अध्यक्ष)

2) डॉ. सौ. एस.जी. पवार - जिल्हा शल्यचिकित्सक यांचे प्रतिनिधी

3) डॉ. प्रमोद म्हस्के - जिल्हा आरोग्य अधिकारी, यांचे प्रतिनिधी - अहमदनगर

4) डॉ. आर.व्ही.प्रभाकरराव - वैद्यकीय संचालक, श्री साईबाबा हॉस्पिटल,शिर्डी. (सचिव)

5) डॉ. कौशिककुमार मकवाना - वैद्यकीय अधिक्षक, श्री साईनाथ रुग्णालय, शिर्डी.

सभेच्या सुरवातीस सर्व औषधे / सर्जिकल साहित्याबाबत प्राप्त झालेल्या ऑन लाईन ई कर्मशिअल निविदांचा तुलनात्मक तक्त्याच्या प्रती सर्व सदस्स्यांना देण्यात आल्या. त्यावर समीतीचे सभेत सांगोपांग चर्चा होऊन औषधांची/ साहित्यांची निवड करण्यात आली सदरची निवड करतांना समितीने खालील बाबींचा प्रामुख्याने विचार करुन निवड करण्याची शिफारस केलेली आहे.

1. सदर तुलनात्मक तक्त्याचा आभ्यास केल्यानंतर समीतीने काही ठिकाणी विशेषत: प्रयोगशाळा केमिकल्स ह्यासाठी ज्या कंपनीचे मशिन असते त्याच कंपनीचे किट वापरावे लागतात. याबाबत मागील सभेत

(दि.21/09/2014) याबाबत पॅथोलॉजिस्ट डॉ. न्यायाधिश यांचा अभिप्राय मागविण्यात यावा असे ठरले होते, तसेच Thermo व AGD या कंपनीचे किटसाठी M/s. Austin Healthcare, Pune या निविदाधारकांने Pathozyme या कंपनीचे देखील दर दिले होते त्यांचे दर निम्नतम आहेत. परंतु आपणाकडे Thermo कंपनीचे मशिन असल्यामुळे त्याच कंपनीचे किट लागतात. त्यामुळे M/s. Austin Healthcare, Pune यांचेकडून आपल्या Pathozyme कंपनीचे किट Thermo कंपनीच्या मशिनसाठी वापरता येऊ शकतात किंवा कसे? याबाबत देखील कंपनीकडुन खुलासा मागविण्यात आला होता. त्यावर त्यांनी त्यांचे दि.09/10/2014 चे पत्रान्वये त्यांचा खुलासा सादर केला होता. सदर पत्रावर पॅथॉलॉजिस्ट न्यायाधिश यांचा देखील अभिप्राय मागविण्यात आला होता. त्यानुसार त्यांनी दिलेला अभिप्राय आजचे सभेपुढे ठेवण्यात आला होता. त्यानुसार दोन्ही कंपनीचे किटसबाबत डॉ. न्यायाधिश यांनी दिलेल्या अभिप्रायानुसार ज्या ठिकाणी AGD, Thermo, Biomeriux या कंपनीचे किटची आवश्यकता आहे. तेथे निम्नतम दरांचा विचार न करता शिफारस करण्यात आलेली आहे. तर डॉ. न्यायाधिश पॅथोलॉजिस्ट यांनी शिफारस केलेल्या कंपनीचे दर प्राप्त झालेले नाही. त्यासाठी पुन्हा तिसऱ्यांदा ई-निविदा मागवण्याची शिफारस करण्यात आलेली आहे.

2. सदर औषधांसाठी दुसऱ्यांदा ई-निविदा मागवुन दर मागविण्यात आलेले आहे. त्यामध्ये ज्या औषधे/ सर्जिकल साहित्यांसाठी एकाच निविदाधारकांचे दर प्राप्त झालेले आहे परंतु त्यांची मागणीची संख्या दैनंदिन वापरासाठी लागणारी गरज व एकुण रक्कम इत्यादींचा विचार करता पुन्हा ई-निविदा मागवणे आर्थिक दृष्टया परवडणारे नाही प्रत्येक औषधांची/ साहित्याची रक्कम एकुण रक्कम ही रु.2,00,000/- पेक्षाही कमी आहे यामुळे पुन्हा ई-निविदा न मागविता तेथे त्यांची शिफारस करण्यात आलेली आहे.

3. दोन्ही रुग्णालयांना लागणारे सलाईनसाठी सुरुवातीच्या निविदेत Denis कंपनीचे एकमेव दर प्राप्त झाले होते. सदर सलाईनची मागणी जास्त प्रमाणात असल्यामुळे त्यासाठी तुलनात्मक दर प्राप्त झालेले नव्हते त्यामुळे याकामी पुन्हा ई-निविदा मागवाव्यात असे समितीचे दि.15-19/02/2014 सभेत ठरले होते. परंतु रुग्णालयातील दैनंदिन कामाची गैरसोय होऊ नये म्हणून Denis कंपनीचे सलाईन अंदाजे 3 महिन्याकरिता खरेदी करण्यात आले होते. सदर सलाईन रुग्णालयात वापरण्यास दिले असता त्याबाबत समाधानकारक नसल्याची तक्रार प्राप्त झाली होती. सदर तक्रारीची प्रत आजचे सभेपुढे सादर करण्यात आली होती. सदरचे सलाईनसाठी 3 पेक्षा जास्त निविदाधारकांचे दर प्राप्त झालेले आहेत.

वरील सभेत सदर तक्रारीचा विचार करुन Denis कंपनी ऐवजी Nirlife व Claris या कंपनीचे सलाईन घेण्याची शिफारस करण्यात आलेली आहे. कारण

यापुर्वी सदर कंपनीचे सलाईन वापरलेले आहे व त्याबाबत कुठलीही तक्रार प्राप्त नाही. त्यामध्ये 1) Dextrose 10% 500ml, 2) Ringer Lactate 500ml, 3) Normal Saline 500ml 4) Normal Saline 100ml (Claris), 5) Normal Saline 1000ml, 6) Manitol 100ml यासाठी Nirlife कंपनीचे दर निम्नतम आहेत (L1) तेथे त्यांची शिफारस करण्यात आलेली आहे. तर Dextrose 5% याकरिता Nirlife कंपनीचे दर L2 आहेत. Dextrose 25% 100ml याकरिता L2 दर असलेली कंपनी PDPL यांचे दर रु.11.37 प्रति बॉटल तर Nirlife कंपनीचे दर (L3), रु.11.39 प्रति बॉटल असे आहेत दोन्हीच्या दरात फार फरक नसल्यामुळे व पुरवठाधारकास गाडीत सलाईन एकत्रित पाठविणेचे दृष्टीने Nirlife कंपनीची (L3), शिफारस केलेली आहे. DNS 500ml साठी Nirlife कंपनीचे (L2) असलेल्या दराची शिफारस करण्यात आलेली आहे.

4. सदर निविदेमध्ये PTCA Wire all Types यासाठी M/s. Shivam Trading, Mumbai व M/s. Human Touch, Mumbai यांचे एकमेव दर प्राप्त झालेले आहेत सदरच्या Wire ह्या Abbott या कंपनीच्या असून On Consignment Basis वरील आयटमच्या चर्चा वाटाघाटीच्या वेळेस सदरहू कंपनीने सदर Wire च्या किंमती रु.2700/- प्रति नग या दराने देऊ असे दि.10/05/2014 रोजीचे पत्रान्वये कळविले होते. परंतु ई-टेंडरमध्ये त्यांनी त्याच Wire चे दर अनुक्रमे रु.3960/- व रु.4752/- प्रति नग असे दिलेले आहे म्हणजेच त्यांनी जास्त दर निविदेमध्ये आकारलेले आहे. याबाबत श्री साईबाबा रुग्णालयातील कार्डीयालॉजीस्ट डॉ. मनोहर शिंदे यांचेशी समितीने चर्चा केली असता त्यांनी सदर Wire अजुनही काही कंपन्या तयार करत असतात. व त्यांचे दर Abbott कंपनीपेक्षा कमी असण्याची शक्यता आहे. सदरची खरेदीही जवळपास अंदाजे रु.70,00,000/- पर्यंतची आहे. व त्यामुळे तुलनात्मक दर मिळविणेचे दृष्टीने तसेच संस्थानच्या आर्थिक फायदयाच्या दृष्टीने सदर Wire साठी पुन्हा ई-निविदा मागविण्यात याव्यात व सदर ई-निविदेची कार्यवाही 21 दिवसात पुर्ण करण्यात यावा.

5. वरील प्रमाणे सलाईन/ प्रयोगशाळा केमिकल्स /Guide wire all इत्यादी व्यतिरिक्त उर्वरित औषध/ साहित्यासाठी 2 निविदाधारकांचे दर प्राप्त झालेले आहे त्यामध्ये L1 निम्नतम दराची शिफारस करण्यात आलेली आहे.

6. प्रयोगशाळा केमिकलची निवड करत असतांना समितीचे असे निदर्शनास आले की, काही कंपन्याचे मशिनसाठी (उदा. AGD, Thermo, Biomeriux) यांना त्याच कंपनीचे किट लागतात सदरचे मशिन हे 6 ते 7 वर्षा पुर्वीचे आहेत. परंतु सदर कंपन्या दर वर्षी आपल्या किटचे दर वाढवीत असतात. तेंव्हा अशा जुन्या मशिन एकतर बायबॅक करुन नवीन मशिन खरेदी कराव्या व त्यावेळेस त्या मशिनची किटस् चे दर देखील पुढील काही वर्षाकरिता निश्चित करण्यात यावे. किंवा फक्त किटस् खरेदी करुन सदर मशिन रुग्णालयासाठी काही कंपन्या भाडेतत्वावर (Rental Basis) किंवा बाजारात उपलब्ध असलेल्या इतर कंपन्याचे किट वापरता येऊ शकेल किंवा कसे

यासाठी पॅथॉलॉजिस्ट व इतर डॉक्टरांची एक समिती गठीत करण्यात येऊन त्याचा अहवाल त्यांनी वैद्यकीय संचालक (समिती सचिव) यांना सादर करावा.

7. पुढील सन (2014-15) या वर्षासाठी लागणाऱ्या औषधांसाठी पुढील निविदेची प्रक्रिया सध्या कार्यरत आहे. त्यासाठी साधारणत: डिसेंबर किंवा जानेवारी पर्यंत ई-निविदा मागविण्याची प्रक्रिया होईल असे सभेपुढे सागण्यात आले तेंव्हा ज्या औषधांसाठी दुसऱ्यांदा जाहिरात देऊन देखील कुणाच्याही निविदा प्राप्त झालेल्या नाहीत. व जर त्याची दैनंदिन वापरासाठी आवश्यकता असेल तर त्यासाठी पुन्हा तिसऱ्यांदा ई-निविदा मागविण्यात याव्यात अन्यथा नविन (पुढील खरेदीमध्ये त्यांचा समावेश करण्यात यावा.)

8. मागील सभेत ठरलेप्रमाणे इंजेक्शन ASV या करीता समितीचे दि. 28/08/2014 चे सभेत केलेल्या शिफारशीनुसार सरकारी उत्पादक कंपनी मे. हाफकिन बायोफार्मा, मुंबई यांना पुन्हा इकडील दि. 01/04/2014 रोजी ई-मेल पत्र पाठविण्यात आलेले होते. त्यावर मे. हाफकिन बायोफार्मा, मुंबई यांनी त्यांचे पत्र क्र.पणन/एमएस/538 दि.03/04/2014 अन्वये विशेषबाब म्हणून 100 Vial देण्याबाबत कळविलेले आहे. परंतू 100 Vial ही संख्या फारच कमी आहे. यासाठी समितीचे उपस्थित सदस्य डॉ. प्रमोद म्हस्के यांनी जिल्हा आरोग्य, अहमदनगर विभागास शासनाकडून सदर इंजेक्शनचा पुरवठा होतो तेंव्हा शासनाने जे दर मान्य केले आहे. त्या दरानूसार संस्थानने विकत घ्यावे असे ठरले.

समितीचे वरील शिफारशीनुसार एकुण 17 पुरवठाधारकांना पुरवठा आदेश जात असून त्याची एकुण रक्कम रु. 2,52,92,904/- इतकी होत आहे. त्याचा थोडक्यात तपशिल खालीलप्रमाणे-

| | | |
|---|---|---|
| Single Tendered items | 107 | 7171668.75 |
| Two Tender amongs L1 | 44 | 1397244.87 |
| Two Tender amongs L2 | 20 | 5171094.00 |
| 3 or more than 3 tender amongs L1 | 125 | 9905303.54 |
| 3 or more than 3 tender amongs L2 | 6 | 1605450.00 |
| 3 or more than 3 tender amongs L3 | 1 | 42143.00 |
| **Total –** | **303** | **25292904.16** |

| Sr.No. | Name of Supplier | P.O. Amt. in Rs. |
|---|---|---|
| 1 | M/s. Austin Health Care, Pune | 427845.59 |
| 2 | M/s. B L Lifesciences Pvt. Ltd., New Delhi | 331695.00 |
| 3 | M/s. Getwell Distributors, Nashik | 1851338.50 |
| 4 | M/s. Inncare Specialities, Nashik | 89800.00 |
| 5 | M/s. JK Sales & Services, Aurangabad | 218020.00 |

| | | |
|---|---|---|
| 6 | M/s. Kabra Medicals, Jalgaon | 765275.00 |
| 7 | M/s. Kanchan Drugs Pvt. Ltd., Pune | 960345.00 |
| 8 | M/s. Krush Enterprises, Mumbai | 2789265.60 |
| 9 | M/s. Mahesh Surgical & Pharmaceuticals, Pune | 506094.57 |
| 10 | M/s. Namoh Agency, Ahmednagar | 5146083.00 |
| 11 | M/s. Ophtho Equip Inc., Ahmedabad | 873000.00 |
| 12 | M/s. Pharmacea Link, Pune | 352984.00 |
| 13 | M/s. Shreya Enterprises, Ahmednagar | 195170.00 |
| 14 | M/s. Siddhi Medical Distributors, Aurangabad | 10693859.00 |
| 15 | M/s. Snehal Enterprises, Nagpur | 648.90 |
| 16 | M/s. Surya Surgi Pharma, Nashik | 89280.00 |
| 17 | M/s. Varad Enterprises, Nashik | 2200.00 |
| | **Total Amt. in Rs.** | **2,52,92,904.16** |

तरी उपरोक्त प्रमाणे निवड समितीने केलेल्या शिफारशीनुसार कार्यवाही करणेस तसेच वरील पुरवठा धारकांना वार्षिक पुरवठा आदेश देण्याचा प्रस्तावास,

तसेच खरेदी समितीने केलेल्या शिफारशीनुसार ज्या 271 औषधे / सर्जिकल साहित्याकरीता दुसऱ्यांदा निविदा देऊनही कोणाचेही दर प्राप्त झालेले नाहीत अशा, तसेच समितीने आवश्यक तेथे 30 औषधे / साहित्याकरीता तिसऱ्यांदा ई-निविदा मागविण्याची शिफारस केलेली आहे अशा एकुण 301 आयटमकरीता अंदाजे रक्कम रु.2,62,41,844/- इतक्या रक्कमेच्या खर्चास मान्यता मिळालेली असून त्याकामी पुन्हा ई-निविदा मागविण्याचा प्रस्तावास मान्यता असावी.

**निर्णय क्र.१०३७** **यावर सविस्तर चर्चा होऊन, प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे निवड समितीने केलेल्या शिफारशीनुसार कार्यवाही करणेत येऊन उपरोक्त १७ पुरवठाधारकांना वार्षिक पुरवठा आदेश देणेस मान्यता देण्यात आली. तसेच खरेदी समितीने केलेल्या शिफारशीनुसार 271 औषधे/ सर्जिकल साहित्य खरेदीकरीता दुसऱ्यांदा निविदा देऊनही दर प्राप्त झालेले नाहीत. तसेच समितीने आवश्यक तेथे 30 औषधे/ साहित्याकरीता तिसऱ्यांदा ई-निविदा मागविण्याची शिफारस केलेली आहे, अशा एकुण 301 आयटमकरीता पुन्हा विहीत पध्दतीने ई-निविदा मागविणेत याव्यात, असे ठरले.** (कार्यवाही- वैद्यकिय संचालक)

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

<u>यानंतर मा.अध्यक्ष महोदय यांचे परवानगीने आयत्या वेळेच्या विषयांवर चर्चा करणेत आली.</u>

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०१** **संतकवी कै.दासगणू महाराज जन्मस्थळ अकोळनेर ता.जि.अहमदनगर यांच्या जन्मस्थळाचा विकासकामास आर्थिक मदत देणेबाबत.**

**प्रस्ताव-** अध्यक्ष राष्ट्रहित संवर्धक मंडळ, अहमदनगर यांनी दि.१७.०१.२०१० चे पत्राने आमचा ट्रस्ट नोंदणीकृत असून अॅड.श्री दाजीसाहेब दाभोळकर यांनी अकोळनेर, जि.अहमदनगर येथील त्यांचा राहता वाडा व परसबागेची जागा बक्षीसपत्र करुन राष्ट्रहित संवर्धक मंडळास दिली आहे. या वाडयात संत कवी कै.दासगणू महाराज यांचा जन्म दि.६ जानेवारी १८६८ रोजी झालेला आहे. त्यांच्या जन्मस्थळाचा विकास करण्यासाठी रु.१ कोटी २६ लाख रक्कमेचा आराखडा तयार केलेला आहे. कै.दासगणू महाराज व श्री साईबाबा संस्थान शिर्डी यांचे रुणानुबंध व नाते लक्षात घेता संस्थानमार्फत विकास प्रकल्पास लागणारे अर्थ सहाय उपलब्ध करुन द्यावे, अशी विनंती केली आहे.

**कै.दासगणू महाराजांचा अल्प परिचय-**

संतकवी कै.दासगणू महाराज यांनी काही वर्षे श्री साईबाबा संस्थानचे अध्यक्ष पद भुषविलेले आहे. तसेच शिर्डी माझे पंढरपूर ही आरती लिहीली असून ती आजही मंदिरात म्हटली जाते. त्याचप्रमाणे दासगणू महाराजांनी किर्तनाच्या माध्यमातून श्री साईबाबांचा प्रचार व प्रसार केलेला आहे.

**अधिनियमातील तरतुद-**

सन २००४ चा अधिनियमातील कलम २१ मधील (२) (दोन) नुसार, छाननी समितीच्या शिफारसीनूसार व राज्य शासनाचे पूर्व मंजूरीने नोंदणीकृत विश्वस्तव्यवस्था किंवा नोंदणीकृत संस्था यांना अनूदान देण्याची तरतुद आहे. मात्र मागिल छाननी समितीची मुदत संपलेली असून नविन छाननी समितीची स्थापना झालेली नाही.

**मा.व्यवस्थापन समितीचा निर्णय-**

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०६.०३.२०१० चे सभेतील निर्णय क्र.३१७ अन्वये, सदरच्या प्रस्तावास रु.२५ लाख आर्थिक मदत देण्यास मान्यता देऊन प्रस्तावास छाननी समितीची मान्यता घ्यावी, असे ठरले आहे.

या प्रस्ताप्रमाणे एकूण ३० प्रस्ताव गत व्यवस्थापन समितीने मुंजर करुन छाननी समितीचे सभेपूढे मान्यतेसाठी ठेवण्याचे निर्देश दिलेले आहे. सन २०१०-२०११ कालावधीत छाननी समितीच्या सभेमध्ये अनुदानाच्या प्रस्तावांवर निर्णय झालेले नाहीत. त्यामुळे सर्व प्रस्ताव आजही प्रलंबीत आहेत.

मा.व्यवस्थापन समितीचे दि.०८.०१.२०१४ चे सभेतील निर्णय क्र. ५७ अन्वये, सध्या छाननी समिती नसल्यामुळे संतकती दासगणू महाराज यांच्या जन्मस्थळाच्या विकास कामाच्या प्रस्तावाबाबत मा.अध्यक्ष महोदय यांनी शासनास पत्रव्यवहार करावा असे ठरले होते, याबाबत दि.०१.०१.२०१४ रोजी शासनास पत्र पाठवले आहे. असे मा.अध्यक्ष महोदय यांचे निदर्शनासआणुन दिले होते. शासनाकडून अद्याप प्रस्तावाबाबत काहीही निर्देश आलेले प्राप्त झालेला नाही.

शासनाने यापुर्वी वेगवेगळया प्रस्तावाबाबत अनुदानाचे प्रस्ताव छाननी समितीच्या शिफारसीनूसारच पाठवावे, थेट आलेले प्रस्ताव फाईल केले जातील, असे कळविलेले आहे.

**मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांचे निर्देश**.

PIL No 18/2011, date 13 March 2012 Sr.No.18 मध्ये खालीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत. The existing Committee and the Committee constituted by this Court is directed not to take any major financial decision in respect of management of of the affairs of the Sansthan without intimating this Court.

तसेच CIVIL APPLICATION NO. 12056/2012,date 16 Oct.2012 Sr.No.6 (C) Shall not take any major financial decision of whatsoever nature. असे निर्देश दिलेले आहेत.

**विभागाचा अभिप्राय-**

१. अधिनियमातील तरतूदीप्रमाणे प्रस्तावास छाननी समितीची शिफारस आवश्यक आहे. मात्र सध्या छाननी समिती अस्तित्वात नाही.

२. मा.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी अनुदानाच्या प्रस्तावाबाबत वरीलप्रमाणे निर्देश दिलेले आहेत.

३. एका प्रस्तावाच विचार करावयाचा असल्यास उर्वरीत पेंडींग प्रस्तावांच्या अर्जदारांची मागणी येणार आहे.

४. मा.छाननी समिती अस्तित्वात आल्यानंतर सर्वच पेंडींग (पेंडींग ३० प्रस्ताव) प्रस्ताव समितीचे सभेपूढे ठेवून समितीच्या शिफारसीनूसार प्रस्ताव शासनाचे मंजूरीसाठी पाठविता येतील, असे नम्र मत आहे.

प्रस्ताव निर्णयसाठी सादर.

**निर्णय क्र.१०३८** **उपरोक्त प्रस्तावावर सविस्तर चर्चा होऊन, संतकवी कै.दासगणू महाराज जन्मस्थळ अकोळनेर ता.जि.अहमदनगर यांच्या जन्मस्थळाच्या विकासकामांसाठी आर्थिक मदत देणेकामी विधी व न्याय विभाग, महाराष्ट्र शासन तसेच संस्थान वकिलामार्फत अर्ज करणेत येऊन, मा.मुंबई उच्च न्यायालयाचे औरंगाबाद खंडपीठाची मान्यता घेण्यात यावी, असे ठरले.** (कार्यवाही- सामान्य प्रशासन, वशी-०३/ विधी अधिकारी)

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०२ माहितीकेंद्र सिकंदराबाद येथे श्री साईचरित्र तेलगू पुस्तकांवर २०% सवलतीच्या दराने विक्री करणे बाबत.**

**प्रस्ताव-** सिकंदराबाद येथे संस्थानने माहितीकेंद्र सुरु केले आहे. तेथे श्री चंद्रकांत सुराणा यांची नेमणूक करुन तेथे संस्थान प्रकाशीत पुस्तके / फोटो / दैनंदिनी व दिनदर्शिका यांची विक्री करण्यात येते.

संदर्भ क्र.२ नुसार पुस्तके/ फोटो वाहतुक खर्चाचा विचार करता, मा.व्यवस्थापन समिती सभा दि.१२.०६.२०११ निर्णय क्र.४२७ अन्वये संस्थानचे पट्टीपुलम (चेन्नई ) व सिकंदराबाद येथील माहितीकेंद्रावर पुस्तके/ फोटो रु.१०/- पेक्षा जास्त छापील किंमत असलेल्या पुस्तकांवर २०% सवलत न देता पुस्तकांचे छापील किंमतीप्रमाणे विक्री करणेत यावी असा निर्णय झालेला आहे.

संदर्भ क्र.३ नुसार मा.व्यवस्थापन समिती सभा दि.२७.०४.२०१३ निर्णय क्र.३५२ अन्वये पुस्तके / फोटो दरपत्रक उघडून निर्णय घेतांना, “सिकंदराबाद येथे संस्थानचे माहितीकेंद्र असल्याने मे.प्रिमेअर प्रेस,सिकंदाबाद यांची श्री साईचरित्र तेलगू या पुस्तकांची ५०,००० नग डिलिव्हरी सिकंदराबाद येथे देण्यात यावी.� असा निर्णय संमत झालेला आहे. सदर निर्णयाप्रमाणे श्री प्रिमिअर प्रेस, सिकंदराबाद यांनी छपाई दर रुपये. ४१.५० पैसे प्रमाणे श्री साईचरित्र तेलगू- ५०,००० नग छपाई करुन पुरवठा माहे डिसेंबर २०१३ अखेर पुर्ण केलेला आहे.

माहितीकेंद्र, सिकंदराबाद येथे श्री साईचरित्र तेलगू – विक्री दर ६०/- असलेली पुस्तके माहे डिसेंबर २०१३ ते माहे नोंव्हेंबर २०१४ अखेर विक्री संख्या ५५४० आहे, श्री साईचरित्र तेलगू- ४४,४६० नग शिल्लक आहे. विक्री व शिल्लक साठा लक्षात घेता विक्रीचा वेग कमी आहे. सिकंदराबाद माहितीकेंद्र येथे श्री साईचरित्र तेलगूच्या पुस्तकावरील छापील किंमतीवर २०% सवलत साईभक्तांना देऊन विक्रीचा आलेख वाढविता येईल. सिकंदराबाद येथे पुस्तके पाठवितांना वाहतुक खर्च संस्थानला आलेला नाही.संदर्भ क्र १ नुसार वाहतुक खर्च येत आसल्याने २०% सवलत बंद करण्याचा निर्णय झालेला आहे.

सबब माहितीकेंद्र सिकंदराबाद येथे प्रिमीअर प्रेस, सिकंदराबाद यांचेकडून छपाई करुन घेण्यात आलेली पुस्तके (छपाई दर रु.४१.५०पैसे खरेदी करण्यात आलेला, शिल्लक साठा नग संख्या ४४,४६० विक्री करीता) संस्थान प्रकाशीत प्रकाशन क्र. PUB/006 श्री साईचरित्र तेलगू विक्री किंमत रु.६०/- वर २०% सवलत वजा जाता विक्री किंमत रुपये.४८/- पुर्णांकीत रुपये.५०/- प्रती नग प्रमाणे विक्री करणेस मा.त्रिसदस्यीय समिती सभेपुढे निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१०३९ यावर सविस्तर चर्चा होऊन, सिकंदराबाद माहितीकेंद्र येथे तेलगू श्री साईचरित्र २०% सवलतीच्या दराने विक्री करणेबाबत यथायोग्य फेरप्रस्ताव सादर करणेत यावा, सबब उपरोक्त प्रस्ताव अमान्य करणेत आला.**

(कार्यवाही- प्र.अधिक्षक, प्रकाशने विभाग)

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०३ श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूल, करीता नवीन झेरॉक्स मशीन खरेदी बाबत.**

**प्रस्ताव-** **सन २००५ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ मधील तरतूद**–सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.४ (भाग ४) दि. १७ ऑगस्ट २००४ रोजी राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा प्रसिध्द केलेला अधिनियमा मधील १७ (२ ढ) नुसार सर्व प्रकारच्या धर्मनिरपेक्ष शिक्षणास चालना देईल किंवा तसे करण्यास साहाय्य करील, तसेच शिर्डी येथे वा अन्य ठिकाणी, शैक्षणिक संस्था स्थापन करील.

**प्रास्ताविक**– उपरोक्त विषयान्वये सन 2008 मध्ये मे. रिको कंपनी मॉडेल नं २०२० डी फोटो कॉपीयर प्रति मिनीट २० कॉपीज या स्पीडचे रु.1 लाख 1,920/- किमंतीचे झेरॉक्स मशीन खरेदी विभागामार्फत खरेदी करून श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कुल कडे देण्यात आले होते. सदर मशीनची कॉपीज मर्यादा 6 लाख प्रति होती आजअखेर या मशीनवर एकूण 8 लाख झेरॉक्स कॉपीज काढण्यात आलेल्या आहेत सदर मशीनची कॉपीज काढण्याची मर्यादा संपलेली असून सदर मशीनची कायम दुरुस्ती करावी लागत आहे तसेच वेळोवेळी ड्रम, डेव्हलपर व टोनर टाकावे लागत असून झेरॉक्स कॉपीज खराब निघत आहेत. सन २०१०-११ पासून झेरॉक्स मशीनचे सर्व्हिसिंग कॉन्ट्रॅक्ट देण्यात येत असून सन २०१३-१४ अखेर एकूण 60,000/- इतका खर्च झालेला आहे. सर्व्हिसिंगचे वेळी आवश्यक लागणारे ड्रम, डेव्हलपर व टोनर शाळेकडून खरेदी करण्यात आले आहेत.

शाळेकडे असलेल्या झेरॉक्स मशीनवर कामाचा भरपूर लोड असून वाहन विभाग, श्री साईबाबा भक्तनिवास स्थान, साई आश्रम या विभागच्या झेरॉक्स प्रति काढून देण्यात येतात. तसेच शालेय माहिती पंचायत समिती, जिल्हा परिषद, शालेय शिक्षण विभागाकडे आवश्यकतेनुसार वेळोवेळी पुरवावी लागते त्या माहितीच्या झेरॉक्स प्रति काढण्यात येतात. आजमितीस शाळेत एकूण 2245 विद्यार्थी शाळेत शिक्षण घेत असून वर्षभरात चाचणी परीक्षा, सत्र परीक्षा प्रश्नपत्रिकांचे झेरॉक्स काढाव्या लागतात. तसेच कार्यालयातील टिपण्या इतर कागदपत्र झेरॉक्स करणेकरीता मशीनचा वापर केला जातो.

**मागणी**– शाळेकडील एकूण कामाचा भार पाहता नवीन झेरॉक्स मशीन खरेदी करावे लागणार आहे. झेरॉक्स मशीन खरेदी करतांना चांगल्या दर्जाचे खरेदी करावे लागणार आहे. सदर झेरॉक्स मशीनवर शालेय कागदपत्र स्कॅनिंग करता आले पाहिजे जेणेकरुन शाळेकडील महत्वाचे कागदपत्र व दाखले यांचे जतन करुन ठेवता येईल. तरी खालील प्रकाराचे संरुपण (Configuration) असलेले दर्जेदार कंपनीचे नवीन झेरॉक्स मशीन खरेदी करावे लागेल.

| झेरॉक्स मशीन तपशिल- संरुपण (Configuration) | अंदाजे किंमत रुपये |
|---|---|
| Digital Copier With Printer(Size A5-A3 )Minimun Copying Speed-20, Printing Speed: 20cpm, Zoom: 50-200%,Duplex inbuilt, 600 dpi Resolution, Paper | रु. 1,50,000/- (एक लाख |

| | |
|---|---|
| Tray Capacity: 250 X 1 Sheets Tray,500x1 sheets, 100 Sheet Bypass., RAM 128 MB. Color Scanner. | पन्नास हजार रुपये मात्र) |

**विभागाचा स्पष्ट अभिप्राय**– सदर झेरॉक्स मशीन, खरेदी विभागामार्फत निवीदा उघडून, तुलनात्मक तक्ता तयार करुन, निवीदा धारकांना समक्ष बोलावून विहीत पद्धतीने खरेदी करुन शाळेकडे देण्यात यावे. याकामी येणारा खर्च खरेदी विभागाचे जनरल बजेट मधून करण्यात यावा. तरी सदरच्या खरेदीसाठी येणा-या खर्चास मान्यता मिळणेकामी निर्णयार्थ सादर.

**निर्णय क्र.१०४० यावर सविस्तर चर्चा होऊन, श्री साईबाबा इंग्लिश मिडीयम स्कूलकरीता प्रस्तावात नमुद केलेप्रमाणे नवीन झेरॉक्स मशीन खरेदी करणेसाठी विहीत पध्दतीने निविदा मागविणेस व याकामी येणा-या अंदाजे रु.१,५०,०००/- मात्रचे खर्चास मान्यता देण्यात आली.**

(कार्यवाही- प्र.प्राचार्य, इंग्लिश मिडीयम स्कुल/ प्र.अधिक्षक, खरेदी विभाग )

---

**आयत्या वेळेचा**

**विषय नं.०४ मा.विश्वस्तांच्या सुचनांबाबत.**

**निर्णय क्र.१०४१ मा.विश्वस्तांनी आजचे सभेत खालीलप्रमाणे सुचना केल्या, त्या मान्य करणेत आल्या.**

**(१)** मा.उच्च न्यायालयाने नेमणूक केलेल्या तदर्थ त्रीसदस्यीय समितीचे अध्यक्ष, सदस्य व उपकार्यकारी अधिकारी यांचा कार्यभार संपुष्ठात आल्यानंतरही त्यांना वैयक्तिक + ४ व्यक्ती याप्रमाणे जनसंपर्क कार्यालयामार्फत प्राधान्याने संस्थानच्या प्रचलित पध्दतीने दर्शन/ आरतीची व्यवस्था करणेत यावी. तसेच या निर्णयामध्ये बदल करावयाचा असल्यास मा.उच्च न्यायालयाची मान्यता घेण्यात यावी.

(कार्यवाही- जनसंपर्क अधिकारी/ संरक्षण विभागप्रमुख/ प्र.अधिक्षक, मंदिर विभाग)

---

**(२)** श्री.संजय भास्कर काळे यांनी दि.०२.१२.२०१४ रोजी मा.उच्च न्यायालयासमोर दिलेल्या अॅफिडेव्हीटच्या संदर्भात संस्थानचे वरीष्ठ कौन्सेल श्री.आर.एन.धोर्डे यांचे दि.०२.१२.२०१४ रोजीचे पत्र प्राप्त झालेले असून त्यामध्ये पी.आय.एल. २५/ २०१२ ची तारीख १०.१२.२०१४ रोजी नेमलेली असलेबाबत कळविण्यात आलेले आहे.

श्री.संजय भास्कर काळे यांनी पी.आय.एल.मध्ये उपस्थित केलेल्या १४ मुद्दयांबाबत काय कार्यवाही करण्यात आलेली आहे, त्या विषयांची सद्यस्थिती काय आहे, शासनाचे वतीने कार्यकारी अधिकारी यांनी त्यातील काही मुद्दयांवर चौकशी करावी, असे सुचविण्यात आलेले आहे. त्याबाबत कार्यकारी अधिकारी

यांनी काही चौकशी केली किंवा करणार आहेत, याविषयी सविस्तर माहिती घेऊन, श्री.संजय भास्कर काळे यांनी दाखल केलेल्या दि.०२.१२.२०१४ रोजीचे प्रतिज्ञापत्रास सविस्तर उत्तर- प्रतिज्ञापत्र, कार्यकारी अधिकारी यांनी तयार करुन, मा.उच्च न्यायालयामध्ये दाखल करावे.

दरम्यान दि.१०.१२.२०१४ रोजी पी.आय.एल.ची तारीख नेमलेली असल्याने, या समितीच्या अध्यक्षांनी श्री.आर.एन.धोर्डे, वरीष्ठ कौन्सेल यांना पत्र लिहून सदरच्या उपस्थित केलेल्या मुद्दयांची चौकशी करणे आवश्यक आहे काय, असल्यास ती चौकशी कोणी करावी व चौकशीचा कालावधी काय असावा, याविषयी मा.उच्च न्यायालयासमोर सविस्तर उत्तर-प्रतिज्ञापत्र दाखल करुन अभिकथन करण्यासाठी पुढील मुदत घ्यावी म्हणून पत्र द्यावे, सदरहू पत्र कार्यकारी अधिकारी यांनी मा.उच्च न्यायालयामध्ये उपस्थित राहून श्री.धोर्डे यांचेकडे सादर करावे व उत्तर-प्रतिज्ञापत्र दाखल करण्यासाठी पुढील तारीख घ्यावी. (कार्यवाही- विधी अधिकारी)

-----------------------------------------------------------------------------------------------------------------------------

**वरील निर्णय क्र.१०२० ते १०४१ सर्वानुमते घेण्यात आले.**

**यानंतर सायंकाळी ०६.०० वाजता सभा समाप्तीची घोषणा करण्यात आली.**

स्वाक्षरित/-**xxx** स्वाक्षरित/-**xxx**
स्वाक्षरित/-**xxx**
(राजेंद्र जाधव) (अनिल कवडे)
(शशिकांत कुलकर्णी)
कार्यकारी अधिकारी जिल्हाधिकारी, अहमदनगर मुख्य
जिल्हा न्यायाधीश
सदस्य सदस्य अध्यक्ष

श्री साईबाबा संस्थान विश्वस्त व्यवस्था, शिर्डी